




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार ७ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







# अर्थसंकल्प 2026, मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून कर्जमाफीची घोषणा



## 7.69 लाख कोटींचा विकासाभिमुख अर्थसंकल्प सादर

- शेतकरी कर्जमाफी, नदीजोड प्रकल्प, तिसरी मुंबई आणि स्टार्टअपला चालना
- राज्याची 'विकसित महाराष्ट्र'च्या दिशेने यशस्वी घौडदौड
- एक हजारपेक्षा जास्त लोकसंख्येच्या गावांना क्रॉक्रिट रस्त्याने जोडणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक आणि दीर्घकालीन विकासाला गती देण्याच्या उद्देशाने सादर करण्यात आलेला २०२६-२७ वर्षाचा ७.६९ लाख कोटींचा अर्थसंकल्प विकसित महाराष्ट्र या ध्येयावर आधारित असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. प्रगतीशील विकास, शाश्वतता, सर्वसमावेशकता आणि सुशासन या चार स्तंभांवर आधारित हा अर्थसंकल्प राज्याच्या आर्थिक, सामाजिक आणि पायाभूत विकासाला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी करीत शेतक -यांना दिलासा देणारा कर्जमाफीचा निर्णय जाहीर केला. विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मंत्रीमंडळ सदस्य, विधानसभा सदस्य उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची अर्थव्यवस्था पुढील काही वर्षांत एक ट्रिलियन डॉलरच्या टप्प्यावर पोहोचवण्याचे लक्ष्य असल्याचे सांगितले. या उद्दिष्टासाठी पायाभूत सुविधा, उद्योग, शेती, शिक्षण आणि डिजिटल तंत्रज्ञान या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

## शेतक-यांना दोन लाखापर्यंत कर्जमाफी

राज्यातील शेतक -यांना दिलासा देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतक -यांना २ लाख रु पयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणा -या शेतक -यांना ५० हजार रु पयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबतच बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यासाठी, तसेच शेतक -यांना कायमस्वरु पी कर्जमुक्त करण्यासाठी समितीच्या शिफारसींनुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करण्यात येईल. जानेवारी २०२६ पर्यंत १ कोटी ३१ लाख फार्मर्स आयडी तयार करण्यात आले आहेत. आता त्यात आदिवासी वनपट्टेधारक शेतकरी समाविष्ट करणार असून कृषी समृद्धी योजनेंतर्गत २०२६-२७ पासून ४ वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवणार आहे. तसेच नवीन प्राकृतिक शेती अभियानात ५ लाख हेक्टर क्षेत्र प्राकृतिक शेतीखाली आणण्यात येईल.

## 2026-27 हे सामाजिक समता आणि समरसता वर्ष म्हणून साजरे करणार

महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंती ११ एप्रिल २०२६ यावर्षी आहे. त्यासाठी एक समिती स्थापन करु न विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येईल, त्यासाठी निधी देणार असून महात्मा फुले यांचे जन्मगाव मौजे कटगुण, जिल्हा सातारा येथे भव्य स्मारक उभारणार आहे. तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, जिल्हा सातारा येथे स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड, चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पायाभूत सोयीसुविधांचा विकास आराखडा तयार करणार आहे. त्याचप्रमाणे संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीवर्षानिमित्त त्यांचे जन्मस्थळ, कर्मभूमी, अंतिम श्रद्धास्थान यांना एकत्रित करु न संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट विकसित करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय अभियाने एकत्र करुन संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान राबविण्यात येणार आहे.

## अजित पवार यांच्या नावे गतिमान नागरी सेवा पुरस्कार



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली म्हणून राज्य शासन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे स्मारक उभारणार असून अजित पवार यांच्या नावे गतिमान नागरी सेवा पुरस्कार देणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## आरोग्य आयुक्तालयाची स्थापना

आरोग्य क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी राज्यातील २९ महापालिका, २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींमध्ये राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि संशोधनासाठी नागपूर येथे महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही संस्था एम्स आणि आयआयएमच्या धर्तीवर कार्य करणार असून भारतीय सार्वजनिक आरोग्य संस्थेचे सहकार्य मिळणार आहे. ग्रामीण भागात कर्करोग, मधुमेह आणि हृदयविकार यासारख्या आजारांचे निदान आणि उपचार अधिक प्रभावी करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या मदतीने ४५०० कोटी रु पयांची प्रगती योजना राबविण्यात येणार आहे. राज्यात डिजिटल सार्वजनिक आरोग्य प्रणाली उभारण्यासाठी महाराष्ट्र डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान अभियान सुरू करण्यात येणार असून रिअल-टाइम डॅशबोर्डद्वारे आरोग्य व्यवस्थेचे प्रभावी नियोजन आणि नियंत्रण केले जाणार आहे. राज्यात सध्या ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये कार्यरत असून आणखी ११ महाविद्यालयांची कामे विविध टप्प्यांवर सुरू आहेत.

## राज्यातील जेन झी तरूणांसाठी नव्या संधी

***अर्थसंकल्पात विद्यार्थ्यांना नासा-इस्त्रोची संधी***



राज्याच्या विकसित महाराष्ट्र २०२६अर्थसंकल्पात युवा, शिक्षण आणि क्रीडा या क्षेत्रांना मोठे प्राधान्य देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, आंतरराष्ट्रीय संधी आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी अनेक महत्त्वाच्या योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. शिक्षण क्षेत्रात मोठा बदल घडवण्याच्या उद्देशाने नवी मुंबई येथे एज्युसिटी उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या शैक्षणिक शहरात सहा देशांतील आंतरराष्ट्रीय विद्यापीठे सुरू होणार असून सर्व विद्यापीठे याच वर्षी सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पाच्या धर्तीवर राज्यात आणखी आठ ते दहा शैक्षणिक शहरे विकसित करण्याचा सरकारचा मानस आहे. या उपक्रमामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठांच्या दर्जाचे शिक्षण राज्यातच मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची गरज कमी होईल, असा सरकारचा विश्वास आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी यासाठी मुख्यमंत्री विज्ञान वारी ही नवी योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना जगप्रसिद्ध संशोधन संस्थांना भेट देण्याची संधी दिली जाणार आहे. विशेषतः भारतीय अंतराळ संशोधन संस्था आणि नासा या संस्थांना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भेट देण्याची संधी मिळणार आहे.

## महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम

या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी भरीव तरतूद करण्यात आल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एकल महिला धोरण राबवण्यात येणार असून त्यासाठी सर्व जिल्ह्यात एकल महिलांचे सर्वेक्षण सुरु असून, अहवालाचे विश्लेषण करु न धोरण आणण्यात येईल. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य सरकारच्या विविध योजनांनाही अर्थसंकल्पात चालना देण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू ठेवण्यात येणार असून महिला बचतगटांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी १३ जिल्ह्यांत उमेद माल उभारले जाणार आहेत. राज्यात आतापर्यंत ३७ लाख लखपती दीदी तयार झाल्या असून पुढील काळात आणखी २५ लाख महिलांना लखपती बनवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.




## UPSC नागरी सेवा 2025 चा अंतिम निकाल जाहीर:

# राजस्थानचा अनुज अग्निहोत्री अव्वल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**UPSC ने २०२५ च्या नागरी सेवा परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर केला आहे. राजस्थानच्या चित्तोडगड येथील रावतभाटा येथील अनुज अग्निहोत्रीने अखिल भारतीय क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले आहे. विविध सेवांसाठी ९५८ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. जाहीर झालेल्या निकालांमध्ये एकूण १८० उमेदवारांची IAS साठी निवड करण्यात आली आहे. ५५ उमेदवारांची IFS साठी निवड करण्यात आली आहे. त्याच वेळी, १५० IPS अधिका -यांची निवड करण्यात आली आहे. अनुजने आधीच दोनदा UPSC परीक्षा उत्तीर्ण केली आहे. UPSC २०२३ च्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात त्याची दिल्लीत SDM म्हणून नियुक्ती झाली. अनुजचे वडील केबी अग्निहोत्री राजस्थान अणुउर्जा केंद्रात काम करतात. त्याची आई मंजू अग्निहोत्री गृहिणी आहे. अनुजने रावतभाटा अणुउर्जा केंद्रीय शाळेत शिक्षण घेतले. त्याने १२वीत ९४ टक्के गुण मिळवले. अनुजला टेबल टेनिस खेळायला आवडते. एआयआर ३ एकांश हा दिल्ली विद्यापीठाच्या श्री राम कालेज ऑफ कामर्समधून पदवीधर आहे.

पंचकुला येथील रहिवासी एकांश धुळ यांनी तिसरा क्रमांक मिळवला. धुळ त्यांच्या कुटुंबासह सेक्टर १२अ मध्ये राहतात. त्यांची आई निर्मला शाळेच्या मुख्याध्यापक आहेत. त्यांचे वडील कृष्ण धुळ हे भाजप नेते आहेत. धुळ यांनी २०२४ मध्ये यूपीएससीमध्ये ३४२ वा आणि २०२५ मध्ये २९५ वा क्रमांक मिळवला.

उत्तर प्रदेशातील शामली येथील आस्था जैन यांनी ९ वा क्रमांक मिळवला. आस्था यांनी २०२४ मध्ये यूपीएससी पात्रता मिळवली आणि १३१ वा क्रमांक मिळवून आयपीएस अधिकारी बनली. तिने नागरी सेवेचा अभ्यास करण्यासाठी हैदराबादमधील आयपीएस प्रशिक्षणातून ब्रेक घेतला. तिने स्व-अभ्यासाद्वारे हे स्थान मिळवले.

भारत सरकारने २०१७ पासून लागू असलेली यूपीएससी कॅडर वाटपासाठी 'झोन सिस्टीम' रद्द केली आहे. त्याऐवजी, नवीन 'कॅडर वाटप धोरण २०२६' लागू करण्यात आले आहे. याअंतर्गत, अधिका -यांच्या कॅडरचे वाटप आता 'सायकल सिस्टीम'द्वारे केले जाईल. हे धोरण भारतीय प्रशासकीय सेवा (IAS), भारतीय पोलिस सेवा (IPS) आणि भारतीय वन सेवा (क्ष्क्ष्द्ध्च) साठी निवडलेल्या उमेदवारांना लागू होईल.

**भौगोलिक क्षेत्रांचे रद्दीकरण आणि नवीन गटांची निर्मिती-** आतापर्यंत, यूपीएससीने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी एकूण २५ कॅडर तयार केले होते. हे भौगोलिकदृष्ट्या पाच झोनमध्ये विभागले गेले होतेः उत्तर, पश्चिम, दक्षिण, मध्य आणि पूर्व. यूपीएससी मेन्स उत्तीर्ण झाल्यानंतर, उमेदवारांनी डीएएफ II फार्म भरला, ज्यामुळे त्यांना त्यांचे झोन आणि नंतर त्यांची राज्य पसंती निवडता आली. एकदा एखाद्या अधिका -याची नियुक्ती एखाद्या विशिष्ट राज्यात झाली की, त्यांना त्या राज्यात कायमस्वरूपी काम करावे लागते. याला कॅडर म्हणतात. नवीन धोरणात, सर्व २५ कॅडरची वर्णक्रमानुसार (अ, ब, क, झेड) व्यवस्था करण्यात आली आहे आणि चार गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहेः जुन्या पद्धतीत, जर एखाद्या उमेदवाराने उत्तर क्षेत्रातील हरियाणा कॅडरला प्राधान्य दिले, तर उमेदवाराला हरियाणा मिळाला नाही तरीही त्यांना राजस्थान किंवा उत्तर प्रदेश मिळण्याची शक्यता होती. तथापि, नवीन पद्धतीत, राज्ये एका झोनमध्ये वर्णक्रमानुसार व्यवस्था केली आहेत. याचा अर्थ असा की त्त(हरियाणा), J (झारखंड) आणि K (केरळ) एकाच झोनमध्ये असतील.







# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, ७ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# मनपातील स्वीकृत नगरसेवकांची निवड सोमवारी

## शहर सुधार आघाडीचे ४, काँग्रेसचे २, वंचित व उबाठा प्रत्येकी १

### ८ जागांसाठी १९ अर्ज; अधिकृत शिफारशीमुळे आठ उमेदवारांची निवड जवळपास निश्चित

***अकोला :*** *महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवक पदांच्या आठ जागांसाठी शुक्रवारी तब्बल १९ उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज दाखल केले असले तरी प्रमुख राजकीय पक्षांच्या अधिकृत शिफारशीमुळे आठ उमेदवारांची निवड जवळपास निश्चित झाली आहे. भाजपप्रणीत शहर सुधार आघाडीचे चार, काँग्रेसचे दोन तर वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे प्रत्येकी एक असे समीकरण निश्चित झाल्याने महापालिकेतील राजकीय चित्र स्पष्ट झाले आहे.*

महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सोमवारी (९ मार्च) होणाऱ्या सर्वसाधारण सभेत या आठ सदस्यांच्या स्वीकृत नगरसेवकपदी निवडीची अधिकृत घोषणा केली जाणार आहे. स्वीकृत सदस्य निवडीच्या प्रक्रियेकडे शहरातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून विविध पक्षांच्या निर्णयांमुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

शहर सुधार आघाडीकडून चंदा शर्मा, ॲड. देवाशिष काकड, ॲड. गिरीश गोखले आणि माजी ज्येष्ठ नगरसेवक सुनील मेश्राम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसने सामाजिक कार्यकर्ते इलियास खान अलियार खान उर्फ गुड्डू पठाण आणि युवा नेते आकाश कवडे यांच्यावर विश्वास दाखवला आहे. तर वंचित बहुजन आघाडीकडून प्रख्यात बांधकाम व्यावसायिक सुनील माणिकलाल इन्नाणी आणि शिवसेना (उबाठा) गटाकडून शंकर भाऊराव लंगोटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

पक्षांच्या अधिकृत गटनेत्यांच्या शिफारशीसह अर्ज दाखल झाल्यामुळे या आठ उमेदवारांची निवड जवळपास निश्चित मानली जात असून सोमवारी होणारी सर्वसाधारण सभा औपचारिकता ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**१९ जण रिंगणात**

शुक्रवारी (६ मार्च) दुपारी २ वाजेपर्यंत एकूण १९ नामनिर्देशन पत्रे महापालिकेकडे प्राप्त झाली. त्यामध्ये डॉ. पूजा रमांकांत खेतान, सुनील माणिकलाल इन्नाणी, गोवर्धन कृष्णराव वाघाडे, अख्तरबी शेख हनीफ, महेंद्र समाधान गवई, मुबीन उल्लाह खान तकदीर खान, शंकर भाऊराव लंगोटे, सुनील तुकाराम मेश्राम, ?ड. देवाशिष सुधाकर काकड, सौ. चंदा कैलाशचंद्र शर्मा, गिरीश दिनेश गोखले, सैय्यद यासीन सैय्यद इसाक, अलमदीहा फातेमा रियाज खान लोधी, रियाज खान फत्तेह खान, आबीद खान जावेद खान, सुरज राजेंद्र लोणारे, आकाश श्रीकृष्णा कवडे, इलियास खान अलियार खान आणि पूजा प्रविण काळे यांचा समावेश आहे.

**अकोला पूर्व मतदारसंघावर उबाठा गटाचे लक्ष**

महापालिका निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे सहा नगरसेवक निवडून आले आहेत. अकोला पूर्व मतदारसंघात वाढलेली ताकद लक्षात घेऊन पक्षाने शंकर लंगोटे यांना स्वीकृत नगरसेवक पदाची संधी दिल्याची चर्चा आहे. माजी उपमहापौर विनोद मापारी यांना निवडणुकीत कडवी टक्कर देणाऱ्या लंगोटे यांना संधी देऊन आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या मतदारसंघात पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या निर्णयाने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

**काँग्रेसचा अनपेक्षित डाव**

महापालिका निवडणुकीत तब्बल २१ जागा जिंकून दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरलेल्या काँग्रेसने स्वीकृत सदस्य निवडीत अनपेक्षित निर्णय घेतल्याची चर्चा आहे. सामाजिक कार्यकर्ते इलियास खान उर्फ गुड्डू पठाण आणि युवा नेते आकाश कवडे यांना संधी देत काँग्रेसने राजकीय समीकरणात सामाजिक समतोल राखत वेगळा डाव टाकल्याचे बोलले जात आहे. आकाश कवडे हे आमदार पठाण यांच्या समर्थक गटातील मानले जात असल्याने या निर्णयामागे राजकीय रणनीती असल्याची चर्चा रंगली आहे.

**वंचित बहुजन आघाडीचे 'सोशल इंजिनिअरिंग'**

वंचित बहुजन आघाडीकडून बांधकाम क्षेत्रातील नावाजलेले व्यावसायिक सुनील माणिकलाल इन्नाणी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अकोला शहरात अनेक आधुनिक इमारती, व्यापारी संकुले आणि विविध कंपन्यांचे शोरूम उभारण्यात त्यांचा मोलाचा सहभाग असल्याने त्यांच्या अनुभवाचा शहराच्या विकासासाठी उपयोग होईल, अशी अपेक्षा वंचितच्या नेत्यांनी व्यक्त केली आहे. या उमेदवारीमागे सामाजिक समीकरण साधण्याचा प्रयत्न असल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

**शहर सुधार आघाडीचा समतोल साधण्याचा प्रयत्न**

भाजपप्रणीत शहर सुधार आघाडीकडून चंदा शर्मा, ॲड. देवाशिष काकड, ॲड. गिरीश गोखले यांच्यासह माजी ज्येष्ठ नगरसेवक सुनील मेश्राम यांना संधी देण्यात आली आहे. विविध सामाजिक आणि राजकीय घटकांना प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न शहर सुधार आघाडीने केल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. या निर्णयातून पक्षाने अंतर्गत समतोल राखण्याचा प्रयत्न केल्याचेही बोलले जात आहे.

---

## मालेगाव नगरपंचायत चे अर्थसंकल्प मंजूर

**मालेगाव :** ओम प्रकाश मधुकर खुरसडे नगराध्यक्ष नगरपंचायत मालेगाव यांचे अध्यक्षतेखाली विशेष सभा घेण्यात आली.

त्यामध्ये नगरपंचायत चे सन २०२५ २६ चे सुधारित व २०२६ २७ चे आगामी वर्षाचे अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्यात आली. नगरपंचायत स्थायी समितीमध्ये मंजुरी मिळाल्याप्रमाणे आजच्या विशेष सभेमध्ये अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला यामध्ये दिव्यांग बांधवा करिता महिला व बालकल्याण विकास करिता आर्थिक दुबळ कल्याण घटकाकरिता क्रीडा साहित्य करिता व विशेष पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकरिता तसेच मालेगाव नगरपंचायत नवीन इमारती करिता तरतूद करण्यात आलेली आहे.

---

## राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशनात पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंट, वाशीम यांना 'उत्कृष्ट सामाजिक संस्था' पुरस्कार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा व पदाधिकारी सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. ना. प्रतापराव जाधव, केंद्रीय आयुष मंत्री, भारत सरकार यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी आयोजकांच्या वतीने प.पू. श्री रमाकांतजी व्यास यांच्या शुभहस्ते 'उत्कृष्ट सामाजिक संस्था' पुरस्कार व स्मृतिचिन्ह प्रदान करून पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंट, वाशीम यांचा गौरव करण्यात आला. पदक व सन्मानचिन्ह वाशीमचे रुपेश लड्ढा यांच्या गळ्यात घालण्यात आले.

या सोहळ्यास संजय व्यास, माधवराव शिंदे व शीला शिंदे, रवींद्र बैतुळे, एकनाथ सुरसे, उत्तमकुमार निकम, विजय सतपुते आदी सदस्य उपस्थित होते. पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंट, वाशीम यांनी सातत्याने नि:शुल्क ध्यान शिबिरे आयोजित करून समाजात आरोग्य व सकारात्मकतेचा संदेश दिला आहे. 'ध्यानमय वाशीम' या संकल्पनेअंतर्गत शहरातील विविध ठिकाणी सलग ४० दिवस ध्यानवर्ग घेण्यात आले होते. या उपक्रमाची दखल घेऊनच संस्थेला हा राज्यस्तरीय सन्मान प्रदान करण्यात आला.

यावेळी रुपेश लड्ढा यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पुढील टप्प्यात संपूर्ण वाशीम जिल्हा ध्यानमय करण्याचा संकल्प आहे. जिल्ह्यातील कोणत्याही गावात स्वतःच्या खर्चाने जाऊन, आवश्यक ध्वनीप्रणालीसह नि:शुल्क ध्यानवर्ग घेण्याची तयारी असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येक नागरिकाला उत्तम शारीरिक व मानसिक आरोग्य लाभावे, हाच या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

---

## प्रतिबंधित गुटखा व पेट्रोल-डिझेल विक्रीवर ग्रामीण पोलिसांची कारवाई

### १८ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त; एकावर गुन्हा दाखल

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रतिबंधित गुटखा तसेच पेट्रोल-डिझेलची अवैध विक्री करणाऱ्या एका किराणा दुकानदारावर पोलिसांनी कारवाई करत १८ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई ग्राम अकोली जहांगिर (ता. अकोट) येथे करण्यात आली.

अकोट ग्रामीण पोलीस पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, अकोली जहांगिर येथील वासुदेव गोविंदराव मेहरे हा गणेश किराणा दुकानातून शासनाने प्रतिबंधित केलेला पानमसाला व गुटखा विक्री करीत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसह दुकानाची झडती घेतली.



झडतीदरम्यान दुकानातून विमल पानमसाला गुटखाचे ४९ सीलबंद पाकिटे (किंमत ७,३५० रुपये) तसेच व्ही -१ तंबाखूचे ४९ पाकिटे (किंमत १,४७० रुपये) असा एकूण ८,८२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. याशिवाय प्लास्टिकच्या कॅनमध्ये साठवून ठेवलेले ४० लिटर डिझेल (४,००० रुपये), २० लिटर डिझेल (२,००० रुपये) आणि ३५ लिटर पेट्रोल (३,५०० रुपये) असा ९,५०० रुपयांचा इंधनसाठा देखील जप्त करण्यात आला. एकूण १८,३२० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

या प्रकरणी आरोपी वासुदेव मेहरे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३, २७४, २७५, १२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम आणि जीवनावश्यक वस्तू अधिनियमातील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहायक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, पोउपनि वैभव तायडे, पोहेकॉ विठ्ठल चव्हाण, मोहम्मद नौरंगाबादी, मपोहेकॉ गीता भांगे, पोकॉ शैलेश जाधव, शुभम लुंगे व चालक पोकॉ अमोल मस्के यांनी ही कारवाई केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोउपनि वैभव तायडे करीत आहेत.

---

## जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

स्थानिक विद्याभारती महाविद्यालय कारंजा येथे दि. ५ फेब्रुवारी रोजी आमदार सईताई प्रकाशदादा डहाके यांच्या मार्गदर्शनाखाली जागर स्त्री शक्तीचा, महिला सबलिकरण या उपक्रमा द्वारे प्रत्येक महिलेला सामाजिक राजकीय विविध अशा विविध क्षेत्रात प्रेरणा मिळावी या दृष्टिकोनातून शिक्षण विभाग पंचायत समिती कारंजा, व विद्याभारती महाविद्यालय यांच्या सहकार्याने आज विविध स्पर्धेचे उदघाट्न करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य अतुल बरडे, उदघाटक तेजस्विनी डहाके, प्रमुख अतिथी गटविकासअधिकारी पूनम राणे, गट शिक्षणाधिकारी श्रीकांत माने, तसेच नगर सेविका कुसुमताई अघम, नगर परिषद गटनेत्या शालिनी ठाकरे, वैशाली गुल्हाने, वंदना धार्डीकर, माजी प्राचार्य प्रविण कानकिरड, गोविंद शाळेचे संचालक संतोष चौधरी प्रामुख्याने उपस्थित होते.




प्रमुख व्याख्याता म्हणून डॉ सुषमा उपाध्ये उपस्थित होत्या त्यांच्या व्याख्यानातून त्यांनी महिला आरोग्य विषयी सखोल मार्गदर्शन केले परीक्षक म्हणून प्रा. ठकसेन राजगुरे, प्रा. विद्या रोकडे प्रा. गजानन चौधरी यांनी केले.प्रास्तविकातून पूनम राणे यांनी महिला सक्षमिकरण या विषयी विविध उदाहरणं देत जागृती करणे काळाची गरज आहे, असे सांगितले. उदघाट्क म्हणून तेजस्विनी डहाके यांनी स्त्री संरक्षण हि काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख अतिथी म्हणून श्रीकांत माने यांनी स्त्रियामध्ये आत्मनिर्भरता आणण्यासाठी असे उपक्रम राबविल्याबद्दल आमदार सईताई डहाके यांचे आभार मानले, त्यानंतर वक्तृत्व स्पर्धा पार पडली त्यामध्ये वीस स्पर्धकांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन मुख्याध्यापिका जया खंडागळे यांनी केले तर आभार प्रदर्शन पदविधर शिक्षक नंदकिशोर भोयर यांनी केले.

---

## मालेगाव तलावातील अवैध पाणी उपसा थांबवण्याची मागणी

### मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेचे लघु पाटबंधारे विभागाला निवेदन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव (केळी) येथील तलावातून सुरू असलेला अवैध पाणी उपसा तात्काळ बंद करण्यात यावा, अशी मागणी मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेचे अध्यक्ष शहा फकिर यांनी केली आहे. याबाबत त्यांनी ता. ४ मार्च रोजी लघु पाटबंधारे विभागाकडे लेखी निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, मालेगाव, केळी, भेरा, अमानी आणि शिरपूर परिसरातील काही शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पिकांसाठी तलावातील पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला. पाणी उपसा करताना ३ एच.पी. पंपाची परवानगी असताना अनेकांनी ५ ते ७ हार्सपॉवरचे पंप वापरले. तसेच काहींनी वीज तारांवर हूक टाकून चोरीच्या विजेवरून पाण्याचा वारेमाप उपसा केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

या अवैध उपशामुळे शंभर टक्के भरलेला तलाव सध्या मृत जलसाठ्यावर आला असून, परिस्थिती गंभीर बनली आहे. अवैध पाणी उपसा तात्काळ थांबवला नाही तर परिसरातील जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच गाडगेबाबा नगर, मुंगसाजी नगर, जामा मशिद परिसर आणि अकोला फाटा या भागातही तीव्र पाणीटंचाई भासू शकते, असेही निवेदनात म्हटले आहे. म्हणून प्रशासनाने तातडीने कारवाई करून तलावातील अवैध पाणी उपसा बंद करावा, अशी मागणी मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेचे अध्यक्ष शहा फकिर यांनी केली आहे.

---

## स्वामिनी फार्मा प्रॉड्युसर कंपनी स्वामिनी ट्रेडर्स उद्‌घाटन सोहळा उत्साहात

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगांव तालुक्यातील दुबळवेल येथे युवा उद्योगक गोपाल देवढे यांनी पुढाकार घेऊन, स्वामिनी फार्मा प्रॉड्युसर कंपनीच्या माध्यमातून शेतीला पर्यायी असलेले, चिया सारख्या पिकाचे processig unit उभे करून. अनेक युवा शेतकरी मंडळीसाठी एक चांगला आदर्श उभा केला.

आज शेती मध्ये बदलत्या हवामानानुसार आपल्या पारंपारिक सोयाबीन, हरभरा या पिकांची उत्पादन क्षमता कमी होतं आहे,आणि अश्या परिस्थितीमध्ये अनेक युवा शेतकरी चिया सारख्या पिकाचा पर्याय अवलंबत आहेत. आपण जर बघितले तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजार पेठेमध्ये चियाला मोठी मागणी होत



असताना आपल्या शेतकऱ्यांना आपल्याच जिल्ह्यामध्ये दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी आज स्वामिनी फार्मा प्रॉड्युसर कंपनीचे चिया ज्देमेग्हु ल्हू महत्वाचे ठरणार आहे. असे विचार उद्‌घाटन प्रसंगी शिवसेना संपर्क प्रमुख संजनाताई गवळी पाटील यांनी व्यक्त केले. या उद्‌घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी योगेशजी कुंभेजकर, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक पुनम घुले , ज्येष्ठ पत्रकार माधवरावजी अंभोरे, वाशिम नगराध्यक्ष अनिलजी केंदळे, शिवसेना जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे, विजय खानझोडे , जिल्हा समन्वयक गजानन शिंदे, शिवसेना तालुका प्रमुख प्रदीप पाटील कुटे, उपजिल्हाप्रमुख मंगेश महाराज घुगे, लक्ष्मणराव गावंडे, संजय भुतेकर, तालुका समन्वक विलासराव जाधव, राजेश कव्हर, व इतर मान्यवर उपस्थित होते.

---

## किशोरचंद हजारी यांचे निधन



**मूर्तिजापूर :** येथील जुनी वस्ती, मलाईपुरा परिसरात राहणारे जेष्ठ नागरिक, सदन कास्तकार तसेच हजारी गणपती मठाचे अध्यक्ष किशोरचंद त्रिलोकचंद हजारी यांचे शुक्रवार, ६ मार्च रोजी दुपारी ४ वाजता निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

किशोरचंद हजारी हे ॲड. राजेश हजारी यांचे वडील तसेच आशिष राजेश हजारी व अनुज राजेश हजारी यांचे आजोबा होते. सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रात त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांनी तब्बल १२ वर्षे कृषी उत्पन्न बाजार समिती, मूर्तिजापूरचे संचालक म्हणून काम पाहिले होते. तसेच ते मूर्तिजापूर पंचायत समितीचे सदस्यही राहिले होते. त्यांच्या पश्चात चार मुली, एक मुलगा, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा आज शनिवार, ७ मार्च रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या जुनी वस्ती, मलाईपुरा येथील निवासस्थानातून निघून देवरण रोडवरील मोक्षधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी जाणार आहे.

---

## आजपासून छत्रपती शिवाजी महाराज महाराज्यस्व समाधान शिबीर

### तहसीलदार राजेंद्र पाटील यांची माहिती

**मानोरा :** तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराज्यस्व अभियान समाधान शिबीर टप्पा क्रमांक १ ची अंमलबजावणी करण्याबाबत तहसीलदार राजेंद्र पाटील यांनी ५ मार्च गुरुवार रोजी तहसील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली.

तालुक्यात महसूल व वनविभाग यांच्या निर्णयानुसार छत्रपती शिवाजी महाराज महराज्यस्व अभियान समाधान शिबीर अभियान टप्पा क्रमांक १ ची अंमलबजावणी करण्यासंदर्भात तसेच शिबीरात करावयाच्या कामकाजाबाबत तहसीलदार यांनी माहिती दिली. प्रलंबीत असलेली फेरफार निकाली काढणे, अभिलेखे दुरुस्ती हेल्पडेक्स, सातबारावरील चुका संदर्भात अर्ज स्विकारणे, आवश्यक कागदपत्राची तपासणी, त्रृटी सूची देणे



व तात्काळ करता येणाऱ्या दुरुस्त्यांची नोंद घेणे या डेक्सवर भुमीअभिलेख विभागातील एक कर्मचारी उपस्थित राहणार आहे. लोक सेवा हक्क कायद्यासंदर्भात उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी पत्र, आदिवास प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉनक्रिलियर प्रमाणपत्र बाबत अर्ज स्विकारणे व सेवाची माहिती देणे, अकृषक तरतुदी संदर्भातील मार्गदर्शन करणे, नवीन संदर्भात माहिती देणे, सातबारा मोाहिमेंतर्गत कामे करणे, मयत झालेल्या खातेदाराचा शोध घेवून त्यापुढील कार्यवाही करणे, तुकडेबंदी कायद्यांतर्गत मोहिमेची माहिती देणे, नवीन सुधारणा आलेली आहे. त्याचीही माहिती देणे, मंडळ स्तरावरील सर्व शाळांचा आढावा घेवून शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रमाणपत्र वाटप करणे, पांदण रस्त्याची प्रशासकीय मान्यता देणे व कार्यवाही करणे, सर्वांसाठी घरे अंतर्गत पट्टे वाटपाची माहिती देणे, डिजिटल सातबाराला कायदेशील वैधता असल्याबाबत जनजागृती करणे, भुसंपादन केलेल्या अकृषीक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमीजास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करणे, सुधारणा व नागरी सुविधा अंतर्गत योजनांची माहिती देणे, हि मोजणी अ?ग्रीस्टॅग, पीएम किसान योजनेची माहिती देणे याचा समावेश असल्याचे तहसीलदार पाटील यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला नगर पंचायतचे मुख्याधिकारी राठोड, नायब तहसीलदार मधुकर अष्टुरे आदी उपस्थित होते.

मानोरा तालुक्यातील शिबीराचे वेळापत्रक!

७ मार्च रोजी उमरी बु, १४ मार्च रोजी शेंदूरजना आढाव, १० एप्रिल रोजी कुपटा, १७ एप्रिल रोजी इंझोरी, ८ मे रोजी मानोरा शहर, १५ मे रोजी गिरोली या एकूण ६ महसूल मंडळात शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ९९ ■ शनिवार, ७ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# घरच्या चुलीतून युपीएससीचे स्वप्न साकार; किराणा दुकानदाराचा मुलगा प्रज्वल नासरे बनला ६७७ वा रँकर



**कारंजा (घा.) जनमाध्यम :** ठाणेगाव येथील प्रज्वल धनराज नासरेने युपीएससी परीक्षेत भारतात ६७७ वा रँक मिळवून गावाच्या नावाचा तुरा उंच केला आहे. साध्या कुटुंबातील प्रज्वलचे वडील किरणा दुकानदार, तर आई गृहिणी आहेत.

ग्रामीण भागातील साध्या परिस्थितीत वाढलेल्या प्रज्वलने कुठलीही ऑफलाइन कोचिंग न घेता, घरीच राहून ऑनलाईन अभ्यास केला. सततच्या चिकाटीने आणि नियमित तयारीने त्याने स्वप्न साकार केले. प्रज्वलचे प्राथमिक शिक्षण स्व. राजीव गांधी मेमोरीयल इंग्लिश हायस्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज मध्ये झाले, तर नवोदयच्या माध्यमातून सहावी ते बारावीपर्यंतचे शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय, सेलू (काटे) येथे पूर्ण केले. त्यानंतर मुत विद्यापीठातून बी.ए. व एम.ए. पूर्ण करून तो तयारीत गढून बसला.

युपीएससीची तयारी करत असताना दोन वेळा अपयश आले, तरी त्याने हार मानली नाही. तिसऱ्या प्रयत्नात मिळालेल्या यशाने कुटुंब, शिक्षक व मित्रपरिवारात आनंदाची लहर पसरली. आ. सुमित वानखेडे, राष्ट्रीय युवा उदय संस्थेच्या अध्यक्ष अरुणा चाफले, शिक्षक व प्राचार्य जनार्दन धोटे, संस्थेचे सचिव पियुष चाफले यांच्यासह नवोदयचे शिक्षक आणि मित्रपरिवार यांनी प्रज्वलचे अभिनंदन केले.

साध्या परिस्थितीतून घरच्या अभ्यासाने प्रज्वलने मिळवलेले हे यश ग्रामीण तरुणांसाठी प्रेरणादायी ठरले आहे, की चिकाटी आणि प्रयत्नाने कोणतेही स्वप्न सत्यात उतरवता येते.

# युद्धाच्या छायेत वर्ध्याची तीन जीवं; मायदेशाकडे परतीची आस

**वर्धा जनमाध्यम :** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या तणावामुळे वर्धा शहरातील तीन नागरिक अडकले असून त्यांना सुरक्षित परत आणण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. यात एका दाम्पत्यासह एका तरुणीचा समावेश आहे.

युनायटेड स्टेट्स आणि इस्त्रायल यांनी इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर आखाती देशांमध्ये अस्थिरता निर्माण झाली आहे. विमानसेवा तात्पुरत्या बंद झाल्यामुळे अनेक भारतीय प्रवासी अडकले आहेत.

वर्ध्यातील रहिवासी आणि मुंबईतील आयटी कंपनीत कार्यरत कल्याणी डेकाटे ९ फेब्रुवारी रोजी पाच सहकाऱ्यांसह Bahrain येथे कामासाठी गेली होती. ४२ दिवसांच्या प्रकल्पासाठी गेलेल्या कल्याणीचा व्हिसा २४ मार्चपर्यंत वैध आहे. तिचे वडील भास्कर डेकाटे यांनी तिला सुरक्षित परत आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडे अर्ज केला आहे. राजेश आणि किरण शाहू हे दाम्पत्य दहा दिवसांपूर्वी पर्यटनासाठी संयुक्त अरब अमिराती मधील अबू धाबी येथे गेले होते. सध्या ते हॉटेलमध्ये सुरक्षित आहेत, परंतु परिस्थिती अनिश्चित आहे.

शुभम शाहू यांनी सांगितले की, जिल्हा प्रशासनाने शनिवारी, ७ मार्च रोजी आई-वडीलांना परत आणण्याची अधिकृत माहिती दिली. प्रशासनाचा सहकार्य अमूल्य आहे. प्रशासन संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून तिघांच्या सुरक्षित परतीसाठी प्रयत्न करत आहे.

# ऐन परीक्षेत वर्धा-साती बसफेरी बंद; विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय

**मोझरी (शेकापूर) जनमाध्यम :** वर्धा आगारातून सुटणारी वर्धा ते साती (वरुड) मुक्कामी बसफेरी गेल्या आठ दिवसांपासून अचानक बंद करण्यात आल्याने मोझरी-शेकापूर परिसरातील विद्यार्थ्यांसह प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. ऐन परीक्षा काळात बस सेवा बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा शिक्षणप्रवास विस्कळीत झाला आहे.

हिंगणघाट तालुक्यातील मोझरी, शेकापूर, साती, खानगाव, वरुड, भैय्यापूर, डवलापूर, पोटी आदी गावांतील विद्यार्थी शिक्षणासाठी दररोज वर्धा, वायगाव, सरूळ व कानगाव येथे एसटीने ये-जा करतात. मात्र गेल्या काही दिवसांपासून बसफेरी बंद झाल्यामुळे विद्यार्थी सकाळी सहा वाजताच्या सुमारास बसस्थानकावर येतात आणि बस न आल्याने निराश होऊन परत घरी जात असल्याचे चित्र दिसत आहे. दररोज सायंकाळी ७.१५ वाजता वर्ध्याहून सुटणारी वर्धा-साती मुक्कामी बस तसेच सकाळी पावणेसहा वाजता सातीहून सुटणारी बसफेरी अचानक बंद करण्यात आल्याने विद्यार्थ्यांसह प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. परिणामी अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी वर्धा किंवा वायगाव येथे भाड्याने खोली घेऊन राहावे लागत असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. याशिवाय वर्धा-वरुड (साती) ही सकाळी सव्वा सहा वाजताची बसफेरी कोरोनानंतर आजपर्यंत सुरू करण्यात आलेली नाही. ही बसफेरी विद्यार्थ्यांसाठी अत्यंत सोयीची असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. बंद पडलेल्या बसफेऱ्या तातडीने सुरू कराव्यात, यासाठी नागरिकांनी अनेकदा संबंधित विभागाला निवेदने दिली आहेत. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे लक्ष देऊन विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातील नागरिक व पालकांकडून करण्यात येत आहे

# सिंदीचे स्टेडियम दारुड्यांच्या ताब्यात

## पालिकेच्या निष्काळजीपणामुळे खेळाडूंना बसला दारुण फटका

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** कबड्डीपटूंचे शहर म्हणून ओळख असलेल्या सिंदी रेल्वेतील नगरपालिकेचे एकमेव क्रीडांगण सध्या असामाजिक घटकांच्या ताब्यात गेले असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. अपूर्ण संरक्षण भिंत, निकृष्ट सुविधा आणि पालिका प्रशासनाची ढिलाई यामुळे हे मैदान खेळाडूंसाठी नसून दारुड्यांसाठीच खुले झाले आहे. मैदानावर खेळाडूंपेक्षा दारू पिणारे आणि सिगारेट ओढणाऱ्यांचीच जास्त गर्दी दिसत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.





कबड्डीचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंदी शहरात खेळाडूंची संख्या मोठी आहे. अनेक वर्षांच्या मागणीनंतर नगरपालिकेने भव्य क्रीडांगण उभारले. मात्र पाच वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेले हे मैदान आजही अपूर्ण सुविधांच्या विळख्यात अडकले आहे. मैदानाभोवती संपूर्ण संरक्षण भिंत नसल्याने मोकाट जनावरांचा वावर वाढला असून सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. खेळाडूंसाठी पिण्याचे पाणी, स्वतंत्र ड्रेसिंग रूम, शौचालय, बाथरूम, प्राथमिक उपचार केंद्र, तसेच पार्किंग यांसारख्या मूलभूत सुविधांचा पूर्णतः अभाव आहे.

मैदानातील पादचारी ट्रॅकही अपूर्ण अवस्थेत असल्याने सकाळी व संध्याकाळी शतपावलीसाठी येणाऱ्या नागरिकांचा हिरमोड होतो. मैदानात बसविण्यात आलेला हायमास्ट दिवा एका कोपऱ्यात असल्याने उर्वरित मैदान अंधारात बुडते. याच अंधाराचा फायदा घेत रात्री येथे दारूच्या मैफिली रंगतात. 'रात्रीस खेळ चाले' या म्हणीप्रमाणे येथे मिसरूड न फुटलेली तरुणाई सिगारेटचा धूर उडवत बसते, तर काही जण बाटल्या रिकाम्या करण्यात मश्गूल असतात. परिणामी मैदानात प्लास्टिकचे ग्लास, चकण्याची पाकिटे आणि रिकाम्या देशी-विदेशी दारूच्या बाटल्यांचा अक्षरशः खच साचलेला दिसतो.

इतकेच नव्हे तर येथे उभारलेले ओपन जिमचे साहित्यही अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याने अनेक उपकरणे मोडकळीस आली आहेत. व्यायामासाठी येणाऱ्या युवक-युवतींना दुखापत झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे शहरातील हे एकमेव क्रीडांगण खेळाडूंसाठी पांढरा हत्ती ठरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

येथे नियमित स्वच्छता व देखरेख होत नसल्याने आणि संरक्षण भिंत नसल्याने असामाजिक तत्त्वांना मोकळे रान मिळाले आहे. परिणामी हे मैदान कमी आणि अड्डा जास्त झाले आहे.

**गौरव कलोडे, कबड्डीपटू, सिंदी रेल्वे**

देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे झाली; मात्र ग्रामीण भागात अद्याप क्रीडा सुविधांची वानवा आहे. पोलिस भरतीची तयारी करायची म्हटली तरी योग्य मैदान उपलब्ध नसल्याचे दुःख वाटते.

**सोनल कोपरकर, पोलिस भरतीची तयारी करणारी युवती**

स्टेडियममधील अपूर्ण कामे व आवश्यक सुविधांबाबत शासनाकडे माहिती पाठविली आहे. निधी उपलब्ध होताच कामे केली जातील. तसेच संपूर्ण स्टेडियम लवकरच सीसीटीव्हीच्या कक्षेत आणण्यात येणार आहे.

**पौर्णिमा गावीत, मुख्याधिकारी, नगर परिषद सिंदी रेल्वे**

# पालकमंत्री नारी शक्ती सन्मान सोहळा व अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचा कला व सांस्कृतिक महोत्सव

## -महिला दिनी ८ मार्च रोजी विशेष कार्यक्रम -पालकमंत्र्यांच्याहस्ते होणार महिलांचा गौरव

**वर्धा जनमाध्यम :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत दिनांक ८ मार्च रोजी पालकमंत्री नारी शक्ती सन्मान सोहळा तसेच अंगणवाडी सेविका, मदतनिस यांच्या कला व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. चरखा सभागृह, सेवाग्राम येथे आयोजित या कार्यक्रमात नारी शक्तीचा गौरव तसेच विविध कला व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटक तथा अध्यक्ष म्हणून पालकमंत्री डॉ.पंकज भोयर उपस्थित राहतील. विशेश अतिथी म्हणून खा.अमर काळे, आ.दादाराव केचे, आ.अभिजित वंजारी, आ.सुधाकर अडबाले, आ.समीर कुणावार, आ.राजेश बकाने, आ.सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, गिमाटेक्सच्या संचालक प्रेमलतादेवी मोहोता, एमआयटी पुणेच्या विश्वस्त प्रा.स्वाती कराड-चाटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले आदी उपस्थित राहणार आहे.



सकाळी १०.३० वाजता उद्घाटन तथा नारी शक्ती सन्मान सोहळा पार पडेल. तत्पूर्वी कला व सांस्कृतिक महोत्सवांतर्गत सकाळी ८ वाजता रांगोळी व वैयक्तिक कला स्पर्धा होईल. उद्घाटनानंतर सकाळी ११.३० वाजता सामुहिक व वैयक्तिक गायन स्पर्धा, दुपारी १.३० वाजता भोजन, दुपारी २.१५ वाजता सामुहिक नृत्य व वक्तृत्व स्पर्धा, सायंकाळी ५.३० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम व वैयक्तिक नृत्य स्पर्धा होणार आहे.

सायंकाळी ७.३० वाजता कला व सांस्कृतिक महोत्सवाचे बक्षिस वितरण व समारोप होणार आहे. नारी शक्ती सन्मान सोहळा तसेच कला व सांस्कृतिक महोत्सवात अंगणवाडी सेविका, मदतनिस यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महिला व बालविकासच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा कुरसंगे यांनी केले आहे.

# वर्धा-वायफड मार्गावर अपघात; चिमुकलीचा मृत्यू, आई-वडील गंभीर

**रोहणा/वर्धा जनमाध्यम :** वर्धा-वायफड मार्गावर झालेल्या दुर्दैवी अपघातात रोहणा येथील समृद्धी वैभव लोहकरे या चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला, तर तिचे आई-वडील गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे रोहणा गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रोहणा येथील वैभव लोहकरे हे पत्नी व मुलीसह काही कामानिमित्त वर्धा येथे गेले होते. काम आटोपल्यानंतर ते दुचाकीने वायफड मार्गे आपल्या गावी परतत होते. दरम्यान, वर्धा-वायफड मार्गावर त्यांच्या दुचाकीचा अपघात झाला. अपघात इतका भीषण होता की समृद्धी लोहकरे हिचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली. गंभीर जखमी झालेल्या वैभव लोहकरे आणि त्यांच्या पत्नीला उपचारासाठी वर्धा येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. दरम्यान, लोहकरे कुटुंब मनमिळावू स्वभावाचे असल्याने या दुर्दैवी घटनेने रोहणा गावात शोककळा पसरली आहे. एका निष्पाप चिमुकलीच्या अकाली मृत्यूने गावकऱ्यांना मोठा धक्का बसला असून जखमी दाम्पत्य लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

# नागपाल हत्याकांडाच्या निषेधार्थ वर्धेत मूक मोर्चा

## -आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी; प्रशासनाला निवेदन

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा–पुलगाव येथील वाळू व्यावसायिक भरत नागपाल यांच्या निर्घृण खून प्रकरणाचा तीव्र निषेध नोंदवत आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी करत मित्र परिवार, व्यापारी मित्र परिवार तसेच पंजाबी सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (६ मार्च) वर्ध्यात मूक मोर्चा काढण्यात आला. नामदेव मठापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत निघालेल्या या मोर्चातून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

वरोरा तालुक्यातील बामर्डा वाळू घाटावर भरत नागपाल यांच्यावर दहा ते बारा जणांच्या टोळीने प्राणघातक हल्ला केला होता. या भीषण हल्ल्यात नागपाल यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर त्यांच्या काही साथीदारांना गंभीर दुखापत झाली. या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत १२ आरोपींना अटक केली असून त्यांना ९ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत आणि दोषींना कठोर शिक्षा व्हावी, या मागण्यांसाठी शहरातील व्यापारी, मित्रपरिवार व पंजाबी सेवा समितीच्या वतीने शांततापूर्ण मूक मोर्चा काढण्यात आला. आंदोलनकर्त्यांनी आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, तपास सीआयडीकडे द्यावा तसेच फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवावा, अशा मागण्यांची फलक हातात घेऊन घोषणाविरहित आंदोलन केले.

# अंत्ययात्रेत मधमाशांचा थैमान; तिरडी सोडून जीव वाचवण्यासाठी धावाधाव

**हिंगणघाट जनमाध्यम:** तालुक्यातील अल्लीपूर येथे अंत्ययात्रेदरम्यान मधमाशांनी अचानक हल्ला केल्याने मोठी धावपळ उडाली. अंत्यसंस्कारासाठी जमलेल्या नागरिकांवर मधमाशांनी झडप घातल्याने उपस्थितांना जीव वाचवण्यासाठी तिरडीवरील पार्थिवही स्मशानभूमीच्या वाटेतच सोडून पळ काढावा लागला. या घटनेत ३० जणांना मधमाशांनी दंश केला असून त्यापैकी सहा जणांची प्रकृती गंभीर आहे.

अल्लीपूर येथील वसंत बेले यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या पार्थिवाची अंत्ययात्रा राहत्या घरातून मोक्षधामाकडे नेण्यात आली होती. स्मशानभूमीत परंपरेनुसार अंत्यसंस्काराची प्रक्रिया सुरू असताना विसाव्याची विधी चालू होती. त्यावेळी आकटयाच्या मडक्यातून उठलेल्या धुरामुळे जवळील झाडावर असलेल्या मधमाशांच्या पोळ्यात हालचाल झाली. धुरामुळे चिडलेल्या मधमाशांनी अचानक उपस्थितांवर हल्ला चढवला. या अनपेक्षित प्रकारामुळे अंत्ययात्रेत सहभागी झालेल्यांमध्ये एकच गोंधळ उडाला. मधमाशांच्या दंशापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी जीवाच्या आकांताने पळ काढला. परिस्थिती इतकी गंभीर झाली की काही काळासाठी तिरडीवरील पार्थिवही स्मशानभूमीच्या वाटेतच सोडावे लागले. सुमारे दीड ते दोन तास परिसरात भीतीचे वातावरण होते.

नंतर परिस्थिती काहीशी निवळल्यानंतर काही धाडसी नागरिकांनी पुन्हा स्मशानभूमीत जाऊन अंत्यसंस्काराची प्रक्रिया पूर्ण केली.

या घटनेत ३० जणांना मधमाशांनी दंश केला. त्यापैकी २४ जणांवर अल्लीपूर ग्रामीण रुग्णालयात उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले. तर वामन पिंपलापुरे, रामदास बेले, सतीश खोंड, महेंद्र बेले, उमेश बेले आणि गजानन बेले यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे.

**बजेटवर प्रतिक्रिया**

# शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळणारा अर्थसंकल्प : डॉ. भोयर

**वर्धा :** मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला राज्याचा अर्थसंकल्प सर्वसामान्यांच्या हिताचा असून शेतकरी बांधवांना दिलेला शब्द त्यांनी पाळला आहे, अशी प्रतिक्रिया राज्यमंत्री व वर्धा-भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ, पंकज भोयर यांनी व्यक्त केली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. तसेच वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे विदर्भातील मोठे क्षेत्र सिंचनाखाली येणार असून शेतकऱ्यांना दीर्घकालीन फायदा होईल. महिला सक्षमीकरण, 'लाडकी बहिण' योजना, पायाभूत सुविधा विकास आणि शिक्षण-आरोग्य क्षेत्रासाठीही भरीव तरतूद करण्यात आल्याने हा अर्थसंकल्प राज्याच्या विकासाला गती देणारा असल्याचे भोयर यांनी सांगितले.



## शेतकरी व विकासाभिमुख अर्थसंकल्प : संजय गाते

**वर्धा :** राज्याचा अर्थसंकल्प शेतकरी व सर्वसामान्यांच्या हिताचा असून राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा आहे, अशी प्रतिक्रिया भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय गाते यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री व वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची घोषणा तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.



## अर्थसंकल्पात आकड्यांचा फुगा; जनतेच्या तोंडाला पाने पुसली : खा. अमर काळे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा विकासाचा आराखडा नसून आकड्यांचा फुगा असल्याचा घणाघाती आरोप खासदार अमर काळे यांनी केला. हा अर्थसंकल्प म्हणजे जनतेच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार असून केवळ घोषणांचा बाजार मांडून सरकारने सर्वसामान्यांची दिशाभूल केल्याची टीका त्यांनी केली. राज्यावर कर्जाचा प्रचंड डोंगर उभा राहत असताना सरकार मात्र विकासाच्या गप्पा मारत आहे. राज्यात बेरोजगारीने तरुण हैराण असताना केवळ ७५ हजार नोकरभरतीची घोषणा करून सरकारने आश्वासनांची खैरात वाटली आहे. 'लाडकी बहीण' योजनेत महिलांना २१०० रुपये देण्याचे गाजावाजा करून निवडणुका जिंकल्या; मात्र प्रत्यक्षात ते आश्वासन अद्याप हवेतच आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.



## ऐतिहासिक व सर्वसमावेशक अर्थसंकल्प: आमदार सुमित वानखेडे

**वर्धा :** राज्याचे मुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा शेतकरी, कष्टकरी आणि महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देणारा ऐतिहासिक अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया आर्वीचे आमदार सुमित वानखेडे यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांसाठी 'अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी' योजना, नियमित कर्ज फेडणाऱ्यांना प्रोत्साहन अनुदान, तसेच 'लाडकी बहीण' व 'लखपती दीदी' उपक्रमामुळे महिलांना आर्थिक बळ मिळणार आहे. वैनगंगा-नळगंगा-पैनगंगा प्रकल्पास मान्यता मिळाल्याने सिंचनाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.



## अर्थसंकल्पात आकड्यांचा खेळ; सर्वसामान्यांना दिलासा नाही : रणजित कांबळे

**वर्धा :** राज्याचा अर्थसंकल्प केवळ मोठ्या आकड्यांचा खेळ असून सर्वसामान्य, शेतकरी व बेरोजगार तरुणांना यातून कोणताही ठोस दिलासा मिळालेला नाही, अशी टीका माजी मंत्री व प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष रणजित कांबळे यांनी केली. मुख्यमंत्री व वित्तमंत्री फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात पोकळ घोषणा अधिक असून प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत स्पष्टता नसल्याचा आरोप त्यांनी केला. राज्यावर वाढत असलेला कर्जबोजा चिंताजनक असून आर्थिक तूटही मोठी आहे. बेरोजगारीचे संकट गंभीर असताना केवळ ७५ हजार नोकऱ्यांची घोषणा करण्यात आली आहे. 'लाडकी बहिण' योजनेबाबतही सरकारने मोठ्या घोषणा केल्या असल्या तरी निधीबाबत ठोस निर्णय दिसत नाही, असे कांबळे यांनी नमूद केले.



## संपूर्ण कर्जमाफीऐवजी शेतकऱ्यांच्या तोंडाला पान पुसणारा अर्थसंकल्प - अतुल वांदिले

राज्याचे मुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला अर्थसंकल्प शेतकरी, महिला व बेरोजगार तरुणांच्या अपेक्षांना न्याय देणारा नाही, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी केली. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीची अपेक्षा असताना सरकारने केवळ दोन लाखांपर्यंत कर्जमाफी जाहीर करून बळीराजाच्या तोंडाला पान पुसल्याचा आरोप त्यांनी केला. वाढते उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती आणि कर्जाच्या ओझ्यामुळे शेतकरी अडचणीत असताना ठोस उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. हा अर्थसंकल्प केवळ घोषणा व आश्वासनांचा पाऊस पाडणारा ठरल्याची टीकाही वांदिले यांनी केली.



## शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्यांसाठी निराशाजनक अर्थसंकल्प:डॉ. अभ्युदय मेघे

महाराष्ट्राचा सादर झालेला अर्थसंकल्प शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षांवर पाणी फेरणारा असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव डॉ. अभ्युदय मेघे यांनी व्यक्त केली. ग्रामीण विकासापेक्षा सरकारने शहरी मतदारांना खूश करण्यावर भर दिला असून मेट्रोसारख्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात आले आहे, असे त्यांनी म्हटले. तसेच 'लाडकी बहिण' योजनेत २१०० रुपये देण्याचे आश्वासन असूनही अर्थसंकल्पात त्याचा स्पष्ट उल्लेख नसल्याने महिलांमध्ये नाराजी वाढली आहे. एकूणच हा अर्थसंकल्प निराशाजनक असल्याची टीका त्यांनी केली.



## शेतकरी व विदर्भाच्या विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प – सरीता गाखरे

महाराष्ट्राचा सादर झालेला अर्थसंकल्प सर्वसमावेशक व विकासाला गती देणारा असल्याची प्रतिक्रिया माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सरीता गाखरे यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेल्या या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीसह विविध योजनांची तरतूद करण्यात आल्याने बळीराजाला मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पांमुळे विदर्भाच्या औद्योगिक व आर्थिक प्रगतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विकसित महाराष्ट्र २०४७ चे ध्येय साध्य करण्यासाठी हा अर्थसंकल्प महत्त्वाचा ठरेल, असेही गाखरे यांनी सांगितले.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## राज्यसभा बिनविरोध

राज्यसभेच्या सात जागांसाठी महाराष्ट्रात अपेक्षेप्रमाणे सातच उमेदवारी अर्ज दाखल झाले. निवडणूक बिनविरोध होणार आणि हे सातही उमेदवार अलगद राज्यसभेत जाणार हेही त्यामुळे स्पष्ट झाले. निवडणुका आल्या, की इच्छुकांची नावे, त्यांच्यातील चढाओढ, पक्षांसाठी सोयीचे गणित, संभाव्य उमेदवारांची नावे हे सगळं वर्षानुवर्ष चालत आले आहे. ते यावेळीही झाले. पण, भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेच्या पक्षश्रेष्ठींनी बहुतेक अंदाज खोटे ठरवत नवे उमेदवार दिल्याने आता आणखी काही दिवस 'पक्षांनी हे उमेदवार निवडून कोणकोणत्या गोष्टी साध्य केल्या' याची चर्चा प्रसिद्धी माध्यमांतून होत राहील. भारतीय जनता पक्षाचे चार, शिवसेनेचा एक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा एक उमेदवार सहज निवडून येणार हे स्पष्ट होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), उबाठा आणि काँग्रेस या तीन पक्षांचा मिळून एकच उमेदवार निवडून येणे शक्य असल्याने या तिन्ही पक्षांतून उमेदवार कोण, याची उत्सुकता सर्वाधिक होती. राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाकडून राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवारच पुन्हा इच्छुक आहेत, हे महिनाभरापूर्वीच अप्रत्यक्षरीत्या सूचित झाले होते. त्याला काँग्रेसच्या राज्यातल्या नेत्यांची फार तयारी नव्हती, उबाठाची सुरुवातीला होती; पण नंतर बदलली. पडद्याआडच्या चर्चात जेव्हा शरद पवार यांची इच्छा स्पष्ट झाली, तेव्हा उबाठाच्या प्रवक्त्यांनी नेहमीच्या आगाऊ उत्साहाने पवार यांचे गुणगान गात त्यांच्या नावाचा जाहीर पुरस्कार केला. आपला पक्ष आपणच चालवतो, असे दाखवण्याची एकही संधी ते सोडत नाहीत. त्यातलाच हा प्रकार होता. पण, झाले भलतेच. युवराजांच्या मनात विद्यमान खासदार प्रियंका चतुर्वेदी होत्या, प्रवक्त्यांना वेळोवेळी वेसण घालण्यासाठी चतुर्वेदी यांच्या हिंदी, इंग्रजीवरील प्रभुत्वाचा, दिल्लीतील रहिवासाचा युवराजांना मोठा उपयोग होतो. त्यासाठी त्यांना चतुर्वेदी दिल्लीतच हव्या होत्या. युवराजांनी दम भरल्यानंतर प्रवक्त्यांची भाषा अचानक बदलली. 'निर्णय घेण्याचा अधिकार मालकांचा' हे त्यांना आडवळणाने प्रसिद्धी माध्यमांसमोर कबूल करावे लागले. काँग्रेसला चिथवून आपण पवार यांना अन्य पर्यायावर जायला लावू, हा युवराजांचा प्रयत्नही फसला. काँग्रेसचा दिल्लीहून आदेश येताच इथल्या नेत्यांना काही मतच राहिले नाही. शेवटच्या दिवसांपर्यंत ताणून धरूनही शेवटी युवराजांना आपला हट्ट सोडावा लागला. पवारच मविआचे एकमेव आणि निवडणुकीतले सातवे उमेदवार ठरले! खरेतर, गेले पंधरा दिवस या विषयाची जाहीर भवती न भवती सुरू होती. त्याला काही अर्थ नव्हता. राज्यसभेसाठी शरद पवार उमेदवार असणार आणि त्यांच्यासह ही निवडणूक बिनविरोध होणार, हे सुमारे दोन महिन्यांपूर्वीच; अजितदादा असतानाच ढोबळमानाने निश्चित झाले होते. त्यासाठी काँग्रेस आणि भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाची चाचपणीही झाली होती. 'शरद पवार यांच्यासारखा राजकारणातला भीष्म दिल्लीत असायला हवा' अशी भाषा त्यासाठी कोणी वापरली असेल, याचा अंदाज कोणालाही लावता येईल. राजकारणातले निर्णय अनेकदा राजकारणाबाहेरील व्यक्तीच पडद्यामागे घडवून आणत असतात. यावेळीही तसेच झाले, असे म्हणतात. वास्तविक शरद पवार यांनीच काही काळापूर्वी निवृत्तीची भाषा सुरू केली होती. निवडणुकीच्या राजकारणात ते स्वतः उमेदवार म्हणून यापुढे असणार नाहीत, असेही ते म्हणाले होते. साठ वर्षांच्या अखंड आणि प्रदीर्घ संसदीय कारकिर्दीनंतर, प्रकृती अस्वास्थ्य बघता ते आता विश्रांती घेतील, असाच सर्वसाधारण अंदाज होता. पण, पवार यांनी त्यांचीच जुनी वक्तव्ये आणि इतरांचे अंदाज खोटे ठरवले. त्यांनी अगदी सहज राज्यसभेवर पुन्हा प्रवेश केलाच, पण त्याबरोबर ही निवडणूकही बिनविरोध केली. दोन्ही राष्ट्रवादी नियोजनाप्रमाणे एकत्र झाल्या असत्या, अजितदादा असते, तर कदाचित चित्र वेगळे दिसले असते. पण, आता त्या चर्चेला काही अर्थ नाही. राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुनेत्रा पवार यांच्या जागी त्यांच्याच घरातील कोणाची तरी वर्णी लागणार, हे अगदी उघड होते. त्यानुसार पार्थ पवार यांचा नंबर लागला. अजितदादा असतानाच पक्षाची काही जबाबदारी पार्थ यांच्याकडे होती. वडिलांच्या अनेक निर्णयात पार्थ यांचे मत ग्राह्य धरले जात होते. त्यामुळे, त्यांची वर्णी लागणे स्वाभाविक आहे. त्या पक्षात एकाचवेळी इतके हितसंबंध कार्यरत असतात, की त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना सध्या तरी अशा घरच्या मदतीची गरज आहेच. आश्चर्याचा धक्का दिला, तो शिवसेनेने. राजकीय निर्णय घेण्यात आपण किती परिपक्व आणि समर्थ आहोत याचे प्रत्यंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा दिले. गजानन कीर्तिकर, राहुल शेवाळे, अडसूळ पिता-पुत्र यांच्यासह अनेकांना नाराज करून त्यांनी डॉ. ज्योती वाघमारे हे अगदी अनपेक्षित नांव अखेर नक्की केले. भारतीय जनता पक्षाचे प्राधान्य नेहमीच सामाजिक समीकरणे साधण्याला असते. राज्यसभेच्या उमेदवारांची नावे नक्की करताना त्यांनी सामाजिक आणि प्रादेशिक समतोलही साधला. राष्ट्रीय चिटणीस विनोद तावडे यांना सहा-सात वर्षांच्या अत्यंत यशस्वी संघटनात्मक जबाबदाऱ्यानंतर पुन्हा संसदीय राजकारणात प्रवेश मिळाला, तर रामदास आठवले यांनाही आणखी सहा वर्षांचे 'एक्स्टेंशन' मिळाले. प्रकाश आंबेडकर सतत भाजपविरोधी भूमिका घेत असल्याने भाजपला आपल्यासोबत एक रिपब्लिकन नेता असणे आवश्यक वाटते. आठवले यांना त्यामुळे विनासायास राज्यसभा गाठता येते. नागपूरच्या माजी महापौर माया इवनाते यांचा अनुसूचित जमातीच्या प्रतिनिधी आणि महिला या दोन्ही कारणांनी, तर 'राष्ट्रवादी' चे माजी आमदार रामराव वडकुते यांचा धनगर समाजाचे प्रतिनिधी म्हणून समावेश अनपेक्षित होता. उमेदवारांच्या बिनविरोध निवडीने नेत्यांचे काम सोपे झाले. बाकी महाराष्ट्राच्या राजकारणावर त्याचा काही परिणाम होण्याची शक्यता नाही.

**गेल्या दोन दशकांत भारतीय शेतीसमोर उभ्या राहिलेल्या संकटांना उत्तर म्हणून 'शेतकरी उत्पादक कंपनी' हे मॉडेल पुढे आले. सहकाराच्या भावनेतून, पण कंपनीच्या व्यवस्थापन शिस्तीतून चालणारी ही रचना शेतक-यांना बाजारपेठ, तंत्रज्ञान, वित्त आणि मूल्यवर्धन यांचा संगम घडवून देईल हा त्यामागील मुख्य उद्देश.**

# उद्याची शेती
# शेतकरी उत्पादक कंपनीची अनुदानकेंद्रित मानसिकता

रितेश पोपळघट

लहान व अल्पभूधारक शेतक-यांना एकत्र आणून अर्थकारणात एक चांगले 'स्केल' निर्माण करणे, मध्यस्थांची साखळी कमी करणे आणि शेतक-याच्या हातात अधिक आर्थिक उत्पन्नाची नाडी यावी अशी या शेतकरी केंद्रबिंदू मांडणा-या संकल्पनेची मूलतत्त्वे, परंतु कागदोपत्री आकर्षक वाटणारा हा प्रयोग प्रत्यक्षात अनेक ठिकाणी वेगळ्याच वास्तवाशी झुंज देताना दिसतो आहे.

देशात हजारो शेतकरी उत्पादक कंपन्या नोंदणीकृत झाल्या असल्या तरी त्यातील मोठा हिस्सा अजूनही कागदावरच अस्तित्वात आहे. पंजाब विद्यापीठाच्या एका अभ्यासानुसार अनेक कंपन्यांची आर्थिक कामगिरी नकारात्मक आहे, नफा तर दूरच; उलट तोटा आणि कार्य भांडवलाची टंचाई हीच त्यांची ओळख बनली आहे. आर्थिक गुणोत्तरांचे विश्लेषण असे आकी, मोठ्या प्रमाणावर चालू मालमत्ता निष्क्रिय अवस्थेत पडून आहे. उत्पादित केलेला मालसाठा विकता येत नाही आणि मालमत्तेचा वापर विक्रीयोग्य उत्पादन निर्माण करण्यात प्रभावी ठरत तर नाही. उलट तो निष्क्रिय आहे. या सगळ्याचा अर्थ स्पष्ट आहे की, अनेक शेतकरी उत्पादक कंपन्यांकडे एक ठोस व्यवसाय मॉडेल तर नाहीच, पण विक्री आणि बाजारपेठेची पकडदेखील अतिशय कमकुवत आहे. शेतकरी उत्पादक कंपनीला जरी 'शेतकरी' नावाचा आकर्षक मुलामा असला तरी ती कॉर्पोरेटच्या धर्तीवर चालणारी व्यवस्था आहे हे अजून ब?याच लोकांच्या लक्षात आलेले नाही.

शेतकरी उत्पादक कंपनीला स्वतचे मूलत भांडवल उभे करणे हा सर्वात मोठा अडथळा आहे. अनेक कंपन्यांकडे गोदाम, प्रक्रिया यंत्रणा, वाहतूक सुविधा यांचा अभाव आहे खरे तर यावरच पूर्ण मूल्य साखळी उभा राहते. बाजाराशी उत्पादनपूर्व आणि उत्पादनपश्चात दुवे जोडण्यात तर सोडा, पण शोधण्यातदेखील अडचणी येतात. ब-याचदा शेतकरी गटांच्या धर्तीवर अनेक उत्पादक कंपन्या या कृषी सेवा केंद्रासारखे उधारीला प्राधान्यक्रम असलेले व्यवसाय सुरू करतात आणि वर्ष-दोन वर्षे होण्याआधीच अर्थिक गर्तेत जाऊन नुकसानीत जातात. उत्पादनाचे संकलन, दर्जानुसार वर्गीकरण, प्रक्रिया, ब्रँडिंग आणि थेट बाजारपेठेतील विक्री या सर्व पाय-यांवर सर्रास कंपन्या अडखळतात. सगळ्याचा परिणाम आपल्याला शेतकरी वर्गाचा शेतकरी उत्पादक कंपनी या मॉडेलवरील विश्वास डळमळीत होताना दिसतो. शेतकरी उत्पादक कंपनीकडे उत्पादनाचा दर्जा, बाजार विश्लेषण किंवा तत्सम माहिती, वित्तीय नियोजन आणि त्यासाठी आवश्यक बाबी किंवा तसा योग्य संपर्क शेवटी उत्पादन विक्रीसाठी लागणारी पुरवठा साखळी व त्याचे व्यवस्थापन यांचे प्रशिक्षण नसते.



शासनाच्या 'दहा हजार शेतकरी उत्पादक कंपनी'च्या योजनेसारख्या उपक्रमांतून मोठा निधी जाहीर केला असला तरी कंपनी सुरू करणारे शेतकरी किंवा समूहामध्ये बहुतांश ठिकाणी अनुदानकेंद्रित मानसिकता दिसून येते. कंपनी स्थापन करून अनुदान मिळवणे हे मुख्य ध्येय बनते, शाश्वत आणि नफा मिळवणारा व्यवसाय उभा करणे हा दुय्यम विचार राहतो पुजाऊन अनुदान संपले की, गाडी अडखळते. 'मॅचिंग ग्रँट'सारखी साधने पायाभूत सुविधा उभारण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात, परंतु त्याचा उपयोग दीर्घकालीन व्यवसाय संशोधन आणि आराखड्याशिवाय केवळ तात्पुरता ठरणारा आहे. बाजारपेठेतील स्पर्धा हे आणखी एक सगळ्यात मोठे आव्हान आहे. मोठ्या खासगी कंपन्या, स्थापित व्यापारी आणि सशक्त सहकारी संस्था यांच्या स्पर्धेत नव्याने उभी राहिलेली शेतकरी कंपनी टिकून राहण्यासाठी मजबूत ब्रँड, सातत्यपूर्ण गुणवत्ता आणि पुरवठ्याची हमी देणे आवश्यक असते, परंतु लहान भूधारकांच्या विखुरलेल्या उत्पादनामुळे प्रमाणबद्धता, दर्जा आणि सातत्य राखणे कठीण जाते.

शेतकरी सदस्य सहभागाची पातळीही चिंताजनक आहे. काही ठिकाणी सक्रिय सदस्यांचे प्रमाण खूपच मर्यादित असल्याचे काही अभ्यासात दिसत आहे. ब-याचदा निधी मिळवण्यासाठी सदस्य आकड्यांची तडजोड केली जाते. अनेक शेतकरी केवळ भागधारक म्हणून नाव नोंदवतात, परंतु व्यवहार कंपनीमार्फत करण्याऐवजी ते पारंपरिक व्यापा-याकडेच विक्री करतात. यामागे त्वरित मिळणारे पैसे आणि जोखीम टाळण्याची मानसिकता कारणीभूत असते.

शेतकरी उत्पादक कंपनीला धोरणात्मक पाठबळ आणि बँकिंग क्षेत्रातील विश्वासही मर्यादित आहे. अनेक बँका शेतकरी उत्पादक कंपन्यांना उच्च जोखीम गटात ठेवतात. कर्ज मंजुरी प्रक्रियेत विलंब, तारणाची अट आणि व्याज दर यांमुळे कंपनीचा विस्तार खुंटतो. वित्त पुरवठ्याअभावी पायाभूत गुंतवणूक, प्रक्रिया यंत्रणा किंवा थंड साठवणूक केंद्र उभारणे स्वप्नच राहते.

तथापि, या भयाण वास्तवातही आशेची किरणे आहेत. ज्या कंपन्यांनी चांगली टीम बनवली, व्यवसाय आराखडा बनविण्यासाठी संशोधन केले आणि स्पष्ट व्यवसाय आराखडा तयार केला, सदस्यांना नियमित प्रशिक्षण दिले आणि बाजारपेठेशी समन्वय ठेवून एक उत्पादन केंद्रित ठेवून काम केले त्या कंपन्यांची आर्थिक प्रगती झाल्याची काही उदाहरणे आहेत. व्यवस्थापनाचा योग्य दृष्टिकोन, समूह एकात्मता आणि योग्य उद्देश हे यशाचे प्रमुख घटक असल्याचे अनेक कंपन्यांच्या अनुभवात दिसून येते आहे.

शेवटी प्रश्न असा आहे की, शेतकरी उत्पादक कंपनी हा केवळ सरकारी प्रकल्प आहे की ग्रामीण अर्थकारणातील दीर्घकालीन परिवर्तनाची संधी आहे, परंतु जर ती फक्त अनुदानावर उभी राहिली तर तिचे भविष्य अंधूक आहे, परंतु जर ती बाजाराभिमुख, पारदर्शक आणि व्यावसायिक व्यवस्थापनाने चालवली गेली तर ती लहान शेतक-याच्या आर्थिक उत्पन्नवाचा खरा आधार बनू शकते.

तरीदेखील अनेक बाबतीत असणारे भयाण वास्तव नाकारून चालणार नाही. त्याला सामोरे जाऊन रचनात्मक सुधारणा, क्षमता बांधणी आणि वित्तीय शिस्त यांवर भर देणे आवश्यक आहे. अन्यथा 'सामूहिक शक्ती'ची संकल्पना कागदावरच राहून शेतकरी अपु-या आश्वासनांच्या चक्रात अडकून राहील.

शेतक-याच्या हातात अधिक आर्थिक उत्पन्नाची नाडी यावी अशी या शेतकरी हाच केंद्रबिंदू अशी संकल्पना मांडणारे 'शेतकरी उत्पादक कंपनी' हे मॉडेल प्रत्यक्षात मात्र अनेक अडचणींसह वास्तवाशी झुंज देताना दिसत आहे.

# ममतांना सुवेंदू अधिकारी यांचे आव्हान!

अभय गोखले

लवकरच होणाऱ्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत, राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या त्यांच्या पारंपरिक भवानीपूर मतदार संघातून निवडणूक लढण्याची शक्यता आहे.भाजपातर्फे या मतदारसंघातून विधानसभेतील विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी हे निवडणूक लढतील अशी चर्चा आहे.२०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत नंदीग्राम मतदार संघात वरील दोन्ही नेते एकमेकांसमोर उभे राहिले होते.त्या निवडणुकीत सुवेंदू अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांना १९५६ इतक्या छोट्या मताधिक्याने हरवून, खळबळ उडवून दिली होती.सुवेंदू अधिकार यांनी तृणमूल काँग्रेसचा राजीनामा देऊन,भाजपात प्रवेश केल्याने, त्यांना धडा शिकविण्यासाठी, ममतांनी आपला नेहमीचा भवानीपूर मतदारसंघ सोडून,नंदिग्राम मतदार संघातून सुवेंदू अधिकारी यांच्याविरोधात निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला होता.नंदीग्राम मतदार संघ हा सुवेंदू अधिकारी यांचा बालेकिल्ला असल्याने, ममतांकरता ती निवडणूक सोपी नव्हतीच.अखेर ममतांचा पराभव करून,सुवेंदू अधिकारी यांनी आपली ताकद दाखवून दिलीच.एकेकाळी ममतांचा उजवा हात असलेल्या, अधिकारी यांच्याकडून झालेला पराभव, ममतांच्या जिव्हारी लागला होता.२०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत ममतांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस हा पक्ष प्रचंड बहुमताने विजयी झाला.मात्र पक्षाच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी या निवडणूक हरल्याने,पक्षाच्या विजयाला गालबोट लागले.

ममता बॅनर्जी या पुन्हा एकदा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री झाल्या.परंतु त्या स्वतः निवडणूक हरल्याने,सहा महिन्यांच्या आत विधानसभेत निवडून येणे त्यांच्यासाठी बंधनकारक होऊन बसले.ममता बॅनर्जी यांच्या पक्षाचे सोवनदेव चट्टोपाध्याय हे भवानीपूर मतदारसंघातून विजयी झाले होते.मग चट्टोपाध्याय यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा देऊन,तो मतदारसंघ ममता बॅनर्जी यांच्यासाठी मोकळा केला.त्यानंतर भवानीपूर मतदारसंघात झालेली पोटनिवडणूक,ममता बॅनर्जी यांनी लढवली आणि त्या ५८ हजार मताधिक्याने तेथून विजयी झाल्या.लवकरच



होणाऱ्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी या आपल्या पारंपरिक भवानीपूर मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याने,त्यांच्या विरोधात भाजपातर्फे सुवेंदू अधिकारी यांच्या रुपाने तगडा उमेदवार, भाजपाकडून दिला जाण्याची शक्यता आहे.स्वत: सुवेंदू अधिकारी हे ममताविरोधात लढण्यासाठी अतिशय उत्सुक असल्याचे बोलले जात आहे.

सुवेंदू अधिकारी यांनी २०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत नंदीग्राम मतदार संघातून ममता बॅनर्जी यांना पराभूत केल्याने,त्याचे दडपण,ममता बॅनर्जी यांच्यावर असणार आहे.त्या शिवाय ममता बॅनर्जी यांना आपल्या मतदारसंघात अडकवून ठेवल्यास,आपल्या पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी त्यांना कमी वेळ मिळेल,अशी,भाजपाची त्या मागील स्ट्रॅटेजी असू शकेल.भवानीपूर हा विधानसभा मतदारसंघ, दक्षिण कोलकाता लोकसभा मतदारसंघाच्या अंतर्गत येतो.या मतदार संघात बिगर बंगाली भाषिकांची संख्या दखल घेण्यासारखी आहे.भाजपाच्या दृष्टीने ही जमेची बाजू आहे.२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत, दक्षिण कोलकाता लोकसभा मतदारसंघातून तृणमूल काँग्रेसचा उमेदवार विजयी झाला होता.मात्र या लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या भवानीपूर विधानसभा क्षेत्रात, तृणमूल काँग्रेसच्या विजयी उमेदवारास केवळ ८ हजारांचे मताधिक्य मिळाले होते.एवढेच नव्हे तर भवानीपूर विधानसभा मतदारसंघातील आठ वॉर्ड्सपैकी पाच वॉर्डांत भाजपाला मताधिक्य मिळाले होते.या पार्श्वभूमीवर भवानीपूर मतदारसंघातून ममतांच्या विरोधात,भाजपाचे सुवेंदू अधिकारी हे उभे राहिल्यास,ममतांसाठी ती निवडणूक सोपी असणार नाही.

पश्चिम बंगालमध्ये झालेल्या विशेष सखोल फेरतपासणी मोहिमेंतर्गत,भवानीपूर विधानसभा मतदारसंघातील ४७ हजार मतदारांची नावे, निरनिराळ्या कारणास्तव वगळण्यात आली आहेत.भवानीपूर मतदारसंघातील एकूण मतदारांची संख्या लक्षात घेता, साधारणपणे एक चतुर्थांश मतदारांची नावे विशेष सखोल फेरतपासणी मोहिमेंतर्गत वगळण्यात आली आहेत.आता त्याचा फटका, निवडणुकीत ममतांना बसेल का ते पहावे लागेल.

अर्थात ममतांना हरवणे, वाटते तेवढे सोपे नाही,ही गोष्ट भाजपाला चांगलीच ठाऊक असणार.एक गोष्ट मात्र निश्चित आहे,ती म्हणजे ममता बॅनर्जी आणि सुवेंदू अधिकारी यांच्यात थेट लढत झाल्यास,त्या लढतीकडे देशातील सर्वांचे लक्ष लागून राहिल.

# इराण -इस्त्राईल संघर्षात हिजबुलाह का उतरला?

प्रा. डॉ. सुनील अग्रवाल

मध्यपूर्वेतील तणाव वाढला आहे. इराण अशांत आहे. अमेरिका आणि इस्रायलने मिळून कहर केला आहे. शेकडो लोक मारले गेले आहेत. इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांचाही मृत्यू झाला आहे. तरीही, इराण युद्धभूमीवर स्थिर आहे. ते प्रत्युत्तर देण्यासाठी अमेरिकन लष्करी तळांवर आणि इस्रायलवर अथक हल्ला करत आहे. दरम्यान, इराणला हिज्बुल्लाहचा पाठिंबा मिळाला आहे. हो, हिज्बुल्लाहने इराण-इस्रायल युद्धात प्रवेश केला आहे.खरं तर, इराणवरील अमेरिका आणि इस्रायली हल्ल्यांनंतर, लेबनॉनचा हिजबुल्लाह गट आता उघडपणे युद्धभूमीवर उतरला आहे. या गटाने आता इस्रायल आणि अमेरिकेचा बदला घेण्यास सुरुवात केली आहे. हा तोच हिजबुल्लाह आहे ज्याला इराणचे माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी वर्षानुवर्षे पोसले होते. आतापर्यंत, इराण कमकुवत होत असतानाही हिजबुल्लाह गप्प का राहिला आणि इराणला पाठिंबा का देत नव्हता हा प्रश्न होता. इराणमुळेच हिजबुल्लाह अस्तित्वात आहे हे देखील खरे आहे. पण आता हिजबुल्लाह झोपेतून जागा झाला आहे. त्याने इराणच्या वतीने इस्रायलवर बॉम्बस्फोट सुरू केले आहेत. इस्रायलने स्वतः याचा पुरावा दिला आहे.



इस्रायली लष्कराने, आयडीएफने वृत्त दिले आहे की लेबनॉनमधून इस्रायली शहर हैफा येथे सहा रॉकेट डागण्यात आले. हा हल्ला अशा वेळी झाला आहे जेव्हा इस्रायल आणि अमेरिका इराणवर मोठे हवाई हल्ले करत आहेत, ज्यामध्ये तेहरानसह अनेक शहरे लक्ष्यित आहेत. इस्रायलने म्हटले आहे की त्यांनी हिजबुल्लाहचे रॉकेट अडवले आहे. तथापि, आता हे स्पष्ट झाले आहे की इस्रायलला लेबनॉनमधून येणाऱ्या क्षेपणास्त्रे आणि रॉकेटपासून सावध राहावे लागेल, कारण हिजबुल्लाह इराणला पाठिंबा देण्यासाठी मैदानात उडी मारली आहे. आतापर्यंत, हिजबुल्लाहने एकही रॉकेट डागले नव्हते, परंतु आता असे दिसते की त्यांनी प्रवेश केला आहे.

इराण-इस्रायल संघर्षात हिजबुल्लाह हा इराणचा सर्वात शक्तिशाली प्रॉक्सी आहे, जो 'प्रतिरोधाच्या अक्ष' चा भाग म्हणून लेबनॉनमधून इस्रायलविरुद्ध लढतो. १९८० पासून इराणकडून त्याला पाठिंबा मिळत आहे, ज्याचा मुख्य उद्देश इस्रायलला विरोध करणे आणि या प्रदेशात इराणी प्रभाव वाढवणे आहे.हिजबुल्लाह इराणच्या मार्गदर्शनाखाली काम करतो आणि इराणला प्रादेशिक शक्ती म्हणून स्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो.लेबनॉनमधील त्याच्या मजबूत स्थानामुळे, हिजबुल्लाह इस्रायलच्या उत्तर आघाडीसाठी गंभीर धोका निर्माण करतो, ज्यामुळे इस्रायलला त्याचे सैन्य विभाजित करावे लागते. हिजबुल्लाह सीरियामध्ये देखील कार्यरत आहे, जो इराणला शस्त्रास्त्रे हस्तांतरित करण्यासाठी एक महत्त्वाचा मार्ग आहे.८ ऑक्टोबर २०२३ पासून, हिजबुल्लाहने गाझामधील हमासशी एकता दर्शवत इस्रायली लक्ष्यांवर रॉकेट आणि क्षेपणास्त्र हल्ले सुरू केले आहेत.

इराण-इस्रायल युद्धात हिजबुल्लाहचा सहभाग हा संघर्ष आणखी मोठा करत आहे. हा गट इराणचा सर्वात मोठा मित्र आहे. खामेनी यांनी शस्त्रे, पैसा आणि प्रशिक्षण देऊन त्याला बळकटी दिली. १९८० पासून, हिजबुल्लाह इराणच्या 'प्रतिरोधक अक्ष' किंवा इराणच्या अघोषित सैन्याचा भाग आहे. तथापि, अमेरिका, इस्रायल आणि पाश्चात्य देश हिजबुल्लाहला दहशतवादी संघटना मानतात. २०२४ च्या इस्रायलशी झालेल्या युद्धानंतर हिजबुल्लाह कमकुवत झाला होता, परंतु आता इराणच्या दबावाखाली तो पुन्हा सक्रिय होत आहे. इराणचे रिव्होल्यूशनरी गार्ड्स आणि हिजबुल्लाह एकमेकांच्या संपर्कात आहेत आणि संयुक्तपणे इस्रायलवर हल्ल्यांची योजना आखत आहेत.थोडक्यात, हिजबुल्लाह इराणसाठी एक बचावात्मक आणि आक्रमक शस्त्र आहे, जो थेट इस्रायलला आव्हान देतो.

वर्धा
मो.९५६१५९४३०६

# तापमानात वाढ;जलसाठा घटला

## २८९ प्रकल्पांमध्ये सध्या ५५.५४ टक्के पाणीसाठा

**अमरावती/का.प्र**

विदर्भातील रणरणत्या उन्हाची चाहूल लागताच पश्चिम विदर्भातील (अमरावती विभाग) जलसाठ्याने तळ गाठण्यास सुरुवात केली आहे. विभागातील मोठे, मध्यम आणि लघु अशा एकूण २८९ प्रकल्पांमध्ये सध्या केवळ ५५.५४ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असून, मागील वर्षाच्या तुलनेत यंदा पाणीसाठ्यात मोठी घट दिसून येत आहे. विशेषतः वाशीम जिल्ह्यातील प्रकल्पांची अवस्था बिकट असून तेथे केवळ ३४ टक्के साठा शिल्लक असल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे.

अमरावती प्रादेशिक विभागाच्या जलसंपदा विभागाने ५ मार्चला प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, - विभागातील ९ मोठ्या प्रकल्पांमध्ये ५८.४१ टक्के पाणीसाठा आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्याची जीवनवाहिनी असलेल्या ऊर्ध्व वर्धा प्रकल्पात ६०.९८ टक्के साठा असून गतवर्षी याच काळात तो ५७.३३ टक्के इतका होता. यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्पात ५०.११ टक्के, तर बुलढाण्यातील प्रकल्पात अवघा ४१.६ टक्के साठा शिल्लक आहे. खडकपूर्णा प्रकल्पात अवघा ४१.६ टक्के साठा शिल्लक आहे.

विभागातील २७ मध्यम प्रकल्पांमध्ये ५७.९९ टक्के साठा असून तो मागील आठवड्यात ६० टक्क्यांच्या वर होता. सर्वाधिक फटका लघु प्रकल्पांना बसला आहे.



विभागातील २५३ लघु प्रकल्पांमध्ये आजच्या घडीला केवळ ४९.१८ टक्के पाणी शिल्लक आहे. वाशीम जिल्ह्यातील ७५ लघु प्रकल्पांमध्ये केवळ ३४.१८ टक्के साठा असल्याने आगामी काळात तेथे पाणीटंचाईची तीव्र झळ बसण्याची शक्यता आहे.

यंदा १ जूनपासून अमरावती विभागात झालेला पाऊस समाधानकारक नसल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. अमरावती जिल्ह्यात ९०० मि.मी.,. तर यवतमाळमधील पुस प्रकल्प क्षेत्रात ९२९ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. गेल्या वर्षी याच तारखेला विभागाचा एकूण पाणीसाठा ४८.२९ टक्के होता, जो यंदा तांत्रिकदृष्ट्या जास्त दिसत असला तरी वाढत्या बाष्पीभवनामुळे पाणीपातळी झपाट्याने खाली जात आहे.

विभागातील मध्यम व लघु प्रकल्पांचा एकत्रित विचार केल्यास सध्या ९०४.०० द.ल.घ.मी. उपयुक्त साठा असून तो एकूण क्षमतेच्या ५३.१८ टक्के इतका आहे. उन्हाळ्याचे अद्याप दोन ते अडीच महिने बाकी असल्याने उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्याचे मोठे आव्हान जलसंपदा विभागासमोर असणार आहे.

**जिल्हानिहाय साठ्याची टक्केवारी (मोठे, मध्यम व लघु)**

अमरावती: ५८.७३ टक्के

यवतमाळ : ६०.७३ टक्के

अकोला : ५२.७२ टक्के

वाशीम : ४०.११ टक्के

बुलढाणा : ५२.७७ टक्के

# मेळघाट संघर्ष व कर्जमाफी आठवण यात्रेचा सहावा दिवस



**अमरावती/का.प्र.**

आजचा प्रवास चुरणी येथून सुरू झाला. आज यात्रेत महादेवाचा त्रिशूल घेऊन अनेक यात्रेकरू सहभागी झाले. प्रशासनाने ९ तारखेपर्यंत या समस्यांची दखल घेतली नाही, तर हाच त्रिशूल हातात घेऊन लाखो लोक तांडव करण्यास तयार आहेत, असा इशारा देण्यात आला. आजचा मुक्काम खडीमल या गावात आहे. खडीमल येथे आजही वीज, पाणी आणि रस्ते या मूलभूत सुविधा पोहोचलेल्या नाहीत. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही या गावातील नागरिकांना मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागत आहे.

# संशोधक डॉ विजय इंगोले यांचे सैधान्तिक अणुभौतिक शास्त्र विषयावरील नवीन संशोधन

**अमरावती/का.प्र.**



येथील सुप्रसिद्ध पेटंट मॅन तथा संशोधक डॉ विजय तु इंगोले यांच्या इलेक्ट्रोनिक्स, टर्नरी कॉम्पुटर (Ternary Computer) तसेच पुरातत्व शास्त्र या विषावरील संशोधना नंतर सैधान्तिक अणुभौतिक शास्त्र (Theoretical Nuclear Physics) या क्लिष्ट विषयावर अभ्यास करून न्यूट्रॉन् बल (Neutron Strong Force), गुरुत्वाकर्षणाचे मूळ (Gravity), वैश्वीक मूळ कण (Cosmic Fundamental Particle), आण्विक स्थिरता ( Particle Stability) आणि कृष्ण विवर (Black Hole) या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर आधारित पाच संशोधन पेपरची मालिकाच आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत नुकतीच प्रकाशित झाली आहे.

हे संशोधन प्रस्थापित क्वांटम क्रोमोडायनामिक्स (QCD) या सिद्धांताच्या मतांवर विकसित केलेल्या पारंपरिक (Classical ) आणि भूमिती (Geometry) आधारित दृष्टिकोनातून संशोधन पेपर सादर करण्यात आले आले आहेत. या संशोधनामध्ये न्यूट्रान (Neutron) मधिल प्रबळ अनुबलाची तीव्रता, अंतर्गत दाब तसेच गुरुत्वाकर्षण स्थिरांक यासारख्या मुलभूत भौतिक राशी उर्जा संकुचन आणि भूमितीय तत्वाव्दारे समजावून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या अभ्यासानुसार न्यूट्रॉनची स्थिरता ही अंतर्गत विद्युत परस्पर संवाद आणि अवकाशातील सार्वत्रिक मर्यादा यांच्यामधील संतुलनामुळे संभवते असे आगळे वेगळे सिद्धांत मांडले. अचूक संख्यात्मक विश्लेषणावर आधारित असल्यामुळे या संशोधनामुळे वैज्ञानिक समुदायात विचारमंथन आणि पुढील संशोधनासाठी प्रेरणा मिळू शकते. यात प्रा. डॉ. अनंत वडतकर यांचे साहाय्य मिळाले. संशोधक डॉ विजय तु. इंगोले यांचे आतापर्यंत +६० संशोधन पेपर प्रकाशित झाले आहेत.

# तालुक्यात महसूलचे राजस्व अभियान आजपासून

## ७ महसुली मंडळात होणार महशिबीर

**चांदूरबाजार/वार्ताहर**

सर्वसामान्य नागरीकांचा जन्मापासून ते मृत्यूपर्यंत प्रत्येक वेळी थेट संबंध येतो,तो तहसिलच्या माध्यमातून महसूल विभागाचा.प्रत्येकाला आपल्या कामासाठी, तहसिल कार्यालयात चकरा माराव्याच लागतात. या सर्व त्रासा पासून नागरीकांची सुटका व्हावी.हा महसूल प्रशासनाचा प्रामाणिक हेतू. त्यासाठी महसूल प्रशासन छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे माध्यमातून, महसूल शिबिरांव्दारे महसूल प्रशासन आपल्या दारी ही योजना राबवत आहे. तालुक्यात याच्या पहिल्या टप्प्यातील सुरुवात ७ मार्च पासून होत आहे. ७ मार्च ते १५ में दरम्यान, तालुक्यात विविध तारखांना या राजस्व शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या राजस्व अभियानाची सुरुवात ७ मार्चला, बेलोरा महसूल मंडळात बेलोरा येथून सुरवात होणार आहे. या ठिकाणी नियंत्रण अधिकारी म्हणून,नायब तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी हे उपस्थित असतील.यांचेच नियंत्रणाखाली १० एप्रिलला,शिरजगांव कसबा व करजगाव महसूल मंडळासाठी संयुक्त शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच नियंत्रण अधिकारी प्रभारी तहसीलदार मनोज सोनारकर यांचे अधिनस्त १४ मार्चला ब्राम्हण वाडा येथे,तर ८ मे ला चांदूरबाजार शहरात या महाराजस्व शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.त्याच प्रमाणे नायब तहसीलदार मनिष यंबरवार यांचे नियंत्रण अधिकारात १७ एप्रिल लाभ आसेगाव पूर्णा येथे, तर १५ मे ला तळेगाव मोहना येथे या महा राजस्व अभियानांतर्गत शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या महा राजस्व अभियाना व्दारे , गांव महसूल प्रशासन ही सुविधा नागरीकांना उपलब्ध करून देणार आहे.लोक कल्याणार्थ महसूल प्रशासनाने हे एक पाऊल टाकले आहे.नागरीकांची पायपीट कमी होऊन,त्यांना या शिबिराचे माध्यमातून पुढील सेवा उपलब्ध होणार आहे.त्या या प्रमाणे आहेत.७/१२ व ८ अ दुरूस्ती , प्रलंबित फेरफार दुरूस्ती,शेत व पांदण रस्ते प्रश्न,पी.एम.किसान व ॲग्रीस्टॅक नोंदणी,अकृष तरतुदी ,इ मोजणी , तुकडे बंदी बाबत माहिती ,भोगवटदार वर्ग २ जमिनी वर्ग १ करणे , शेत जमीन मोजणी बाबत मार्गदर्शन, संजय गांधी निराधार योजनेतील सर्वच प्रलंबित प्रकरणे,तसेच विद्यार्थ्यांना लागणारी शैक्षणिक कागदपत्रे यावर मार्गदर्शन व प्रमाणपत्रे देणे.त्याच प्रमाणे नागरिकांना आवश्यक असलेल्या इतर ही महसुली सुविधां संबंधी दाखले व मार्गदर्शनाचा लाभ या शिबिरातून नागरिकांना मिळणार आहे.अशी माहितीउपविभागीय अधिकारी अचलपूर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# जिल्हास्तरीय शिक्षक समायोजनात शिक्षकांना न्याय मिळावा

## सर्व शिक्षक संघटना सभेत प्राथमिक शिक्षक समितीची मागणी

**अमरावती/का.प्र.**

जि.प.अमरावती अंतर्गत कार्यरत सर्व शिक्षक संघटना यांचीअतिरिक्त शिक्षक समायोजन संबंधाने मा.संजिता महापात्र (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अमरावती) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडली.या सभेत तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर होणारे शिक्षक समायोजनात शिक्षकांवर अन्याय होऊ नये अशी मागणी शिक्षक संघटना सभेत प्राथमिक शिक्षक समिती पदाधिकारी यांनी केली.

यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा अमरावती च्या वतीने या सभेमध्ये मा.अजयानंद पवार (जिल्हाध्यक्ष),शैलेंद्र स.दहातोंडे (जिल्हा सरचिटणीस) व मा.मनीष काळे (जिल्हा सहसचिव) उपस्थित होते.सर्वप्रथम अजयानंद पवार यांनी अतिरिक्त शिक्षक समायोजन प्रक्रिया राबविण्यापूर्वी सर्व जिल्ह्याची संचमान्यता होणे अपेक्षित आहेव सर्व जिल्ह्याची संचमान्यता अजून पूर्ण झाली नसतांना समायोजन प्रक्रिया राबविणे योग्य नाही असे मत व्यक्त केले.तसेच पं. स.वरुड अंतर्गत जि.प.शाळा गव्हाणकुंड येथील संच मान्यता चुकीची झाल्याचा मुद्दा उपस्थित केला.यावेळी सर्व जिल्ह्याची संचमान्यता पूर्ण करूनच व काही असलेल्या त्रुटी दुरुस्त करूनच जिल्हा समायोजन प्रक्रिया राबविण्यात येईल असे उत्तर मिळाले.शिक्षक समितीने ६ते८वर्गावरील विषय शिक्षक भाषा,विज्ञान आणि सामाजिक शास्त्र यांच्या अतिरीक्त ठरलेल्या शिक्षक पदाला संरक्षण दयावे आणि यांची स्वतंत्र्य सेवाजेष्ट यादी तयार करुन भविष्यात रीक्त झालेल्या विषय शिक्षकांच्या जागेवर प्रथम सेवाजेष्टेतेने नियुक्ती दयावी अशी मागणी करण्यात आली.सरसकट यांना पदावतन करु नये.यानंतर सन २०२४-२५ ची आधार आधारित संचमान्यता मान्य नसल्याचे व संच मान्यता ही प्रवेशित विद्यार्थी पटसंख्येचा आधारे करावे अशी मागणी करण्यात आली.अतिरिक्त शिक्षक समायोजन करताना माहे मार्च २०२६ ला सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांच्या जागा रिक्त जागा दाखविण्यात याव्या ही आपल्या संघटनेची मागणी मान्य करण्यात आली.समायोजन करतांना समानीकरणांच्या जागा अतिरीक्त शिक्षक यांना दाखविण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली, परंतु समानीकरणाच्या जागा ह्या आंतरजिल्हा बदलीने येणारे शिक्षक व खाजगी शाळांवर अतिरिक्त झालेले शिक्षक यांच्या करिता राखीव असल्याने त्या समायोजन प्रक्रिया मध्ये दाखविता येणार नाही असे सांगण्यात आले.

## संक्षिप्त

### रुद्रेश कुऱ्हेकर पीएसआय पदावर



**अमरावती-**जिल्ह्यातील युवक रुद्रेश नरेश कुऱ्हेकर यांनी आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मोठे यश संपादन केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत त्यांनी पहिल्याच प्रयत्नात पोलीस उप निरीक्षक पद मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या परीक्षेत रुद्रेश कुऱ्हेकर यांनी संपूर्ण महाराष्ट्रातून २२ वा क्रमांक तर ओबीसी प्रवर्गातून ७ वा क्रमांक मिळवला आहे. तसेच विदर्भातून प्रथम क्रमांक पटकावत त्यांनी आपल्या कुटुंबासह परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे.त्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कठोर परिश्रम, योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळविल्याचे त्यांनी सांगितले.

### महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने अर्ज आमंत्रित

**अमरावती-**'कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३' मधील कायदेशीर तरतुदीनुसार, जिल्हास्तरावर 'स्थानिक तक्रार समिती' गठीत करण्यात येणार आहे. या समितीच्या अध्यक्ष आणि सदस्यपदासाठी पात्र आणि इच्छुक व्यक्तींकडून अर्ज व नामांकने मागविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा प्रशासनातर्फे देण्यात आली आहे. महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळावे आणि त्यांच्या तक्रारींचे प्रभावी निवारण व्हावे, हा या समितीचा मुख्य उद्देश आहे.समितीवरील अध्यक्षपदासाठी केवळ महिला उमेदवार अर्ज करू शकतात. अर्जदार महिला किमान पदवीधर असावी आणि त्यांना महिलांच्या प्रश्नांची जाण तसेच सामाजिक क्षेत्रातील कामाचा किमान ५ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असणे अनिवार्य आहे. या पदाचा कार्यकाळ नियुक्तीपासून ३ वर्षांचा असेल.इच्छुक आणि पात्र व्यक्तींनी आपली शैक्षणिक पात्रता, अनुभवाचे प्रमाणपत्र, संमतीपत्र आणि अर्जाचा मसुदा 'जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, महिला व बाल विकास भवन, राणी दुर्गावती चौक, अमरावती' येथे प्रत्यक्ष सादर करावा. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ मार्च २०२६ पर्यंत आहे. सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या आणि कायद्याची जाण असलेल्या व्यक्तींनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास विभागातर्फे करण्यात आले आहे.

### धिरजकुमार सातपुते 'वेटरन अचिव्हर अवॉर्ड'ने सन्मानित



**ब्राह्मणवाडा थडी-**येथील कमांडर धीरजराजे सातपुते यांचा मुंबई कुलाबा येथील सैन्य छावणीत भव्य दिव्य असा वेटरन अचिव्हर अवार्ड चा कार्यक्रम पार पडला.यावेळी चीफ ऑफ द आर्मी स्टाफ भारतीय सैन्य दलाचे सर्वेसर्वा जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्या हस्ते क्राफ्ट्समेन धिरजकुमार सातपुते यांना 'वेटरन अचिव्हर अवार्ड' नी सन्मानित केले.त्यांच्यासोबत लेफ्टनंट कर्नल कमलप्रीत सग्गी ,जेसीओ सुभेदार मेजर सरवण आर,सार्जंट एडमंड पीटर फ्रान्सिस ,चीफ पेटी अधिकारी शशी भुषण मिश्रा यांनाही यांच्याही विशेष कार्याकरिता सन्मानित करण्यात आले. मुंबई कर्नल वेटरन श्रीनवेतू चॅटर्जी उपस्थित होते. धिरजकुमार सातपुते यांनी विशेषता कर्नल वेटरन नवनीत दुग्गल व माजी कर्नल वेटरन संदीप शर्मा यांचे आभार मानले.

### महिला दिनानिमित्त विविध स्पर्धा

**अमरावती-**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च रोजी अमरावती जिल्ह्यात महिलांसाठी विविध क्रीडा स्पर्धा आणि सक्षमीकरण उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. विभागीय क्रीडा संकुल येथे ८ मार्च रोजी सकाळी ९ वाजेपासून विविध खेळांच्या स्पर्धांना सुरुवात होईल. यामध्ये प्रामुख्याने आर्चरी, मल्लखांब, बॅडमिंटन, हॅण्डबॉल, स्क्वॅश, टेबल टेनिस, सॉफ्टबॉल, बेसबॉल आणि व्हॉलीबॉल यांसारख्या खेळांचा समावेश आहे. विविध क्रीडा संघटनांच्या सहकार्याने या स्पर्धांचे नियोजन करण्यात आले असून, जिल्ह्यातील महिला खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्याची ही मोठी संधी आहे.अंजनगाव सुर्जी येथे रोशनी महिला मंडळाच्या सहकार्याने 'स्वयंरोजगार: काळाची गरज' आणि 'कौटुंबिक हिंसाचार व कायदा व्यवस्था' या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येईल.

# स्ट्रोक उपचारात क्रांतिकारक बदल घडवण्याची गरज-खा.डॉ.अनिल बोंडे

## मुंबईत महाराष्ट्र स्ट्रोक परिषद २०२६ चे आयोजन मेंदूतील रक्तगुठळी विरघळवण्याची व काढण्याची उपचारसेवा

**अमरावती/का.प्र.**

मेंदूघात (स्ट्रोक) हा भारतासमोरील एक अत्यंत गंभीर सार्वजनिक आरोग्य प्रश्न असून त्यावर तातडीने व प्रभावी उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री तथा राज्यसभा सदस्य, भारतीय वैद्यकीय संसदीय मंचाचे अध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांनी केले. शुक्रवारी (ता.६) मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे 'महाराष्ट्र स्ट्रोक परिषद २०२६' चा उद्घाटन सोहळा थाटात पार पडला. उद्घाटनपर भाषण करताना डॉ. बोंडे बोलत होते. त्यांच्या भाषणाने परिषदेचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा.ना. प्रकाश आबिटकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दीपप्रज्वलन व मेंदूघातविषयक जनजागृतीच्या चित्रफीत सादरीकरणाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

### मेंदूघात उपचार सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचवणार-आरोग्यमंत्री

महाराष्ट्र शासन मेंदूघात उपचाराबाबत अत्यंत गांभीर्याने विचार करत असून राज्यातील प्रत्येक जिल्हा रुग्णालयात मेंदूघात सेवा केंद्र उभारण्याचा शासनाचा मानस आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत यांत्रिक रक्तगुठळी निष्कासन उपचाराचा समावेश करण्यात आला असून गरीब व सर्वसामान्य रुग्णांनाही आता हे अत्याधुनिक उपचार मिळू शकतील. ग्रामीण भागात मेंदूघाताचे वेळेत निदान व्हावे यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील डॉक्टर, कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्याचे नियोजन सुरू आहे. 'एकही मेंदूघात रुग्ण उपचाराविना राहणार नाही हे आमचे ध्येय आहे,' असे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी यावेळी सांगितले.



केईएम रुग्णालयाचे डॉ. नितीन डांगे यांनी स्वागतपर भाषण केले. त्यानंतर डॉ. अनिल बोंडे यांनी उद्घाटनपर भाषणात मेंदूघात उपचाराची सद्यस्थिती, आव्हाने आणि सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला. डॉ. नीरज जैन यांनी भारतातील मेंदूघात व्यवस्थापनातील वैद्यकीय पुरावे व संशोधन अभ्यास या विषयावर सादरीकरण केले. भारतातील मेंदूघात उपचाराचे वैज्ञानिक पुरावे व संशोधनातील महत्त्वाचे निष्कर्ष त्यांनी मांडले. तर मध्यवर्ती मज्जासंस्था रक्तवाहिनी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. रश्मी सराफ यांनी शासकीय रुग्णालयातील रक्तवाहिनी मेंदूघात उपचार सद्यस्थिती आणि पुढील मार्ग या विषयावर सादरीकरण केले. शासकीय रुग्णालयात या उपचाराची सद्यास्थिती व भविष्यातील दिशा याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. परिषदेच्या प्रथम सत्राचे प्रतीक तिवारी यांनी आभारप्रदर्शन केले.

### मेंदूघात उपचाराची वस्तुस्थिती, अडचणी यावर सखोल चर्चा

दुपारच्या सत्रात 'मेंदूघात उपचारातील दरी भरून काढणे व परिणाम सुधारणे' या विषयावर सखोल चर्चा झाली. दरम्यान सूत्रसंचालन डॉ. नितीन डांगे यांनी केले. डॉ. रश्मी सराफ, डॉ. अविनाश गुट्टे, डॉ. बटुक दियोरा, अनुमेहा श्रीवास्तव यांनी सत्रात सहभाग घेतला. डॉ. नितीन डांगे यांनी महात्मा फुले जन आरोग्य योजनेतील मेंदूघात उपचाराचा समावेश परिणाम व आवश्यक पाठबळ या विषयावर प्रमुख सादरीकरण केले. त्यानंतर सर्व सहभागींनी शासकीय व खासगी रुग्णालयांतील मेंदूघात उपचाराची वस्तुस्थिती, अडचणी आणि उपाय यावर सखोल विचारमंथन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघा सरस्वत यांनी केले. रवी वालिया यांनी आभार मानले.

### मेंदूघात उपचारातील आव्हाने

खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, मेंदूघात उपचारात रक्तगुठळी विरघळवणे व यांत्रिक पद्धतीने रक्तगुठळी काढणे यासारख्या आधुनिक पद्धती उपलब्ध असल्या तरी जनजागृतीचा अभाव, पायाभूत सुविधांची कमतरता आणि प्रशिक्षित तज्ज्ञांची उणीव या तीन प्रमुख अडचणी अजूनही कायम आहेत. आयुष्यमान भारत व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांतर्गत मेंदूघात उपचाराचा समावेश हे सरकारचे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे त्यांनी सांगितले. 'मेंदूघात ही केवळ वैद्यकीय नव्हे तर सामाजिक व आर्थिक समस्या आहे. वेळेवर उपचार न मिळाल्यास रुग्णाला आयुष्यभर अपंगत्व सहन करावे लागते. ही परिस्थिती बदलण्याची जबाबदारी आपण सर्वांनी मिळून घेतली पाहिजे,' असे डॉ.अनिल बोंडे यांनी नमूद केले.

# बळीराजा सुखावला!

## पीक कर्ज थकीत असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत कर्जमाफी!

**मुंबई -** महाराष्ट्राचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचा अर्थसंकल्प आज म्हणजेच शुक्रवार ६ मार्च २०२६ रोजी दुपारी दोन वाजल्यापासून विधानसभेत सादर करत आहेत. अशातच शेतकऱ्यांसाठी सरकारने मोठी घोषणा केली आहे.

विधिमंडळात राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा कर्जमाफीची घोषणा केली आहे. त्यानुसार आता ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा थेट लाभ मिळणार असून, या योजनेचे नामकरण 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' असे करण्यात आले आहे.

ज्या शेतकऱ्यांचे पीक कर्ज ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत होते, अशा पात्र शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे.

जे शेतकरी आपल्या कर्जाचे हप्ते वेळेवर आणि नियमितपणे भरत आहेत, अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५०,००० रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे राज्यातील लाखो कर्जबाजारी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, शेती व्यवसायाला पुन्हा उभारी मिळण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला आहे.



## महाराष्ट्राचा अर्थसंकल्प : २०२६



### महत्वाच्या घोषणा

■ राज्य सरकारकडून ४ लाख ९ हजार कोटी कर महसुलीचं लक्ष्य ठेवण्यात आले आहे.
■ मराठी भाषेतील साहित्य इतर भाषांमध्ये आणि इतर भाषांमधील
■ साहित्य मराठी भाषेत अुवादित करण्यासाठी यशवंतराव चव्हाण
■ महाराष्ट्र अनुवाद अ‍ॅकेडमी स्थापन करणार.
■ ऑलिम्पिक खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी हाय परफॉर्मन्स सेंटर सुरू करण्यात येणार आहे. जिल्हा, तालुका स्तरावरील क्रीडा केंद्राच्या विकासासाठी आर्थिक तरतूद.
■ महात्मा फुलेंचे जन्मगाव कटगुण, तालुका खटाव, जिल्हा सातारा येथे भव्य स्मारक उभारणाचे प्रस्तावित आहे. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथे स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे.
■ धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या संगमेश्वर, रत्नागिरी येथील स्मारकाचे काम लवकरच हाती घेणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.
■ छत्रपती संभाजी महाराजांच्या तुळापूर येथील स्मारकाचे काम जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.
■ छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक आणि पानिपत येथे मराठा शौर्य स्मारक उभारण्यात येणार आहे.
■ साताऱ्यातील दरे गाव परिसरात निसर्गोपचार केंद्र उभारणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.
■ एम्सच्या धर्तीवर महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूरात कार्यन्वित करण्यात येणार आहे.
■ कर्करोग, मधुमेह, हृद्यविकार याचे लवकर निदान करण्यासाठी ४५०० कोटीचीं योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.
■ सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या जिल्ह्यांच्या विकासासाठी सिंधुरत्न समृद्ध योजना तीन वर्षासाठी राबविण्यात आली. पुढील तीन वर्षाकरिता सिंधुरत्न समृद्धी योजना २.० प्रस्तावित.
■ संत घाडगे बाबांच्या १५० व्या जयंतीनिमित्त तीर्थक्षेत्र विकसित केले जाणार आहे.
■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित रायगड तलाव त्यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त विकसित केला जाईल. विकास आराखडा तयार केला जाईल.
■ पुढील चार वर्षांत ५ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणले जाईल.
■ पीएमएवाय-ग्रामीण अंतर्गत ३३,४१० कोटींची तरतूद या अर्थसंकल्पात केली असून या योजनेअंतर्गत घराच्या छतावरील सौरऊर्जा पुरवली जाईल.
■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील एमएसएमईंना पाठिंबा देण्यासाठी नवीन आयुक्तालय बांधायची घोषणा केली
■ लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी एआयचा वापर करून सरकार ७५ गावांमध्ये पायलट प्रकल्प राबवणार आहे.
■ विदर्भातील रामटेक शहर फिल्म सिटी म्हणून विकसित करायची मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली.
■ बुलेट ट्रेनच्या सभोवतालचा विरार, बोईसर आणि ठाणे भाग विकसित केला जाणार
■ वाढवन येथे गोदान आणि लॉजिस्टिक्स असलेले चौथे मुंबई बंदर विकसित केले जाणार आहे.
■ २०४७ पर्यंत १२०० किमी मेट्रो आणि ६००० किमी पेक्षा जास्त एक्सप्रेसवे विकसित केले जातील.
■ वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मुंबई आणि पुणे भुयारी बोगदा बांधला जाणार आहे.
■ वडाळ्यातील १३० एकर जमीन स्टार्टअप आणि इनोव्हेशन सेंटर म्हणून विकसित केली जाणार आहे.
■ सिग्नललेस शिवडी-वरळी कनेक्टर सप्टेंबर २०२६ पर्यंत तयार होईल.

## 'मेट्रो लाइन ११'करीता
# २३ हजार कोटींच्या प्रकल्पाची घोषणा

**मुंबई -** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी शुक्रवारी, ६ मार्च रोजी, राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी राज्या अनेक विकास कामं सुरू करण्यावर भर दिली. मुंबई, पुण्यासह अनेक शहरांमध्ये मेट्रोचे जाळे उभारण्याची घोषणा केली आहे. यामध्ये मुंबई मेट्रो लाइन ११ चाही समावेश आहे. गेट वे ऑफ इंडिया आणि वडाळादरम्यान ही मेट्रो मार्गिका उभारण्यात येणार असून, हा मार्ग पूर्णपणे भूमिगत असणार आहे.

मुंबई, पुणे व नागपूर शहरांमध्ये ४९० किमी लांबीच्या मेट्रो मार्गिकेचं काम हाती घेण्यात आलं आहे. त्यापैकी १७४ किमी मार्ग वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत. आगामी वर्षात ५० किमी लांबीच्या मेट्रो मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्याचं नियोजन असल्याचीही त्यांनी यावेळी माहिती दिली. दरम्यान, २०२९पर्यंत १६५ किमी लांबीच्या मेट्रो मार्गिका सुरू करण्याचं उद्दिष्ट आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले. याअंतर्गत २३,४८७ कोटींची १७ किमी लांब मेट्रो मार्गिका उभारण्यात येणार आहे.



सध्या या मार्गावर एकीण १४ मेट्रो स्थानकं प्रस्तावित असून त्यापैकी १३ भूमिगत आहेत. वडाळ्यातील अनिक डेपोपासून ही मार्गिका सुरू होणार असल्याची माहिती आहे. या प्रकल्पात अनेक टप्पे उभारण्याचा प्रस्ताव आहे. पहिल्या टप्प्यात मेट्रो कार डेपो, त्यावरील टप्प्यात बेस्ट बस डेपो तर सर्वात वरच्या स्तरावर नवीन प्रकल्प बांधण्याचे नियोजन आहे. अक्वा लाइनच्या धरतीवर ही मार्गिका तयार केली जाणार आहे. मुंबईतीला वाहतूक कोंडी फोडण्यास मदत होणार आहे. २०२६-२७दरम्यान या प्रकल्पाचे काम सुरू होण्याची चिन्हे आहेत.

या मेट्रो मार्गिकेचा विस्तार धारावी पुनर्विकास प्रकल्पापर्यंत करण्यात येणार आहे. त्याशिवाय वांद्रे उपनगरिया रेल्वे स्थानक आणि वांद्रे टर्मिनसदरम्यानही या मेट्रो मार्गिकेचा विस्तार करण्यात येणार आहे. या मेट्रो मार्गिकेचा प्रस्ताव २०२५च्या दिवाळी मध्येच मांडण्यात आला होता. एमएमआरसीएल ने यासाठी निविदा जाहीर केली असून या प्रक्लापाची संरचना तयार करण्याचं काम सुरू होतं.

## महिलादिनानिमित्त मुख्यमंत्र्यांची मोठी भेट
# लाडकी बहीण योजना सुरूच राहणार

**मुंबई -** राज्यातील लाडकी बहीण योजना सुरूच राहणार असल्याची घोषणा आज (दि.६ मार्च) अर्थमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करताना आज केली. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त या योजनेच्या निधीत भरीव तरतूद केली जाणार असल्याचेही ते म्हणाले.

लाडकी बहीण योजना महाराष्ट्र सरकारने महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी सुरू केलेली एक हत्त्वाची योजना आहे. ज्याअंतर्गत पात्र महिलांना दरमहिना १,५००/- आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनेसाठी आता भरीव तरतूद करण्यात आली असून, पात्र लाडक्या बहिणींनी दरमहिना मिळणाऱ्या हप्त्यामध्ये वाढ होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे आतापर्यंत ३७ लाख लखपती दीदी झाल्या असल्याचेही अर्थमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. तसेचआणखी २५ लाख बहिणींनी लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही ते म्हणाले.

### केवळ घोषणा करून चालणार नाही

आज महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प सादर करण्यात आला तो केवळ घोषणाचा पाऊस होता, राज्य सरकारने अर्थसंकल्प आणि विविध योजनांची मोठ्या प्रमाणावर घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची स्थिती चिंताजनक असल्याचे आर्थिक पाहणी अहवालातून स्पष्ट झाले आहे. सरकार एकीकडे 'विकसित महाराष्ट्र, मजबूत महाराष्ट्र' अशी घोषणा देत आहे, परंतु वास्तवात विकासदराच्या बाबतीत महाराष्ट्र शेजारच्या गुजरात आणि कर्नाटकपेक्षाही मागे पडल्याचे आकडे सांगत आहेत. कर्नाटकाचा विकासदर ६५ टक्के, गुजरातचा ४८ टक्के असताना महाराष्ट्राचा विकासदर केवळ ४३ टक्के आहे. देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या राज्यासाठी ही बाब गंभीर आणि चिंतेची आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी कर्जमाफी योजनेची घोषणा करत आहे, मात्र गेल्या काही वर्षांत शेतकरी मोठ्या संकटातून जात आहेत. चांगला पाऊस होऊनही कृषी व संलग्न क्षेत्राचा विकासदर ९.१ टक्क्यांवरून ३.४ टक्क्यांवर घसरला आहे. म्हणजेच सुमारे ५ टक्क्यांची घसरण झाली आहे. अवेळी पाऊस, पिकांचे नुकसान आणि बाजारातील अस्थिरता यामुळे शेतकरी अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत केवळ घोषणा करून चालणार नाही, तर शेतकऱ्यांना तातडीने प्रत्यक्ष आर्थिक मदत आणि हमीभावाची मजबूत व्यवस्था देणे आवश्यक आहे. राज्यावरील कर्जाचा बोजाही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मार्च २०२६ पर्यंत राज्यावर ९.३२ लाख कोटी रुपयांचे कर्ज होण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत ९३ हजार कोटी रुपयांची वाढ होणार आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात कर्ज वाढत असताना सरकारकडे आर्थिक शिस्त आणि स्पष्ट नियोजन आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. महिला सक्षमीकरणासाठी 'लाडकी बहीण' योजना सुरू ठेवण्याची घोषणा करण्यात आली आहे, मात्र विधानसभा निवडणुकीच्या वेळी महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. प्रत्यक्षात आजही महिलांना फक्त १५०० रुपयेच दिले जात आहेत, त्यामुळे सरकारने दिलेले आश्वासन पूर्ण केलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. ज्या आश्वासनांवर महिलांनी विश्वास ठेवला त्या पूर्ण करणे ही सरकारची जबाबदारी आहे.



**खा. बळवंत वानखडे**

# राज्यात आणखी ७५ हजार पदांची भरती

### विद्यार्थ्यांसाठी अर्थसंकल्पात महत्त्वाची घोषणा

**मुंबई -** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा करत राज्यात आणखी ७५ हजार पदांची भरती करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. विधानसभेत अर्थसंकल्प सादर करताना त्यांनी ही माहिती दिली.

राज्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सरकारने हा महत्त्वाचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. फडणवीस म्हणाले की, महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर आतापर्यंत राज्यात मोठ्या प्रमाणावर सरकारी पदांची भरती करण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षांत विविध विभागांमध्ये मिळून सुमारे १ लाख २० हजार पदे भरली गेली आहेत. या भरती प्रक्रियेमुळे प्रशासन अधिक सक्षम झाले असून अनेक विभागांमधील रिक्त पदांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर कमी झाला आहे.

याचबरोबर राज्यातील रिक्त पदे टप्प्याटप्प्याने भरून काढण्याचा सरकारचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पुढील काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजेच Maharashtra Public Service Commission तसेच इतर भरती यंत्रणांच्या माध्यमातून आणखी ७५ हजार पदांची भरती करण्यात येणार आहे. ही भरती विविध विभागांमध्ये केली जाणार असून प्रशासनातील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यावर भर दिला जाणार आहे. सरकारी नोकरीची वाट पाहणाऱ्या लाखो तरुणांसाठी ही घोषणा महत्त्वाची मानली जात आहे. गेल्या काही वर्षांपासून सरकारी भरतीची मागणी करण्यात येत होती. त्यानुसार आता राज्य सरकारने मोठ्या प्रमाणावर पदभरती करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात सांगितले की, राज्याच्या विकासासाठी सक्षम प्रशासन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे विविध विभागांमध्ये रिक्त असलेली पदे भरून प्रशासन अधिक कार्यक्षम करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

या भरती प्रक्रियेमुळे राज्यातील तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच शिक्षण, आरोग्य, महसूल, पोलीस, पायाभूत सुविधा आणि इतर महत्त्वाच्या विभागांमध्ये कामकाज अधिक वेगाने होण्यास मदत होईल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.

एकूणच राज्याच्या अर्थसंकल्पात रोजगारनिर्मितीवर विशेष भर देण्यात आला असून आगामी काळात मोठ्या प्रमाणावर पदभरती होणार असल्यामुळे राज्यातील बेरोजगार तरुणांसाठी ही घोषणा महत्त्वाची ठरणार आहे.

### अर्थसंकल्पाचे स्वागत

राज्याचा चोहोबाजुने मुलभुत विकास व उन्नती व्हावी यासाठी शेती, उद्योग व सेवा क्षेत्रात भरीव गुंतवणूक करीत असतांनाच नव्याने २ लाखांची कर्जमाफी जाहीर करीत शेतक-यांसह सर्वच वंचित घटकांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प आहे. सरकारच्या तिजोरीवर पहीला अधिकार या सर्व वंचित घटकांचा आहे असा विश्वास देणा-या अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गुंतवणूक धार्जिण्या या अर्थसंकल्पांचे स्वागत.



**अरविंद नळकांडे**
अध्यक्ष, श्रमराज्य परिषद
मो.९८९०९७०६२८

# 'अस्तित्व ॲट अंश डॉट कॉम'

## एक टक नाटक
### समीक्षण

**म**हाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ वतीने ७१ वा. प्राथमिक नाट्य महोत्सव २०२५-२६. स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सीपना कॉलेज, अमरावती येथे कामगार कल्याण केंद्र, जयभारत चौक, यवतमाळच्या कलावंतांनी सुहास देशपांडे लिखित 'अस्तित्व ॲट अंश डॉट कॉम' या नाटकाचे सादरीकरण केले.

राजाभाऊ भगत दिग्दर्शित 'अस्तित्व ॲट अंश डॉट कॉम' या नाटकाचा प्रयोग रियलिस्टिक स्तरावरचा असल्याचे सांगून पात्र परिचय आणि नाट्यमंचचे सर्व सहकारी यांची उद्घोषणा करणारी व्यक्ती लग्नातील आंदणाची यादी वाचून सांगितल्या प्रमाणे संपताच प्रवेश सुरू होतो.





तिन्ही सांजेला झाडू घेऊन कोळीचे जाळे काढणारे गृहस्थ स्वगत करीत प्रवेश करतात. त्याच वेळी चहा कप घेऊन पत्नी येते आणि भद्र-अभद्र या ब्राम्हणी थाटात संवाद सुरू होतो. परदेशी मुलगा आणि त्याचे आईबापाला सोबत न ठेवण्याचे व देशात न येण्याचे सर्व चित्र उभे होते. लँडलाईनवर फोन येतो तेव्हा बाप फोन घेत असताना अमेय त्यांचा मुलगा पेईंगगेस्ट म्हणून हैद्राबादी मुलगी येत असल्याचे सांगत वडीलांना लाडिकपणा लावण्याचा प्रयत्न..मात्र सूतवर्तनाने बाप निराश; तेवढ्यात आई सदर संवादाला पूर्ण विराम देऊन पुढील प्रवेशात एक दक्षिणी रंगभूषेत...

अमेय अविनाश जहांगीरचे घर हेच का? विचारत तरुणीचा परिचय व नाटकाची उकल. खोलीत सामान ठेवताना आई मदतीला येते, मुलाच्या फोटोला बघून मातृत्व पाझरते. सारंगी पार्श्वसंगीतने आईचे हृदय मांडण्याचा प्रयत्न. खोली आवारातच फोन येतो त्यावेळी कामाला लागली बरं का? या वाक्याने नाटकात द्वंद सुरू.

विणकाम करताना एकच वेषधारण.. पुढील प्रवेशात कामावरून मुलगी परत न आल्याने तिचा पूर्ण परिचय न होताच घरात ठेवल्याची शंका उपस्थित उभय संवाद. साडे नऊला मुलीचा प्रवेश ती मोबाईलचे डिस्चार्ज कारण सांगत. पुढे तिच्या कामाचे प्रकरण सांगत परिचय सांगताना आई वृद्धाश्रमात सेवा देते. बाप नसल्याने नोकरीची गरज, आलमेल केरळ निवासी.

वृद्धाश्रमाची व्यावसायिक संकल्पना मांडत असताना ज्येष्ठ दाम्पत्यांचे गुदमरणे सुरू. यावेळी बासरी स्वर आणि अचानक वृद्ध ग्राहकांची मिळकत प्राची बोलते तेव्हा चवताळून अविनाश जहागिरदार 'इंग्लिशलँग्वेज' वापरताच वाक्य अडखळत, चुकीवर दर्शक दात काढतात.

कावीळ आजारात अविनाश-अनघा हे दाम्पत्य प्राचीबद्दल फार काळजी, कुटुंब सदस्य म्हणून सुश्रुषा करीत तिला लापशी पदार्थाच्या वर्णनात कावीळचे निर्मूलन होणारे उपाय सांगते. काळजी घे! सांगत अनघा रूम मधून निघते तेव्हा प्राचीचा फोन, लाल भडक उजेडात शंकेचे दर्शन करून देणारा संवाद श्रीनी ह्याचे प्राचीसोबत प्रेम असा प्रवेश विराम.

हिशेब करीत संभाला पंब्लर पाठव आणि वर खोली बांधू असा अनघा सोबत विचार करीत प्राची घरची सून करूया का? इथे भाव रस उत्पत्ती करताना लाघवी प्राची व दगडी अमेय असा विरोधाभास. उभयांचे हिरवे स्वप्न आणि दाराची बेल वाजताच पंब्लर सोबत गडी येतो.

घर न्याहाळते, फोटो बघून माझ्या भाचीचा फोटो असे बोलताच अविनाश विस्मयतो. किचन सहाशे रुपयात साफ करून पंब्लर निघताना पुन्हा फोटो न्याहाळ.

उकळशेंगुळे जेवायला प्राचीसाठी अनघा करत प्राचीचे सौंदर्य व गुण यावर चर्चा, श्रीनी चा फोन म्हणून रूम मध्ये प्राची जाते. उभयता 'हम बने तुम बने' गीताच्या ठेक्यावर गुलाबी उजेडात. इकडे फोनवर प्राची बोलो ! उच्चारत नाटकाचे सस्पेन्स अमेय आईवडिलांचा खून करण्यापर्यंत दाखवत मध्यंतर.

प्राची पेपर वाचताना सीए करून मोठे व्हावे असे सांगून राजकारणी मुलाने बापाचा खून केल्याचे बातमी वाचन. झोपडपट्टीच्या वातावरणावर प्रकाश टाकत प्राचीची भूमिका स्पष्ट होताना दिसते. खून या वाक्यावर अनघा चे एक्स्प्रेशन, संगीताचे दुर्लबल भाव.

एकंदर नाटकाचे कथानक स्पष्ट करताना प्राचीची भूमिका सखाराम बाईंडर मधील चंपाचे व्हिलन चारित्रप्रमाणे. कारण ती ज्यांचा खून करायला सुपारी घेते त्यांचे स्वभाव वर्तन तिच्या चांगुलपणाचे चकाकी आणते त्यावेळी तिचे व्हिलन रूप गळून जाते.

नाटकात वास्तविक परिस्थिती दिग्दर्शकांनी मांडत असताना लाघवी भाषा संवाद साधणारी पात्र सजवता आली नाही. अविनाश बँकेतून स्वयंखुषी निवृत्त झालेले शहरीपेक्षा गावातील मध्यम शेतकरी थाटात वाटले. आवाज होता पण संवादात लवचिकपणा उतरला नाही. अनघा ही संवादाची घाई करीत गॅप, प्रसंग व नाटकाचे गांभीर्य सांभाळू शकली नाही. घरात उच्चश्रेणीची उंच टाचेच्या चपलीत तिचा वावर. प्राचीला सुंदर संबोधून दिग्दर्शकाने तिच्यातील गुप्तहेरपणा मांडणारी संमोहित लालना घेतली नाही.

त्यामुळे तिच्या चारित्र्यावरून ती स्पष्ट न होता नुसत संवादातून ती व्हिलन दिसली. पंबलरची एन्ट्री प्राचीला ब्लॅकमिलिंग करताना अभिनय आत पर्यंत गेला नाही. त्यामुळे कथनक वास्तववादी भारदस्त असताना त्याचे पडसाद प्रेक्षकांना नाट्यदर्शन न होताच समजून घेणे भाग पडले.

खरे तर नाटकाचे नाव लेखकाने आधुनिकतेच्या गुंगीत ठेवले की काय असा प्रश्न पण पडतो. 'अस्तित्व ॲट अंश डॉट कॉम' हे शीर्षक व नाटकाचा थाट यात कुठेच मेळ संपूर्ण नाटक समोर बसून बघून येत नाही. कारण यात भाषेचे कॉकटेल हा शहाणपणा दिडपट जाणवेल.

उजेडात प्रसंग सावरण्याचा प्रयत्न नाटकात फारसा जमला नाही. संगीत गॅप भरून काढताना घालमेल व महत्वाचे उद्गार पार्श्वसंगीताने भरले नाही. एकंदर नाटक प्राथमिक स्पर्धेत असल्याचे स्पष्ट झाले. या नाटकाला वास्तव आहे. त्यामुळे त्यांची उकल दिग्दर्शक आणि तोडीचे कलावंत यावर अवलंबून आहे. वेलवणकरांचे नटसम्राट थाट नाटकात झळकताना त्याचे प्रसारण कलावंत तर्फे कमी.

दिग्दर्शक राजाभाऊ भगत यांनी किशोर गवरशेट्टीवार, किशोरी बाळापुरे, प्रशांत गावंडे वैष्णवी दिवटे, विलास सुतार, रवी चोरमले, आशिष घाटे या कलावंताचे सहभागातून याला नेपथ्य ठिकठाक विनायक देशमुख, विनोद नेवासकर, प्रकाशदिवे राजेश्वर पिंपळवार यांनी दाखवून संगीत-श्याम चोपडे, रंगभूषा-वेशभूषा रमेश मरगडे सुधा भगत, अस्मिता भोसले, रंगमंच व्यवस्था राजेश बिडवे मुळे नाटक पूर्णत्वास दीर्घ प्रवेशित नेले. नाटकाचा शिखरबिंदू चांगुलकीला माणुसकीचा थारा मिळतो त्यासाठीच ह्या नाटकातील कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीचा प्रश्न अस्तित्वात असताना त्याला परिस्थितीचे. क्षण विदेशात व्यसनी तर भारतीय झोपटपट्टीत चांगुलपणाचे वास्तव. प्रेक्षकांना या नाटकात स्वतः इन्व्हॉल करणारे कथानक पाहण्याची संधी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ देत आहे याचा विचार समीक्षण करताना मांडणे माझे काम आहे.

**कबीर फादर**
मो.७७९८६४५५६५

# छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, आदर्श अंगीकारण्याची गरज : मनपा आयुक्त डॉ. लहाने

## जय बाभळेश्वर सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्राचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी राजे भोसले यांची ६ मार्च २०२६ रोजी (तिथीनुसार) जय बाभळेश्वर सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने मोठया उत्साहात शिवजयंती पार पडली. यंदा शिवजयंतीचे ३२ वे वर्ष होते. हा जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

जय बाभळेश्वर मंदिराच्या प्रांगणात तयार करण्यात आलेल्या देखण्या किल्ले पुरंदरवर विराजमान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे डॉ. सुनिल लहाने यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आमदार नितीन देशमुख, माजी आमदार गोपिकिशन बाजोरिया, लोकमतचे कार्यकारी संपादक रवी टाले, किशोर मांगटे पाटील, गोपाल दातकर, कृष्णा शर्मा, अर्चना शर्मा, सोनाली सरोदे, मनोज पाटील, अभय खुमकर, मधुर खंडेलवाल, प्रशंसा अंबेरे, राहुल कराळे, रवि गोतमारे, विजय इंगळे, पंकज गावंडे, राजेश काळे आदी मान्यवर उपस्थित होते.



### महिलांनी काढली मशाल यात्रा

गुरुवार ५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी नगरस्थित आई तुळजाभवानी मंदिर येथून महिलांच्या मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मशाल यात्रेचा समारोप जय बाभळेश्वर मंदिराच्या प्रांगणात करण्यात आला. यावेळी उपस्थित महिला व युवतींच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या मूर्तीचे विधिवत पूजन व त्यानंतर आरती करण्यात आली.

### डाबकी रोड परिसरात विशाल मिरवणूक

सायंकाळी ७ वाजता डाबकी रोड परिसरात छत्रपती शिवाजी महाराज, मासाहेब जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारलेल्या महिला, युवती व चिमुकल्या मावळ्यांची उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीचा समारोप छत्रपती शिवाजी नगरस्थित भाजी बाजार येथील शिवरायांच्या प्रतिमेसमोर करण्यात आला. शनिवार ७ मार्च रोजी रात्री ८ वाजता शिवपूजनाने शिवजन्मोत्सव सोहळ्याचा समारोप केला जाणार आहे.

### मान्यवरांचा केला सन्मान

आयोजकांच्या वतीने उद्धव सेनेचे उपनेते तथा आमदार नितीन देशमुख, महापालिका आयुक्त डॉ सुनील लहाने, शिंदेसेनेचे नेते गोपिकीशन बाजोरिया, साहित्य क्षेत्रातून डॉ. शैलेंद्र दुबे, क्रीडा क्षेत्रातून मृणालिनी गाढे, वेदश्री योगेश गोतमारे तसेच अर्पिता आनंद बुलबुले यांचा सत्कार करण्यात आला.

# पंकज कोठारी नरेडकोच्या प्रदेश सहसचिव पदी

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या मार्गदर्शनात संपूर्ण राष्ट्रात कार्यरत असलेली राष्ट्रीय स्तरावरील रिअल इस्टेट क्षेत्रातील अग्रगण्य व प्रभावी संस्था नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल अर्थात नरेडकोच्या महाराष्ट्र प्रदेश सहसचिव पदी जेष्ठ गृहनिर्माते पंकज कोठारी यांची नियुक्ती करण्यात आली. कोठारी हे उद्योजक, चार्टर्ड सिव्हिल इंजिनिअर व बांधकाम क्षेत्रातील अनुभवी बिल्डर, विकासक असून त्यांचा या क्षेत्रातील ३८ वर्षांचा समृद्ध अनुभव बघता त्यांची नरेडको चे प्रदेश सहसचिव म्हणून नियुक्ती करण्यात



आली. नरेडको महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रशांत शर्मा, माजी अध्यक्ष राजन बांदेलकर तसेच चेअरमन डॉ. निरंजन हिरानंदानी यांच्या स्वाक्षरीने ही नियुक्ती जयपूर येथील कार्यकमात प्रदान करण्यात आली. देशभरातील सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील रिअल इस्टेट विकासक, बांधकाम व्यावसायिक, गुंतवणूकदार तसेच संबंधित उद्योगक्षेत्रातील विविध घटकांना एकत्र आणून या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी नरेडकोचे कार्य असून अशा या महत्त्वाच्या संस्थेच्या राज्यस्तरीय व्यवस्थापन समितीवर पंकज कोठारी यांची नियुक्ती होणे ही अकोला व विदर्भासाठी अभिमानाची बाब असून त्यांच्या अनुभवाचा उपयोग राज्यातील तसेच विदर्भातील रिअल इस्टेट क्षेत्राच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात होईल, असा विश्वास नरेडकोच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या नियुक्तीचे उद्योग, व्यापार व बांधकाम क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत केले.

## जेष्ठ नागरिक संघाची भव्य निबंध स्पर्धा

**अकोला :** जेष्ठ नागरिक संघ, अकोला अंतर्गत महिला समितीच्या वतीने रविवार दिनांक १५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता बी. आर. हायस्कूल येथे जागतिक महिला दिन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यात प्रमुख पाहुणे म्हणून महापौर सौ. शारदा खेडकर उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे डॉ. प्रमिलाताई टोपले पुरस्कृत स्व. मातोश्री मनोरमा दत्तात्रय पाठक यांच्या स्मृतित भव्य निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या वर्षीचा निबंध स्पर्धेचा विषय भ्रमणध्वनीचे, मोबाईल कुटुंब आणि समाजमनावर होणारे दुष्परिणाम हा असून ही स्पर्धा अकोला शहरापूर्ती मर्यादित असून ज्या महिलांचे वय ५५ वर्षे आणि त्यापेक्षा अधिक आहे त्यांच्यासाठी आहे.

## आज वीज ग्राहकांचा संवाद कार्यक्रम

**अकोला :** अ भा रेन्यूएबल एनर्जी असो. अकोला शाखेच्या वतीने आज शनिवार दिनांक ७ मार्च रोजी दुपारी २-३० वाजता स्थानीय प्रमिलाताई ओक सभागृहात वीज विषयाच्या संदर्भात ग्राहक, नागरिकांचा संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

ज्येष्ठ शेतकरी नेते प्रकाशराव पोहरे यांच्या अध्यक्षतेत आयोजित या वीज ग्राहक संवाद कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून महावितरणचे मुख्य अभियंता राजेश नाईक, अ भा ग्राहक पंचायत चे जिल्हा अध्यक्ष मंजीत देशमुख, ग्राहक पंचायतचे पालक मार्गदर्शक हेमंतराव जकाते, सामाजिक कार्यकर्ते जयप्रकाश मुरूमकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या वीज ग्राहक संवाद कार्यक्रमात नवीन प्रीपेड व पोस्टपेड स्मार्ट मीटर, विजेचे दर पत्रक, अवाजवी कर, अपारंपारिक ऊर्जेचा वापर, ऊर्जा संवर्धन समवेत वीज ग्राहकांच्या अडीअडचणी व समस्या यावर मार्गदर्शन व चर्चा करण्यात येणार आहे.

# सिलेंडर स्फोटात घर जळून खाक; जीवितहानी टळली

## नवेगाव येथील घटना; अन्नधान्य व घरगुती साहित्याचे मोठे नुकसान

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील अतिदुर्गम नवेगाव येथे राहत्या घरात गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट होऊन घर जळून खाक झाल्याची घटना शुक्रवारी (६ मार्च) दुपारी घडली. या आगीत अन्नधान्य, कपडे, भांडी तसेच इतर घरगुती साहित्य जळून मोठे नुकसान झाले. सुदैवाने घटनेवेळी घरात कोणीही नसल्याने जीवितहानी टळली.

रामकृष्ण कळणू खुळे यांचे स्वतःचे घर बांधकामाधीन असल्याने ते काही दिवसांपासून तात्पुरते प्रल्हाद डाखोरे यांच्या घरात वास्तव्यास होते. दरम्यान, शुक्रवारी दुपारी खुळे यांची पत्नी पीठ गिरणीवर दळण आणण्यासाठी गेली असताना घरात कोणीही नव्हते. याच वेळी अचानक घरातील गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाला. स्फोटानंतर घराला आग लागून काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण केले.

आगीच्या तडाख्याने घरावरील विद्युत तारा कोसळल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

मात्र मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच गावात खळबळ उडाली. गावकऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पाणी व इतर साधनांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत घर पूर्णपणे जळून खाक झाले होते.

या आगीत घरातील अन्नधान्य, कपडे, भांडी व इतर साहित्य जळून खाक झाल्याने कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

### गावकऱ्यांची तत्परता; मोठा अनर्थ टळला

सिलेंडर स्फोटानंतर लागलेल्या आगीने काही क्षणांतच भीषण रूप धारण केले. आगीच्या ज्वाळा पाहून गावात एकच खळबळ उडाली. ग्रामस्थांनी तत्परतेने पुढाकार घेत आगीवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे आग इतर घरांपर्यंत पसरण्यापासून रोखता आली. दरम्यान, बाधित कुटुंबाला



शासनाकडून तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# स्मार्ट वीज ग्राहकांना १ कोटी ३८ लाखाची स्मार्ट सवलत!

## दिवसा वीज वापराचा फायदा

■ प्रतिनिधी | अकोला ■

बदलत्या काळानुसार बदलते तंत्रज्ञानावर आधारीत स्मार्ट मीटर बसवलेल्या परिमंडलातील १ लाख ७९ हजार २३४ घरगुती ग्राहकांना दिवसा वीजवापरावर (टाइम ऑफ डे) गेल्या सात महिन्यांत जवळपास १ कोटी ३८ लाख रुपयांची सवलत वीजबिलात मिळाली आहे. स्मार्ट मीटर असेल तर सवलत देणे शक्य असल्याने वीज ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसवून घेण्यासाठी महावितरण व संबंधित एजन्सिला सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने पुढील पाच वर्षासाठी निश्चित केलेल्या वीजदरामध्ये घरगुती ग्राहकांना दिवसाच्या वीज वापरामध्ये प्रतियुनिट ८० पैसे ते १ रुपया सवलत जाहीर केली आहे. त्यानुसार घरगुती ग्राहकांना टीओडीप्रमाणे वीजदरात सवलत मिळण्याचा प्रत्यक्ष फायदा १ जुलैपासून सुरू झाला आहे. महावितरणकडून हे स्मार्ट टीओडी मीटर ग्राहकांकडे मोफत लावण्यात येत आहेत.

अकोला परिमंडलात १ लाख ७९ हजार २३४ घरगुती ग्राहकांना जुलै- २०२५ ते जानेवारी- जानेवारी २०२६ या सात महिन्यांच्या वीजबिलात १ कोटी ३८ लाख ५४ हजार रुपयांची टीओडी सवलत मिळाली आहे.

यात अकोला जिल्ह्यातील ५४ हजार ३०१ ग्राहकांना ५० लाख ७४ हजार रुपये, बुलडाणा जिल्हा ९३ हजार ४२४ ग्राहकांना ६५ लाख ६७ हजार आणि वाशिम जिल्ह्यातील ३१ हजार ५०९ ग्राहकांना २२ लाख १३ हजार रुपये सवलत मिळाली आहे. नव्या तंत्रज्ञानाच्या मीटरचे रीडिंग ऑटोमॅटिक होत असल्याने अचूक बिले मिळून घरातील विजेचा वापर दर तासाला संबंधित ग्राहकांना मोबाईलवर पाहता येत आहे. त्याद्वारे ग्राहकांचे वीजवापरावरही थेट नियंत्रण राहत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत वीजग्राहक घरातील प्रामुख्याने वॉशिंग मशीन, ओव्हन, गिझर, एअर कंडिशनर व इतर उपकरणांचा मोठा वापर करतात. त्यात टीओडी मीटरमुळे ग्राहकांचा मोठा आर्थिक फायदा होत आहे.


### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३२६/२०२६ — प्रोसेस नं. २९८१/२०२६
चौ.ता. १०/०४/२०२६ — दिनांक : ०५/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती मालथी रामनाथ भट रा. ज्योती विद्यालयाजवळ, ओम हाउसिंग सोसायटी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. सीमा विनायक कुडवा रा. जी-४०२, डीएडी रेसिडेन्स कॉम्प्लेक्स, एलबीएस मार्ग, कंजुरमार्ग वेस्ट, भांडुप वेस्ट, मुंबई ३. निर्मल रामनाथ भट ग. नं. १, श्री दुर्गा नगर, कोइंबतूर नॉर्थ कोइंबतूर भारतीयार युनिव्हर्सिटी, तामिलनाडू, ४. दिपक रामनाथ भट रा. ३३, ओम हाउसिंग सोसायटी, गौरक्षण रोड, चांदपुर, गांधीनगर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामनाथ श्रीधर भट
**पत्ता :-** रा. ज्योती विद्यालयाजवळ, ओम हाउसिंग सोसायटी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामनाथ श्रीधर भट यांचे दि. ३१/०१/२०२१ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खामगांव, यांचे न्यायालय**

CNR:MHBU05-001211-2025
अर्जदार तर्फे वकिल एस. आर. आंभोरे — ने. ता. ११/०३/२०२६
एम.जे.सी.क्र. ३९७/२५

**अर्जदार :** १) विमल चंदू मोरे वय - ५९ वर्ष, धंदा- गृहीणी, २) प्रमोद चंद्र मोरे वय- ४५ वर्ष, धंदा- शेती, ३) प्रकाश चंद मोरे वय- ४२ वर्ष, धंदा- शेती. ४) रवि चंदू मोरे वय- ३७ वर्ष, धंदा- शेती, सर्व रा. वेहाळा खु. ता. खामगांव जि. बुलडाणा ५) सौ. ज्ञानेश्वरी गौतम गवई वय- ४० वर्ष, धंदा-गृहीणी, रा. बटवाडी ता. बाळापुर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही

अर्ज - मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी

ज्याअर्थी अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असुन अर्जदार क्र. १ ह्या मयत याची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ ते ४ हे मयत यांचे मुले असुन, अर्जदार क्र. ५ ह्या मयत यांची मुलगी असुन, नामे मयत चंदु नामदेव मोरे, हे दि. २०/१२/२०२३ रोजी, मौजे वहाळा बु. ता. पातूर जि. अकोला येथे मयत झाले आहे. नमुद अर्जदार हे मयत नामे चंदु नामदेव मोरे, यांचे कायदेशीर वारस आहेत वारसाचे प्रमाणपत्र मिळणेसाठी वर नमुद प्रकरण वि न्यायालयात दाखल केलेले आहे. मयत नामे चंदु नामदेव मोरे, यांचे अर्जदारांव्यतीरीक्त कोणीही वारस नाही.

तेव्हा वरील अर्जदार यांनी या कोर्टात सदरहू मयत नामे चंद नामदेव मोरे, यांचे वारसांनी मुंबई रेग्युलेशन अक्ट १८२७ चे कलम २ अन्वये प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केलेला आहे. वरील अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रकरणातील वारस म्हणण्याबाबत व वारस प्रमाणपत्र त्यांचे नावे देण्याबाबत कोणाची काही हरकत असल्यास अथवा उजर असल्यास त्यांनी दिनांक ११/०३/२०२६ रोजी किंवा सदर नोटीस वर्तमान पत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर होउन आपल्या हरकती उपरोक्त प्रकरणात लेखी स्वरूपात कराव्यात. अशी कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास वरील प्रकरणात पुढील कारवाई करण्यात येउन अर्जदार हयांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. ०४/०२/२०२६ रोजी माझे सहीने व वि.न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का
**(विजय एस. कुळकर्णी)**
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, खामगांव

### जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ०३/२०२६ — प्रोसेस नं. २३३/२०२६
चौ.ता. ०५/०२/२०२६ — दिनांक : ०५/०१/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती रमा कृष्णराव गादे रा. सावंतवाडी, विठ्ठल मंदिरा जवळ, रणपिसे नगर, अकोला, ता. जि. अकोला. २. नितीकेत कृष्णराव गादे रा. सावंतवाडी, विठ्ठल मंदिरा जवळ, रणपिसे नगर, अकोला. वा. जि. अकोला. ३. स्वाती दिनेश घुले रा. डि-४/५०४, सुंदर सहवास, सनसिटी जवळ, आनंद नगर, सिंहगड रोड, पुणे ४. अनिकेत कृष्णराव गादे रा. सोमनाथ अपार्टमेंट जवळ, सुरभी लेआउट, तपोवन कॅम्प, अमरावती. ता. जि.अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कृष्णराव फकीरजी गादे
**पत्ता :-** रा. सावंतवाडी, विठ्ठल मंदिरा जवळ, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे को, मयत कृष्णराव फकीरजी गाडे यांचे दि. २२/१२/२०२५ रोजी निरामया हॉस्पिटल, खारगर, पनवेल, रायगड येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सवय वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारानी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३४७/२०२६ — प्रोसेस नं. २९७९/२०२६
चौ.ता. १०/०४/२०२६ — दिनांक : ०५/०३/२०२६

**अर्जदार :** १. मोहन लक्ष्मण देहानकर २. प्रमोद लक्ष्मण देहानकर ३. देवेंद्र लक्ष्मण देहानकर सर्व रा. गणेश नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : वत्सलाबाई लक्ष्मण देहानकर
**पत्ता :-** रा. जुना राठी हॉस्पिटल जवळ, गणेश नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वत्सलाबाई लक्ष्मण देहानकर यांचे दि. ३१/१०/२०१० रोजी ओझोन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३१२/२०२६ — प्रोसेस नं. २८५३/२०२६
चौ.ता. ०४/०४/२०२६ — दिनांक : ०२/०३/२०२६

**अर्जदार :** १. सौ. उज्वला रामेश्वर तंबाखे २. श्रीमती राणी ज्ञानेश्वर तंबाखे ३. स्वरा ज्ञानेश्वर तंबाखे ४. खुशी ज्ञानेश्वर तंबाखे सर्व रा. सांगवी (मोहाडी), पो. सुकोडा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : ज्ञानेश्वर रामेश्वर तंबाखे
**पत्ता :-** रा. सांगवी (मोहाडी), पो. सुकोडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ज्ञानेश्वर रामेश्वर तंबाखे यांचे दि. २५/१०/२०२५ रोजी मौजे सांगवी मोहाडी येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत. त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३२२/२०२६ — प्रोसेस नं. २८५७/२०२६
चौ.ता. ०६/०४/२०२६ — दिनांक : ०२/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती लक्ष्मी सुनिलकुमार राठी रा. ग्यानेश्वरी अपार्टमेंट, फ्लॅट नं. ४, राधा कृष्ण मंदिर जवळ, सावंत वाडी, अकोला. ता. जि. अकोला. २. अक्षय सुनिल राठी रा. अरकाडे सिरेन, फ्लॅट नं. २१०५-२१०६, अभंग समता सीएचएसएल, सुंदर नगर, एसव्ही रोड, दालमिया कॉलेज जवळ, मालाड वेस्ट, मुंबई, सबअर्बन ३. दिव्या सुनिल राठी रा. ग्यानेश्वरी अपार्टमेंट, ब्लॉक नं. ४, राधा कृष्ण मंदिर जवळ, सावंत वाडी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुनिलकुमार विठ्ठलदास राठी
**पत्ता :-** रा. ग्यानेश्वरी अपार्टमेंट, फ्लॅट नं. ४, राधा कृष्ण मंदिर जवळ, सावंत वाडी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुनिलकुमार विठ्ठलदास राठी यांचे दि. १५/०२/२०१२ रोजी आयकॉन हॉस्पिटल, रतनलाल प्लॉट, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर प्रसिद्धी

अकोला जिल्ह्यामध्ये जाहीर प्रसिद्धी देण्याच्या दृष्टीकोनातून दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धी देण्यात येते. अकोला तालुक्यामध्ये मजूरांना रोजगार मिळण्याचे दृष्टीने सहकारी तत्त्वावर मजूर सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले असून नियोजित संस्थेचे सभासद होवू इच्छिणाऱ्यांनी अकोला तालुक्यातील जे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करणारी व्यक्ती तसेच अल्पभूधारक व अत्यल्प भूधारक की जे उदर निर्वाहाकरिता शारीरिक श्रमाची कामे करतात अशा व्यक्तींनी अकोला तालुक्यातील इच्छिणाऱ्यांनी नियोजित समर्थ मजूर कामगार सहकारी संस्थेचे अस्थाई कार्यालय सिद्धार्थ लालाजी शिरसाट यांचे निवासस्थान मौजे उगवा, ता. जिल्हा अकोला येथे दि.१३/०३/२०२६ रोजी सकाळी ९:३० वाजता सभा आयोजित केली आहे. तरी इच्छिणाऱ्यांनी सभेस हजर राहावे ही विनंती.

**मुख्य प्रवर्तक**
श्री. सिद्धार्थ लालाजी शिरसाट
( नियोजित समर्थ मजूर कामगार सहकारी संस्था मर्यादित उगवा, जिल्हा अकोला )

### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३५२/२०२६ — प्रोसेस नं. २९७८/२०२६
चौ.ता. १०/०४/२०२६ — दिनांक : ०५/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती सत्यभामा मधुकर नाकट रा. तांदळी बु, ता. पातूर, जि. अकोला. ह. मु. विजय विद्युत कॉलनी, केशव नगर, पाण्याच्या टाकी जवळ, माधव नगर, अकोला. ता. जि. अकोला. २. प्रभाकर मधुकर नाकट रा. सि–११६, जिल्हा परिषद कॉलनी, शिव मंदिरा जवळ, खडकी बु, अकोला. ता. जि. अकोला. ३. संध्या अनंतराव तायडे रा. कारंजा रमजानपुर, ता. बाळापूर, जि. अकोला. ४. जयश्री जयदीश सरप रा. बजरंग चौक, वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला. ५. चारूदत्त मधुकर नाकट रा. ह. मु. विजय विद्युत कॉलनी, केशव नगर, पाण्याच्या टाकी जवळ, माधव नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मधुकर श्रीराम नाकट
**पत्ता :-** रा. विजय विद्युत कॉलनी, केशव नगर, पाण्याच्या टाकी जवळ, माधव नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर श्रीराम नाकट यांचे दि. २९/१२/२०२५ रोजी राहते घरी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ९६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# गर्भाशय कर्करोग लसीकरण मोहिमेची राज्याने घेतली दखल

## खा.अमर काळे यांच्या पुढाकारातून १० हजार मुलींना लस

**वर्धा/जनमाध्यम**

अमर काळे यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या गर्भाशय कर्करोग प्रतिबंधक लसीकरण मोहिमेची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली असून वर्धा जिल्ह्यातील सुमारे दहा हजार मुलींना एचपीव्ही प्रतिबंधक लस देण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतल्याची माहिती समोर आली आहे.

Mankind Pharma व स्वास्थ्य वृक्ष फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच खासदार अमर काळे यांच्या नेतृत्वाखाली



समुद्रपूर तालुक्यातील सात गावांमध्ये गर्भाशय कर्करोगमुक्त करण्यासाठी यशस्वी लसीकरण मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेची अधिकृत घोषणा २५ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात करण्यात आली. जिल्हा आरोग्य विभागाने या उपक्रमात सक्रिय सहकार्य केले.समुद्रपूर तालुक्यातील ही सात गावे गर्भाशय कर्करोग प्रतिबंधक लसीकरणात संपूर्ण यश मिळवणारी देशातील पहिली गावे ठरल्याचा दावा करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे वर्धा जिल्ह्याचे नाव राज्य आणि देशपातळीवर झळकले आहे.दरम्यान, ३ मार्च २०२६ रोजी लोकमतच्या 'हॅलो वर्धा' आवृत्तीत प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यातील दहा हजार मुलींना एचपीव्ही लस देण्यात येणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालय तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये डॉक्टरांच्या देखरेखीखाली ही लस दिली जाणार असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली.खासदार अमर काळे यांनी ही मोहीम केवळ सात गावांपुरती मर्यादित न ठेवता संपूर्ण वर्धा लोकसभा मतदारसंघ गर्भाशय कर्करोगमुक्त करण्याचा मानस व्यक्त केला आहे. आरोग्यविषयक दूरदृष्टी, नियोजनबद्ध अंमलबजावणी आणि सामाजिक बांधिलकी यांचे उदाहरण या मोहिमेतून दिसून येत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.जिल्ह्यातील मुलींच्या आरोग्य सुरक्षेसाठी उचललेले हे पाऊल स्वागतार्ह असून, या उपक्रमाचे श्रेय खासदार अमर काळे यांच्यासह मॅनकाईंड फार्मा, स्वास्थ्य वृक्ष फाऊंडेशन आणि जिल्हा आरोग्य विभागालाही दिले जात आहे.

# शेतकऱ्यांनी तुती लागवडीसाठी नोंदणी करण्याचे आवाहन

वर्धा/जनमाध्यम

पारंपारीक शेतीबरोबरच एक उत्तम पुरक व्यवसाय म्हणून रेशीम शेतीकडे पाहिल्या जाते. या शेतीबाबत जनजागृती होण्यासाठी जिल्ह्यात ४ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत महारेशीम अभियान राबविण्यात आले आहे. या अभियानात कालावधीत ज्या शेतकऱ्यांनी रेशीम नोंदणी केली नाही, अशा शेतकऱ्यांनी मार्च अखेरपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

अभियानासाठी शासनाने १ हजार ५० एकर रेशीम क्षेत्राचा लक्षांक निश्चित केला आहे. त्यात रेशीम विभाग ३२५ एकर, कृषि विभाग ३५० एकर व जिल्हा परिषद ३७५ एकर असा एकुण १ हजार ५० एकर क्षेत्रावर तुती लागवडीचा लक्षांक निश्चित करण्यात आला आहे. यासाठी शासनामार्फत मनरेगा योजनेंतर्गत तीन वर्षात अकुशल मजुरी २ लाख ७९ हजार २४० रुपये व कुशल मजुरी १ लाख ५३ हजार रुपये असे एकुण ४ लाख ३२ हजार २४० रुपये तसेच सिल्क समग्र व पोकरा योजनेंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गासाठी ७५ टक्के व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या प्रवर्गासाठी ९० टक्के अनुदान देण्यात येणार आहे.शेतकऱ्यांना रेशीम उत्पादनासाठी प्रोत्साहन देणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे व जिल्ह्यातील रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी महारेशीम अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेऊन आपली नोंदणी आपले सरकार पोर्टलवर करावी, असे जिल्हा रेशीम विकास अधिकारी यांनी कळविले .

# लाईनमन दिन उत्साहात साजरा

## कर्मचाऱ्यांना सुरक्षिततेचा संदेश

**वर्धा/जनमाध्यम**

महावितरणच्या वर्धा विभागीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी लाईनमन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. नागपूर रोडवरील एस.बी.एम. हॉल येथे आयोजित या कार्यक्रमाला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमापूर्वी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्धा मंडळाच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून विद्युत निरीक्षक संजय आंबेकर, समाजप्रबोधनकर्ते तथा महावितरणचे सेवानिवृत्त सहाय्यक अभियंता भाऊसाहेब थुटे उपस्थित होते. यावेळी कार्यकारी



अभियंता शर्मिला इंगळे, वर्धा मंडळाचे व्यवस्थापक प्रफुल्ल गिरी यांचीही प्रमुख उपस्थिती होती.यावर्षी सेवानिवृत्त होणारे जनमित्र चंद्रकांत नाईक (तंत्रज्ञ, तळेगाव वितरण केंद्र), अनिल आवरकर (प्रधान तंत्रज्ञ, वर्धा शहर वितरण केंद्र १) तसेच महिला जनमित्र अंबिका चहांदे (वरिष्ठ तंत्रज्ञ, वायगाव वितरण केंद्र) यांचा विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी अभियंता नरेश पारधी यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे संजय आंबेकर, सेवानिवृत्त प्रधान लाईनमन कडू, सेवानिवृत्त सहाय्यक अभियंता भाऊसाहेब थुटे तसेच जनमित्र प्रतिनिधी नाईक, आवरकर, अंबिका चहांदे, उत्तम थूल, रामदास कन्नाके व देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणात अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांनी कर्मचाऱ्यांनी काम करताना मन शांत ठेवून सुरक्षिततेचे सर्व नियम पाळावेत, असा संदेश दिला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अतिरिक्त कार्यकारी अभियंता फाळे, उपकार्यकारी अभियंता सवालाखे, पेंदामकर तसेच श्रीमती खोडवे यांनी विशेष प्रयत्न केले.

# जामगाव खडीकरण कामात अनियमितता नाही

## कार्यकारी अभियंता शुभम गुंडातवार यांची प्रत्यक्ष पाहणी

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

आष्टी तालुक्यातील माणिकवाडा ग्रामपंचायत हद्दीतील जामगाव येथे सुरू असलेल्या खडीकरण व सिमेंट रस्ता बांधकामात अनियमितता होत असल्याची तक्रार करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्ष स्थळ पाहणी व नमुना तपासणीनंतर काम नियमांनुसार सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे.

माजी उपसरपंच अंकित कावळे यांनी खडीकरणाच्या कामाबाबत तक्रार नोंदविली होती. त्यानुसार वर्धा येथील बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम गुंडातवार यांनी ४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता जामगाव येथे भेट देत घटनास्थळी सविस्तर चौकशी केली.जामगाव येथे सुमारे तीस लाख रुपये खर्च करून प्रथम खडीकरण व त्यानंतर सिमेंट रस्ता बांधकामाचे काम मंजूर आहे. तक्रारीनंतर जिल्हा परिषद बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांनी वेळोवेळी पाहणी केली होती. तरीही समाधान न झाल्याने अंतिम तपासणीसाठी कार्यकारी अभियंता स्वतः गावात दाखल झाले.यावेळी



उपविभागीय अभियंता विनोद दिवटे व शाखा अभियंता विवेक खराबडे उपस्थित होते. संबंधित रस्त्यावर टाकलेल्या खडीचे नमुने तपासण्यात आले. तपासणीनंतर काम नियमानुसार व दर्जेदार होत असल्याचे कार्यकारी अभियंता गुंडातवार यांनी तक्रारकर्त्यांसमक्ष स्पष्ट केले.या पाहणीवेळी गावातील अशोक मोगरे, पत्रकार सुनील साबळे, ओंकार दांडाळे, शिवाजी चंदीवाले यांच्यासह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. अधिकाऱ्यांच्या स्पष्टीकरणानंतर कामाबाबतचा गैरसमज दूर झाल्याचे सांगण्यात आले.

# आजपासून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान

**वर्धा/जनमाध्यम**

विविध शासकीय सेवा अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने तहसील कार्यालय, आर्वी मार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. महसूल प्रकरणांचा निपटारा, नागरिकांच्या अडचणींचे तत्पर निराकरण आणि प्रशासनातील कार्यक्षमता वाढविणे हा या उपक्रमाचा हेतू आहे. अभियानांतर्गत तालुक्यात ठिकठिकाणी शिबिरे घेण्यात येणार आहेत.

अभियानांतर्गत मंडळस्तरावर शिबिरे आयोजित आहे. त्यात दि.७ मार्ज रोजी रोहणा, दि.१४ मार्च वाढोणा, दि.२७ मार्च वाठोडा, दि.१० एप्रिल दाउतपूर, दि.१७ एप्रिल विरुळ, दि.८ मे आर्वी तर दि.१५ मे रोजी खरांगणा येथे शिबिर होणार आहे. शिबिरांमध्ये प्रलंबित फेरफार प्रकरणांचा निपटारा, सातबारा उताऱ्यातील त्रुटी दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा व ८-अ उतारे वितरण, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन, सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजुरी, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक दाखले, तुकडेबंदी कायद्याशी संबंधित प्रकरणे, पाणंद रस्त्यांच्या मान्यतेचे आदेश, घरपट्टे वाटप, ई-मोजणी अर्ज, ॲग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी, भूसंपादन व अकृषिक परवानगी प्रकरणे आदींचा समावेश आहे.यासोबतच विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यात प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क, लोकसेवा हक्क कायदा-तत्काळ संपा, अकृषक तरतुदीसंदर्भातील सुधारणाबाबत मार्गदर्शन, भूसंपादन केलेल्या व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर अद्ययावत करणे, नागरी सुविधा, एक खिडकी व्यवस्था, ई-मोजणी, सर्वासाठी घरे अंतर्गत पट्टे वाटप करणे, तुकडेबंदी कायद्याबाबतची प्रकरणे निकाली काढणे व इतर विभागाशी निगडीत कामे केली जाणार आहे. शिबिरामध्ये विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन, अर्ज स्वीकृती, तक्रारीचे निवारण आणि प्रलंबित प्रकरणांवर तात्काळ कार्यवाही करण्यात येणार आहे.

# मृत्यूच्या छायेतून जीवनाकडे झेप; सावंगीतील डॉक्टरांची वैद्यकीय किमया

## अत्याधुनिक उपचारांनी ६३ वर्षीय रुग्णाला नवसंजीवनी

**वर्धा/जनमाध्यम**

मृत्यूच्या छायेत जगणाऱ्या ६३ वर्षीय रुग्णाला सावंगी (मेघे) येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) मधील डॉक्टरांनी टप्प्याटप्प्याने उपचार करत अक्षरशः नवजीवन दिले. वेरीकोज व्हेन्सच्या गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या या रुग्णाची गुंतागुंतीची स्थिती पाहता शस्त्रक्रिया आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम साधत वैद्यकीय पथकाने ही यशस्वी मोहीम राबवली.

सदर रुग्णाला अनेक वर्षांपासून वेरीकोज व्हेन्सचा त्रास होता. सुमारे दहा वर्षांपूर्वी यवतमाळ येथे त्याच्यावर व्हेन स्ट्रिपिंग शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मात्र त्यानंतर डाव्या पायावर वेदनादायक व न भरून येणारी जखम तयार झाली. सूज, असह्य वेदना आणि रक्तप्रवाहातील अडथळ्यामुळे त्याला चालणेही कठीण झाले होते. दैनंदिन जीवन अक्षरशः ठप्प झाले होते.रुग्णालयातील तज्ज्ञांनी केलेल्या तपासणीत डाव्या कॉमन व एक्सटर्नल इलिएक व्हेन्समध्ये गंभीर ब्लॉकेज आढळून आले. यामुळे रक्तप्रवाह सुरळीत होत नव्हता आणि जखम भरून येण्याची प्रक्रिया थांबली होती. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन प्रथम कॉमन इलिएक व्हेन स्टेंटिंग शस्त्रक्रिया करण्यात आली. स्टेंट बसवल्यानंतर रक्तप्रवाह सुधारला आणि उपचारांचा पुढील टप्पा सुरू करण्यात आला.यानंतर जखम लवकर भरून येण्यासाठी व्हॅक्यूम-असिस्टेड क्लोजर (व्हीएसी) तंत्राचा वापर करण्यात आला. विशेष फोम व सक्शन मशीनच्या साहाय्याने जखमेतील संक्रमित द्रव बाहेर काढण्यात आले. या आधुनिक पद्धतीमुळे जखमेमध्ये निरोगी ऊतकांची वाढ वेगाने होऊन भरून येण्याची प्रक्रिया गतिमान झाली.ही संपूर्ण बहुआयामी उपचारप्रक्रिया शस्त्रक्रिया विभागाचे प्रमुख व प्राध्यापक डॉ. राजू शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

# स्वाधार योजनेच्या लाभार्थ्यांना २० मार्चपर्यंत

## त्रुटीची पुर्तता करण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी केल्यानंतर विविध त्रुटीमुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज परत करण्यात आले आहे. अशा परत करण्यात आलेल्या अर्जाच्या त्रुटीची पुर्तता २० मार्च पर्यंत करुन ऑनलाईन परत करण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

वसतीगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबोद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तारावरील महाविद्यालयात, शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृहातील मुला-मुलीप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बैंक खात्यामध्ये थेट जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता सदर योजनेचे अर्ज ऑनलाईन स्वीकारण्यात आले होते.अर्जाची तपासणी केल्यानंतर नवीन अर्जासाठी जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अपलोड न करणे अथवा कागदपत्रे अस्पष्ट असणे, नुतनीकरण अर्जासाठी मागील वर्षाचे गुणपत्रक अपलोड न करणे तसेच त्रुटींची पूर्तता न करता अर्ज जसाच्या तसा थेट सादर करणे, अशा प्रमुख विविध त्रुटींमुळे संबंधित विद्यार्थ्यांकडे अर्ज सेंड बॅक करण्यात आले आहेत.

सेंड बॅक झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या नलाईन पोर्टलवर लॉगिन करून आपल्या अर्जातील त्रुटींची ऑनलाईन पुर्तता २० मार्च पर्यंत करावी. त्रुटीपूर्तीनंतर सर्व आवश्यक कागदपत्रांसह त्या कार्यवाहीची हार्ड कॉपी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, वर्धा येथे जमा करणे अनिवार्य आहे. अद्यावत सुचना व योजनेची परिपुर्ण माहितीकरीता https://www.swadharwardha.blogspot.com या संकेतस्थाला भेट द्यावी व त्यावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या QR कोडने Whatsapp group Join keâjekee.जे विद्यार्थी मुदतीत त्रुटीपूर्ती करणार नाहीत किंवा अर्धवट त्रुटीपूर्ती करतील, त्यांचे अर्ज कायमस्वरूपी नाकारले जातील व त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची स्वतःची राहील. एकदा नाकारलेले अर्ज पुन्हा विचारात घेण्याची तरतूद नसल्याने विद्यार्थ्यांनी वेळेत त्रुटीपूर्ती करावी, असे समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त अंकेश केदार यांनी कळविले आहे.

# बिएलओच्या कामांतून शिक्षकांना मुक्त करा

## विद्यार्थ्यांच्या हितासाठी नियुक्ती आदेश रद्द करण्याची मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक व प्राथमिक शाळांतील शिक्षकांना देण्यात आलेले बीएलओ नियुक्तीचे आदेश तात्काळ रद्द करावेत, अशी मागणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघने जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भात बुधवारी निवेदन सादर करण्यात आले.

संघाच्या मते, बीएलओचे काम हे पूर्णतः अशैक्षणिक स्वरूपाचे आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या २८ ऑगस्ट २०२४ च्या शासन निर्णयात शिक्षकांना अशा कामांसाठी नियुक्त करू नये, असे स्पष्ट नमूद आहे. तसेच बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम २७ नुसारही शिक्षकांना अशैक्षणिक जबाबदाऱ्या देण्यास मनाई आहे. तरीदेखील जिल्ह्यातील अनेक शिक्षक मागील आठ ते दहा वर्षांपासून बीएलओचे काम करीत असल्याचे संघाने नमूद केले.सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू असून शिक्षक परीक्षा केंद्रांवर विविध जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. पुढील काळात पाचवी ते अकरावीच्या परीक्षा, पेपर तपासणी, निकाल प्रक्रिया व प्रवेशप्रक्रिया अशी कामे पार पाडावी लागणार आहेत. अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याने कार्यरत शिक्षकांवर आधीच अतिरिक्त भार आहे.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून बीएलओसह सर्व अशैक्षणिक कामांतून शिक्षकांना मुक्त करावे व संबंधित आदेश रद्द करावेत, अशी मागणी संघाने केली आहे.

# संक्षिप्त

### पटवारी कॉलनीतून दुचाकी लंपास

**हिंगणघाट -** शहरातील पटवारी कॉलनी परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकी लंपास केल्याची घटना उघडकीस आली. गंगाधर मेश्राम (वय ५०, रा. रिमडोह) यांचा मुलगा गेडेकार चहा कॅन्टीन येथे चहा पिण्यासाठी गेला होता. त्याने बाहेर उभी केलेली एमएच-३२ एयू ७४३६ क्रमांकाची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. काही वेळाने परत आल्यावर दुचाकी जागेवर नसल्याचे लक्षात येताच त्याने शोधाशोध केली. मात्र दुचाकीचा काहीच मागमूस लागला नाही. यानंतर याबाबत हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आहे. शहरात दुचाकी चोरीच्या घटना वाढत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

### फार्महाऊसमधून शेती साहित्याची चोरी

**सेलू -** गोंदापूर शिवारातील फार्महाऊसमधून अज्ञात चोरट्याने शेतीसाठी उपयोगी साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. घनश्याम बोरकर (वय ५४, रा. पवनार) यांचे गोंदापूर शिवारात शेत असून त्यांनी शेती साहित्य ठेवण्यासाठी फार्महाऊस बांधले आहे. अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास फार्महाऊसचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर शेतीकामासाठी लागणारे विविध साहित्य असा सुमारे ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. सकाळी शेतात गेल्यावर हा प्रकार लक्षात आला. याबाबत सेलू पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद केला आहे. ग्रामीण भागात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

### क्षुल्लक कारणावरून वृद्धास मारहाण

**वडनेर -** किरकोळ कारणावरून एका वृद्धास मारहाण केल्याची घटना खेकडी येथे उघडकीस आली. मनोहर गोंदुडे (रा. खेकडी) यांच्या नातवाला प्रेम लांडगे व राहुल बावणे हे शिवीगाळ करीत होते. हा प्रकार पाहून मनोहर गोंदुडे यांनी त्यांना शिवीगाळ करू नका, अशी समज दिली. मात्र या गोष्टीचा राग आल्याने दोघांनी संतापाच्या भरात गोंदुडे यांना मारहाण केली. त्यांच्या हातातील कड्याने वार केल्याने ते जखमी झाले. परिसरातील नागरिकांनी मध्यस्थी करून वाद शांत केला. जखमी वृद्धाने याबाबत वडनेर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी प्रेम लांडगे व राहुल बावणे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### युवकावर ब्लेडने हल्ला

**देवळी -** किरकोळ वादातून एका युवकावर ब्लेडने हल्ला केल्याची घटना देवळी शहरात घडली. रवी कासार (रा. कोल्हापूर-राव) हा जेवण करून परिसरात फिरत असताना रोशन कुभेकार शाळेजवळील पाण्याच्या टाकीजवळ त्याला रोशन कुभेकार भेटला. त्याने रवीला 'तुझा हात दाखव' असे सांगितले. रवीने डावा हात पुढे करताच रोशनने त्याच्या तळहातावर ब्लेडने वार केला. या घटनेत रवी जखमी झाला. दरम्यान वाद सोडविण्यासाठी गेलेल्या रवीच्या मोठ्या भावाच्या ओठावरही ब्लेडने वार करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. देवळी पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### दुचाकीच्या डिक्कीतून २७ हजारांची रोकड लंपास

**कारंजा (घा.) -** दुचाकीच्या डिक्कीत ठेवलेली रोकड अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना नागलवाडी शिवारात उघडकीस आली. भूषण मलवे (रा. ठाणेगाव) यांचे किराणा दुकान असून ते किराणा साहित्य खरेदीसाठी दुचाकीने कारंजा येथे जात होते. नागपूर-अमरावती महामार्गावरील नागलवाडी शिवारात त्यांनी काही वेळ दुचाकी थांबविली. यावेळी दोन अनोळखी व्यक्ती दुचाकीवर आले व त्यांनी रस्ता विचारत संवाद साधला. त्यानंतर ते तेथून निघून गेले. पुढे कारंजा येथे पोहोचल्यावर मलवे यांनी दुचाकीची डिक्की उघडली असता त्यात ठेवलेले २७ हजार रुपये गायब असल्याचे लक्षात आले. याप्रकरणी कारंजा पोलिसांनी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### आजाराला कंटाळून आत्महत्या

**वर्धा -** दीर्घकाळ आजाराने त्रस्त झाल्याने एका व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. मनोज मलोंडे (वय ४१, रा. गणेशपूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते काही काळापासून आजाराने त्रस्त होते. आजारपणामुळे मानसिक तणाव वाढल्याने त्यांनी राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपविल्याची माहिती समोर आली आहे. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. कुटुंबीयांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. सावंगी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

### कॅनलमध्ये बुडून व्यक्तीचा मृत्यू

**देवळी -** कॅनलमध्ये बुडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. सतीश बोटफोले (वय ४२, रा. नांदोरा-डफरे) असे मृताचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार सतीश बोटफोले यांनी मद्यप्राशन केले होते. त्यानंतर ते कॅनलमध्ये आंघोळीसाठी गेले. दरम्यान पाण्याचा अंदाज न आल्याने ते खोल पाण्यात गेले आणि बुडाले. काही वेळाने परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास हा प्रकार आला. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. देवळी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ९९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### तालुक्यातून मराठी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांला हजारोंचे बक्षीस!



**शिराळा-** येथील स्व. भागीरथीबाई देशमुख वाचनालयात झालेल्या सहकार नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तसेच महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा अध्यक्ष मनोजभाऊ देशमुख यांनी आपल्या वाढदिवसाला मनोगत व्यक्त करतानी स्व अजित दादा पवार यांच्या स्मरणार्थ अमरावती तालुक्यातुन दहावी मध्ये मराठी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांला ५१ हजार रु बक्षीस देण्यात येईल. सदर वाढदिवसाला मनोजभाऊ देशमुख, डॉ सचिन देशमुख, मंगेश काळमेघ, अभिजित देशमुख, पी.आर. देशमुख, कुशल देशमुख, प्रविण कडु, राजेंद्र केणे, डॉ समिर बाला, मनिष दहापुते, संजय भोवाळु, सुनील कुकडे, भरत अवघड, पत्रकार डीआर वानखडे, अरुणभाऊ देशमुख, अनुज देशमुख, संजय कुकडे, शिवा भंडारे, इरफान मुल्ला, नासीर भाई, जुनेद पठाण,वानखडे , विलास गायकवाड ब्रा. भगत, प्रतिक कोल्हे, सुरज फरतोडे, शशिकांत कडु, मुन्ना केने, मुन्ना केने, शहजादखा पठाण, अभिजित न देशमुख दिनेश मुंदाने, प्रमोद गोहत्रे दिपक तायवाडे, नरेश मानकर रमेश मालवे वनराज मोहोड बाबुराव धाकडे आदी उपस्थित होते.

### शशिकला कुऱ्हेकर यांना श्रध्दांजली



**अमरावती-** साईनगर येथील सत्यशोधक माळी समाज बचत गटाचे संस्थापक सचिव, पुरोगामी चालवळीतील सक्रिय कार्यकर्ते संतोषराव कुऱ्हेकर यांच्या मातोश्री शशिकला श्रीकृष्णराव कुऱ्हेकर यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्याचे वय ८० होते. यावेळी स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ अमरावती जिल्याच्या वतीने जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर, पदाधिकारी सर्वश्री संजय वाघुळे, वि. दा. पवार, भास्कर काळे, अंगत दाभाडे, विजय हरणे, विजय काळे, विजय ठाकरे, सुनील तायडे, प्रकाश रहाटे, डॉ. म्हाला, अमीर शहा, प्रतीक पाटील, प्रेमदास मानकर, जयानंद खरड,सुनील घटाळे, विनोद शापामोहन, कासम शहा, तसेच सर्वानी श्रीमती शशिकला कुऱ्हेकर यांना श्रद्धांजली वाहली.

# स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड नाही

## अमरावती कचरामुक्त करण्याचा महापौरांचे आवाहन



**अमरावती/ का.प्र.**

शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी अमरावती महानगरपालिकेने कारवाई सुरु केली आहे. स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देत शहरातील अडचणींवर सर्वांच्या सहकार्याने मात करून अमरावतीला सुंदर आणि कचरामुक्त शहर बनवण्याचा निर्धार महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी व्यक्त केला आहे. शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

महापौर तेजवाणी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत महानगरपालिका प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, स्वच्छता विभागाचे कर्मचारी, 'कोणार्क इन्फ्रा' कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. शहरातील कचरा संकलन व्यवस्था अधिक सक्षम आणि गतिमान करण्यासाठी विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील स्वच्छतेच्या कामांमध्ये कोणतीही ढिलाई चालणार नाही, असे स्पष्ट करत महापौरांनी कंत्राटदारांना कामकाजात सुधारणा करण्याचे निर्देश दिले. बैठकीदरम्यान शहरातील कचरा संकलनाची प्रक्रिया अधिक वेगाने आणि प्रभावीपणे राबवण्यासाठी कर्मचाऱ्यांची संख्या तातडीने वाढवण्याचे आदेश महापौरांनी कोणार्क कंपनीला दिले. शहरात काही ठिकाणी मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे कचरा संकलनात अडचणी निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली होती. त्यामुळे या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.दरम्यान, शहरात अलीकडेच मोठ्या प्रमाणात नवीन घंटागाड्या दाखल करण्यात आल्या आहेतयामुळे नागरिकांकडून येणाऱ्या कचरा संकलनासंदर्भातील तक्रारींमध्येही लक्षणीय घट होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी केवळ मनपाची जबाबदारी नसून कंत्राटदार, अधिकारी आणि सर्वसामान्य नागरिकांनीही समान सहभाग घेणे आवश्यक असल्याचे महापौरांनी यावेळी नमूद केले. शहरात स्वच्छतेच्या बाबतीत काही अडचणी असल्या तरी त्यावरून हात झटकून चालणार नाही.

सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास अमरावतीला स्वच्छ आणि कचरामुक्त शहर बनवणे शक्य असल्याचे त्यांनी सांगितले.नागरिकांनी देखील स्वच्छतेच्या या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापौरांनी केले. सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे आणि स्वच्छता राखण्यासाठी प्रशासनाला मदत करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.'सुंदर अमरावती' हे ध्येय साध्य करण्यासाठी महानगरपालिका आणि स्वच्छता कंत्राटदार यांच्यात समन्वय वाढवण्यावर सध्या विशेष भर दिला जात आहे. आगामी काळात स्वच्छता व्यवस्थेमध्ये आणखी सुधारणा करून शहराला स्वच्छतेच्या बाबतीत आदर्श बनवण्याचा मानस महानगरपालिकेने व्यक्त केला आहे.या बैठकीत अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, नगरसेविका लविणा हर्षे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, स्वास्थ अधिक्षक विजय बुरे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजु ढिक्याव, श्रीकांत डवरे, कुंदन हडाले, शारदा गुल्हाणे, राजेश राठोड, स्वास्थ निरीक्षक, कंत्राटदार, बिटप्यून, सफाई कामगार, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

### शिवजयंती निमित्त राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धा



**कुऱ्हा -** श्री. गणेशदास राठी छात्रालय समिती अमरावती द्वारा संचालित श्री. तनसुखदास राठी विद्यालय वऱ्हा येथे आम्ही सेवेकरी बहूउद्देशिय संस्था अमरावती यांच्या द्वारे शिवजयंती निमित्त राज्यस्तरीय ऑनलाईन चित्रकला स्पर्धेचे (५ ते १८) वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी आयोजन करण्यात आलेले होते. सदर परीक्षेकरिता एकूण ३०० विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते. तनसुखदास राठी विद्यालय वऱ्हा येथील विद्यार्थिनी सानिका वानखडे या परीक्षेत राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाली. मराठी गौरव भाषा दिन व विज्ञान दिवसाचे औचित्य साधून तिचा आज विद्यालयाचे माननीय मुख्याध्यापक संजय पाचंगे तसेच आम्ही सेवेकरी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष हर्षद धांडे, सेवेकरी लुकेश बद्रे, संजित वानखडे, अनिकेत अस्तिकर यांच्या मार्फत तिचा प्रमाण पत्र,पदक देऊन सत्कार करण्यात आला.

तिला या परीक्षेकरिता विद्यालयाच्या कला शिक्षिका रोशनी गंगन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशस्वी वाटचाली करिता व उज्वल शैक्षणिक भविष्याकरिता विद्यालयातील संपूर्ण शिक्षक वृंद तसेच सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तिला शुभेच्छा प्रदान केल्या.

# गॅस पाईपलाईनच्या कामामुळे धुळीचे साम्राज्य

## प्रदूषण नियंत्रण मंडळाला चौकशीचे आदेश



**अमरावती/ प्रतिनिधी**

शहरात सुरू असलेल्या गॅस पाईपलाईनच्या कामामुळे सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या प्रकरणाची दखल घेत महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने (श्झ्ँ) तातडीने चौकशी करून 'अदानी गॅस लिमिटेड'ला आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

नांदगाव खंडेश्वर शहरात सध्या विविध प्रभागांमध्ये गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, संबंधित कंत्राटदाराकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात माती आणि धूळ साचली आहे. कंत्राटदाराने पाण्याचा फवारा मारणे बंधनकारक असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. याचा सर्वाधिक फटका लहान मुले, वृद्ध आणि श्वसनाच्या विकार असलेल्या रुग्णांना बसत असून शहरात डोळ्यांचे व घशाचे आजार वाढले आहेत.या गंभीर समस्येबाबत प्रभाग क्र. १४ च्या नगरसेविका प्रांजली राहुल गुल्हाने यांनी प्रशासनाकडे लेखी तक्रार केली होती.

विकासकामासाठी रस्ते खोदणे आवश्यक असले तरी नागरिकांचे आरोग्य पणाला लावणे चुकीचे आहे. कंत्राटदाराने दिवसातून किमान ३ वेळा पाणी फवारावे आणि खोदलेली माती तात्काळ हटवावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा त्यांनी दिला होता. मंडळाच्या पथकाने नांदगाव खंडेश्वर येथे भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करावी आणि अदानी गॅस लिमिटेडला कामाच्या ठिकाणी धुळीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. या कार्यवाहीमुळे त्रस्त नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

### संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त बिलासपूर येथे दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन




**अमरावती/ का.प्र**

संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रसंत शिरोमणी गाडगे बाबा जन्मोत्सव समिती, छत्तीसगड द्वारा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संत गाडगेबाबा अध्यासन केंद्राच्यावतीने संत गाडगे बाबा यांच्या दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनीचे पंडित दीनदयाल उपाध्याय ऑडिटोरियम, जीई रोड, रायपूर, छत्तीसगड येथे आयोजन करण्यात आले होते.

प्रदर्शनीचे उद्घाटन प्रसंगी श्रीविष्णू देव साय, मुख्यमंत्री, छत्तीसगड,अरुण सावजी, उपमुख्यमंत्री छत्तीसगड, पद्मश्री रामलाल बरेठ, ब्राजमोहन अग्रवाल, खासदार रायपूर, राजेश मनोज, आ. पश्चिम रायपूर, सुनील सोनी, आ.दक्षिण रायपूर मीनल चौबे, महापौर, रायपूर, तुलसी कौशिक, खाजगी सहाय्यक, मुख्यमंत्री छत्तीसगड, बजरंग रजत, बिलासपूर, गाडगे बाबांचे नातू उमेश जानोरकर आदी उपस्थित होते. संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. दिलीप काळे, यांनी अतिथींना गाडगे बाबांचे कार्य तसेच अध्यासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणा-या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी छत्तीसगड प्रदेशातील रजक समाजाचे महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त बैसवारा रजक समाज व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित देवकीनंदन दीक्षित सभागृह लालबहादूर शास्त्री शाळेचे मैदान बिलासपूर, छत्तीसगड येथे जयंत्युत्सव, वधू - वर परिचय मेळावा व संत गाडगे बाबा यंच्या दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी बिलासपूरचे आमदार व माजी मंत्री अमर अग्रवाल, आ.सुशांत शुक्ला, प्रल्हाद रजक, राज्यमंत्री छत्तीसगड, रजतकार विकास बोर्ड पद्मश्री रामलाल बरेठ, तुलसी कौशिक, खाजगी सहाय्यक मुख्यमंत्री छत्तीसगड, पुजा विधानी, महापौर बिलासपूर महानगरपालिका,निलेश रजक, अध्यक्ष बिलासपूर, रजक समाज, डॉ. दिलीप काळे, संत गाडगे बाबा अध्यासन प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, तसेच बिलासपूर, रायपूर, दुर्ग, राजनांदगाव, भिलाई येथील रजक समाजाचे अध्यक्ष उपस्थित होते.

### बॅरि.आर.डी.आय.के महाविद्यालयात विकसित भारत युवा संसद




**अमरावती-** मेरा युवा भारत अमरावती, युवा कार्यक्रम व खेल मंत्रालय भारत सरकार व बॅरि. आर.डि.आय.के महाविद्यालय बडनेरा येथे जिल्हास्तरीय युथ पार्लमेंटचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी युथ पार्लमेंटच्या उद्घाटन समारंभामध्ये अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर.डी. देशमुख हे होते तर उद्घाटक दिनकर चोरे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ समाजसेवक प्रशांत जाधव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वय प्रा. संचिता पिंपळे मेरा युवा भारत कार्यक्रम अधिकारी अजिंक्य गवळी, प्रा. नकुल देशमुख तर परीक्षक म्हणून प्रा. पूजा देशमुख, प्रा. अभय तायडे, प्रा. अमोल ठाकरे, प्रा. अंकुश बिजाका, प्रा. विशाल मेश्राम हे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी 'आणीबाणीचे ५० वर्ष भारतीय लोकशाहीसाठीचे धडे' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. ज्यामध्ये प्रतीक्षा शिंदे, श्रेया ठाकूर, प्रेम कावलकर, भाग्यश्री मानकर व भक्ती राजकुमार यांचे नियुक्ती झाली असून हे विद्यार्थी राज्यस्तरावर अमरावती जिल्ह्याचा प्रतिनिधित्व करणार आहे. या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रा. अंकुश मानकर यांनी मांडले या कार्यक्रमाकरिता प्रा. अतुल काळबांडे, प्रा. अनुराधा सूर्यवंशी, प्रा. वैशाली कापसे, सागर आगरकर, कैलास कुशवाह, गायत्री गौर, श्रेयस मेटे, उत्कर्ष लेंडे, सलोनी मानवटकर, पायल पांचारे आदींनी कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता सहकार्य केले.

### ज्योती इंगोले यांचे निधन



**कुऱ्हा -** तिवसा तालुक्यातील घोटा येथील रहिवाशी, तिवसा खरेदी विक्री संघाच्या सचिव ज्योती चंद्रशेखार इंगोले (रोंघे) यांचे वयाच्या (४५ व्या) २ मार्च २०२६ ला अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी, असा बराच मोठा आप्त आहे.स्व.ज्योतीताई इंगोले त्यांच्या अंत्यविधी ३ मार्च ला दुपारी १२ वा. करण्यांत आला. यावेळी सर्वच स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. याप्रसंगी सामूहीक श्रध्दांजली देण्यांत आली.

### आज इस्कॉनतर्फे वार्षिक वैष्णवी महिला पदयात्रा



**अमरावती/ का.प्र.**

राठी नगर स्थित श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश अध्यात्मिक संस्कार केंद्र (इस्कॉन), अमरावती आय. जी. एफ. (इस्कॉन गर्ल्स फोरम) द्वारे युवतींसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.इस्कॉन अमरावती गर्ल्स फोरम द्वारा, इस्कॉन संस्थापक आचार्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचे वरिष्ठ शिष्य, इस्कॉन पदयात्रा मिनिस्टर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाद्वारे जीवन गौरव सन्मानाने पुरस्कृत, विश्वविख्यात त्रीदंड संन्यासी परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेने सातव्या वार्षिक वैष्णवी महिला पदयात्रेचे आयोजन ७ मार्च २०२६ रोजी करण्यात येत आहे. या पदयात्रेकरिता अमरावती जिल्ह्याच्या विभागीय आयुक्त मा. श्वेता सिंघल यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून. त्यांच्या द्वारे या पदयात्रा कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा सुद्धा होणार आहे. उद्घाटन कार्यक्रमानंतर श्वेता सिंघल भगवा झेंडा दाखवीत ह्या पदयात्रेची सुरुवात होईल. हि पदयात्रा ७ मार्च सायंकाळी ५:०० वाजता श्री सतीधाम मंदिर येथून निघेल, पदयात्रेमध्ये भगवान श्रीकृष्ण यांचे कलियुगातील प्रेमावतार पतित पावन श्री श्री गौर नीताई व इस्कॉन संस्थापकाचार्य श्री श्रीमद ए. सी. भक्तीवेदांत स्वामी प्रभुपाद यांचे श्री विग्रह राहणार आहेत. या पदयात्रेचा प्रारंभ श्री सतीधाम मंदिर येथून होणार असून पदयात्रेची समाप्ती श्री एकविरा देवी मंदिर येथे होईल.या पदयात्रेमध्ये अनेक महिलांचा सहभाग राहणार असून त्यामध्ये महाराष्ट्रातून अनेक वैष्णवी महिला मंडळींचा मोठ्याप्रमाणात सहभाग राहणार आहे. म्हणून अमरावती शहरातील अधिकाधीक महिला मंडळींनी या पदयात्रेमध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन इस्कॉन अमरावती गर्ल्स फोरम द्वारा करण्यात येत आहे.

### शेतातील मोटार पंप साहित्याची चोरी



**अंजनगावबारी-** परिसरातील बऱ्याच अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतातील मोटार पंप साहित्य यामध्ये केबल, सेक्शन पाईप, स्टार्टर, मेन स्वीच इ.साहित्य चोरीला जात आहे. याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी बडनेरा पोलीस स्टेशनला तक्रार देऊनही अद्यापही अज्ञात चोरट्यावर कार्यवाही करण्यात आली नाही.बडनेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अंजनगाव बारी परिसरात हजोरो हेक्टर जमीन ओलिताखाली असुन बऱ्याच सदन शेतकऱ्यांचे हजारोंचे साहित्य शेतात आहे तेव्हा अज्ञात चोरट्यांना आळा न बसल्यास यापासून त्यांना प्रोत्साहन मिळणार यात शंका नाही. त्याबाबत शेतकऱ्यांनी बडनेरा पोलीस स्टेशनला प्रत्यक्ष तक्रार देऊनही तात्कालीन चोरी विषयी जबाबदार चोरांचा थांगपत्ताही लागला नाही आता ही सुरूवात असुन पुन्हा शेतातील साहित्य चोरीला जाण्याची भीती शेतकरी वर्ग बाळगून आहे. याची दखल घेत संबंधित पोलिस प्रशासनाने परिसरातील संशयित चोरट्यांवर कार्यवाहीची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

### सेवा निवृत्तांच्या समस्या सोडविणे हेच आपले ध्येय-संभाजी रेवाळे



**अमरावती/ का.प्र.**

अमरावती जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांची सभा उजैन येथे नुकतीच रमेशजी मळसणे यांचे अध्यक्षतेखाली व सुरेंद्रजी पाथरे यांचे प्रमुख उपस्थितीत झाली.सेवानिवृत्त शिक्षकांच्या समस्या सोडविणे हेच आपले ध्येय असून त्यांना संघटित करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात सभासद नोंदणी व जागृतीसाठी सभा आयोजित करण्याची घोषणा संघटनेचे मार्गदर्शक संभाजी रेवाळे यांनी केली. सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचाऱ्यांचे मासिक पेन्शन प्रस्ताव तातडीने मंजुर व्हावे, त्यांचे जीपीएफ, गटविमा, उपदान,पेन्शन विक्री प्रस्ताव त्वरीत निकाली काढावे, निवड श्रेणी, स्वग्राम प्रवास भत्ता, दुर्गम प्रोत्साहन भत्ता, आदर्श शिक्षक पुरस्कार वेतनवाढ, पदोन्नतीची वेतनवाढ,वैदयकिय थकीत देयकांची प्रकरणे निकाली काढावित यावर विचारमंथन करून सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचारी संघटनेचे धरणे आंदोलन पुकारण्या बाबत चर्चा करण्यात आली. अतिरिक्त उपदान मिळविणे, पेन्शन विक्री कपात११ वर्षा नंतर थांबविणे, पदोन्नतीची वेतनवाढ मिळविणे याबाबत न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेबाबत सभेचे अध्यक्ष रमेशजी मळसणे यांनी मार्गदर्शन केले. गजानन श्रीनाथ, वैशाली श्रीनाथ यांनी निसर्ग उपचाराबाबत माहिती दिली. आपल्या हक्कासाठी सेवानिवृतांनी जागृत व्हावे, संप, निवेदन, धरणे, आंदोलन यात सहभागी व्हावे असे आवाहन सुरेंद्र पाथरे यांनी केले.सर्वश्री ज्ञानेश्वर गावंडे,कुंदा तेलंगे, मनोज वांगे,संगीता गुडधे, सुभाष मेटी,मंदा मेटी, भाष्कर आखरे, प्रमिला आखरे, कोमलआखरे,संजय ढिगवार,सुधा ढिगवार, निलीमा ढिगवार,अरुण धांडगे, संजय बाबरे, रविंद्र बोंडे, दिनेश देशमुख, छत्रपती भिमटे, दिगांबर राजुरकर, शेषराव घायर, पुष्पा बोपत,दिलीप कोठे,ज्योती कोठे,मनोरमा राउत, सुलोचना देशमुख,गंगा उमप,प्रमिला डोणे, वैशाली बाबरे, अशोक गायकवाड, अर्चना गायकवाड,छबु डांगोरे, वर्षा देशमुख, सुभाषराव लांडे,शालीनी लांडे, प्रकाशराव वानखडे, पुष्पा वानखडे, गजाननराव बोंडे यांनी चर्चेत प्रखर मते नोंदउन संघटनेच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे असल्याचे मत नोंदविले. कार्यक्रमाचे संचालन तेजकुमार गुडधे यांनी तर विजय तेलंगे व्यवस्थापक यांनी आभार प्रदर्शन केले.

### सदानंद जाधव स्व.तुकाराम बिडकर क्रीडारत्न पुरस्काराने सन्मानित



**नांदगाव खंडेश्वर/ वार्ताहर**

स्वर्गीय तुकाराम बिडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्ञान, कला, क्रीडा, या तीन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या वेगवेगळ्या व्यक्तींना त्रिस्तरीय पुरस्कार जाहीर केले. स्वर्गीय तुकाराम बिडकर त्रिस्तरीय पुरस्कारामध्यो ज्ञानरत्न पुरस्कारामध्यो ललित ट्युटोरिअल्सचे सर्वेसर्वा प्रा. ललित काळपांडे, कलारत्न पुरस्काराने सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक प्रा. निलेश जळमकर व क्रीडा रत्न पुरस्काराने एकलव्य क्रीडा अकादमी चे. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त, क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे सदानंद जाधव यांना देण्यात आला. जय बजरंग क्रीडा मंडळाचे संस्थापक आणि विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे माजी अध्यक्ष दिवंगत प्राध्यापक तुकाराम बिडकर यांच्या मार्गदर्शनात सदानंद जाधव यांची धनुर्विद्या खेळाची सुरुवात झाली. त्यांनी दिलेल्या संस्काराची शिदोरी घेऊन सदानंद जाधव यांनी एकलव्य क्रीडा अकादमीची स्थापना केली आणि अनेक राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, खेळाडू घडविण्याचे काम आजही सुरू आहे. सदानंद जाधव हे तुकाराम बिडकर यांचा वारसा पुढे चालविण्याची जबाबदारी पार पाडत असल्याने स्वर्गीय तुकाराम बिडकर विकास प्रतिष्ठानने यांना क्रीडा रत्न पुरस्कार देण्यात आला. माजी मंत्री गुलाबराव गावंडे, गजानन दाळु गुरुजी, खासदार अनुप दादा धोत्रे, माजी आमदार हरिदास भदे, राधाताई बिडकर,आ. रणधीर सावरकर, महापौर शारदाताई खेडकर, कुलगुरू विनायक देशपांडे, शत्रुघ्न बिडकर (उपाध्यक्ष महाराष्ट्र मुख्याध्यापक संघटना) प्रकाश बिडकर (अध्यक्ष हनुमान प्रतिष्ठान) व जय बजरंग परिवार कुंभारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# मेळघाट संघर्ष व कर्जमाफी महापदयात्रेचे रौद्ररूप

## बच्चू कडूंसह यात्रेकरूंचे त्रिशूल शक्तीप्रदर्शन

**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाटातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी सुरू असलेल्या कर्जमाफीची आठवण व मेळघाट संघर्ष महापदयात्रेला दिवसेंदिवस अधिक तीव्र स्वरूप प्राप्त होत असून यात्रेच्या सहाव्या दिवशी आंदोलनाने रौद्ररूप धारण केले. प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या यात्रेत आज बच्चू कडूंसह सहकार्यांनी हातात त्रिशूल घेऊन शक्तीप्रदर्शन करत प्रशासनाला थेट इशारा दिला.



मेळघाटातील शेतकरी, आदिवासी व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही महापदयात्रा काढण्यात येत आहे. यात्रेचा आज सहावा दिवस असून सकाळी चुरणी येथून यात्रेला सुरुवात झाली. चुरणीहून निघालेली यात्रा मेहरीआम व चुनखडी मार्गे पुढे जात खडीमल येथे ☞(पान २ वर)

# महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी अविनाश मार्डीकर



**अमरावती/प्रतिनिधीः-** आज अमरावती महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती या पदावर अविनाश मार्डीकर यांची निवड करण्यात आली. सकाळी ११.०० वाजता स्व.सुदामकाका देशमुख सभागृह येथे स्थायी समिती सभापतीसाठी निवडणुक घेण्यात आली. या निवडणुकीत अविनाश मार्डीकर यांना ११ मते प्राप्त झाली असल्यामुळे त्यांची सभापतीपदी निवड करण्यात आली. प्रशांत महल्ले यांना ३ मते प्राप्त झाली आहे. या निवडणुकीत सोळा सदस्य पैकी १६ सदस्य निवडणुकीमध्ये सहभागी झाले. या निवडणुकीत पिठासिन अधिकारी म्हणुन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी काम पाहीले. सर्वप्रथम पिठासिन अधिकारी आशिष येरेकर व महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी स्थायी समिती सभापतीपदी अविनाश मार्डीकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देवुन अभिनंदन ☞(पान २ वर)

# अर्थसंकल्प २०२६-२७

## विकसित महाराष्ट्र २०४७च्या दिशेने महत्त्वाचे पाऊल - महापौर श्रीचंद तेजवानी



महाराष्ट्र शासनाने सादर केलेला अर्थसंकल्प २०२६-२७ हा विकसित महाराष्ट्र २०४७ या ध्येयाच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल असल्याची प्रतिक्रिया अमरावतीचे माननीय महापौर श्रीचंद तेजवानी यांनी व्यक्त केली आहे. पायाभूत सुविधा, उद्योग, शेती, शिक्षण व आरोग्य या महत्त्वाच्या क्षेत्रांना अर्थसंकल्पात दिलेले प्राधान्य राज्याच्या सर्वांगीण विकासाला नवी गती देणारे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच राष्ट्रीय संत श्री गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त तीर्थक्षेत्र सर्किट विकास, ग्राम समृद्धी अभियान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता च्या मदतीने 'संत गाडगेबाबा उन्नत ग्राम योजना' राबविण्याचा निर्णय हा ग्रामीण विकासाला चालना देणारा आणि ग्रामविकासाला बळकटी देणारा असल्याचेही त्यांनी नमूद केले. हा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी निश्चितच दिशादर्शक ठरेल, असा विश्वास महापौर श्रीचंद तेजवानी यांनी व्यक्त केला.

## महाराष्ट्राच्या विकासाचे बजेट

२०४७ मध्ये ५ ट्रीलीयन डॉलर ची अर्थव्यवस्था असलेला विकसित महाराष्ट्र डोळ्यासमोर ठेऊन राज्याच्या व्हिजनरी नेतृत्वाने



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळाचा अर्थसंकल्प सादर केला. या बजेट मध्ये फक्त व्हिजन नाही तर हे व्हिजन साध्य करण्यासाठी चा रोड मॅप ही दिला आहे, हे ह्या बजेटचे वैशिष्ट्य आहे शेतकऱ्यांना कर्जमाफी, नियमित कर्ज भरणाऱ्याना प्रोत्साहन राशी, लाडकी बहीण योजना सुरु राहणार, शेतकरी, शेतमजूर चे आर्थिक सक्षमीकरण योजना,अर्धी लोकसंख्या म्हणजे महिला त्यांचे सक्षमीकरण, लखपती दीदी योजना, एकल महिला योजना, बचतगट उत्पादन विक्री व्यवस्था. इन्फ्रास्ट्रक्चर वर गुंतवणूक त्यातून रोजगार निर्मिती, लहान, सूक्ष्म उद्योगावर लक्ष केंद्रित केले आहे. विदर्भात नागपूर ला डिफेन्स हब, गडचिरोली स्टील हब, अमरावती टेक्सटाईल हब. अमरावती ला संत गाडगेबाबाच्या स्पर्शाने पुनीत प्रमुख स्थळांचा विकास, स्व पंजाबराव देशमुख शैक्षणिक विकास संकुल, बेलोरा विमानतळाचे विस्तारीकरण आणि नाईट लँडिंग सुविधा, महानुभाव पंथाचे प्रमुख ठिकाणांचा विकास, IT पार्क आदी प्रकल्प अमरावती ला मिळाले. हे बजेट महाराष्ट्राच्या विकासा चे बजेट आहे, रोजगार निर्मिती चे बजेट आहे, शेतकरी शेतमजूर, महिला,कामगार,छोटे उद्योजक यांचे बजेट आहे, व्हिजनरी बजेट आहे.

**-किरण पातूरकर**

## शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली



काही वर्षांत शेतकरी मोठ्या संकटातून जात आहेत. चांगला पाऊस होऊनही कृषी व संलग्न क्षेत्राचा विकासदर ९.१ टक्क्यांवरून ३.४ टक्क्यांवर घसरला आहे. म्हणजेच सुमारे ५ टक्क्यांची घसरण झाली आहे. अवकाळी पाऊस, पिकांचे नुकसान आणि बाजारातील अस्थिरता यामुळे शेतकरी अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत केवळ घोषणा करून चालणार नाही, तर शेतकऱ्यांना तातडीने प्रत्यक्ष आर्थिक मदत आणि हमीभावाची मजबूत व्यवस्था देणे आवश्यक आहे.महाराष्ट्राचा २०२६ चा अर्थसंकल्प म्हणजे वास्तवाचे भान हरपलेला केवळ आकड्यांचा फुगवटा आणि स्वप्नांची भूलथाप आहे. 'विकसित महाराष्ट्र'च्या नावाखाली सामान्य माणसाच्या जखमेवर मीठ चोळले जात असून,शेतकरी कर्जमाफीच्या नावाखाली पुन्हा एकदा अटी-शर्तीचा सापळा रचून बळीराजाची फसवणूक करण्यात आली आहे. फक्त घोषणांचा पाऊस अंमलबजावणी मात्र शून्य असा हा अर्थसंकल्प आहे.

**-अनिरुद्ध उर्फ बबलु देशमुख**
**अध्यक्ष,अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण)**

अमरावती येथील मध्यवर्ती अति महत्त्वाच्या रेल्वे ब्रिजला



तरतूद करण्यात आली.आजच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आली सर्वांचं प्रेरणास्थान, श्रध्दास्थान हनुमान गढी ला न्याय देण्यात आला. डॉ.पंजाबराव देशमुख प्रशासकीय भवनाला स्थान देण्यात आले. शेतकरी कर्जमुक्तीचा मोठा निर्णय आज अर्थसंकल्पात घेण्यात आला . लाडकी बहीण योजनेला पूर्वोत्तर ठेवण्यात आले.त्यामुळे शेतकरी ,शेतमजूर ,कष्टकरी, महिला, भगिनी या सर्वांकरिता आज महत्त्वाचा आणि सोन्याचा दिवस म्हणून आजचा हा अर्थसंकल्प सादर झाला. त्यानिमित्त महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे मनःपूर्वक आभार व मनःपूर्वक अभिनंदन.

**-सचिन भेंडे, उपमहापौर,मनपा अमरावती.**

# दर्यापूरात मार्च महिन्यातच तापमान ३७ अंशांच्या पुढे

### -एप्रिल,मे महिना बाकीच, -वाढत्या तापमानामुळे बाजारपेठा थंडावल्या

**खल्लार/प्रतिनिधीः-** मार्च महिन्याची सुरुवात होताच उन्हाचा कडाका वाढू लागला अनेक ठिकाणा बरोबरच दर्यापूरातील तापमान ३७ अंशांच्या पुढे पोहोचल्याने नागरिकांना उष्णतेचा त्रास जाणवू लागला आहे. सर्वाधिक उष्णतेचे एप्रिल आणि मे हे दोन महिने बाकी असतानाच उन्हाची तीव्रता वाढल्याने यंदाचा उन्हाळा अधिक कडक राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हवामान



खात्याच्या निरीक्षणानुसार देशातील अनेक भागांमध्ये मार्चच्या पहिल्या आठवड्यातच तापमानात २ ते ४ अंशांनी वाढ झाली आहे. कडक उन्हामुळे दर्यापूर शहरातील बाजारपेठ शांत झाल्या असून उन्हाचा व्यवसायावर मोठा प्रतिकूल परिणाम दिसून येत आहे महाराष्ट्रातील काही भागांमध्येही उन्हाचा चटका तीव्र होत आहे. अंशांपर्यंत नोंदवले गेले असून हे हंगामाच्या सरासरीपेक्षा जवळपास ६ अंशांनी जास्त असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे. सकाळपासूनच तीव्र उन्हामुळे रस्त्यांवर वर्दळ कमी दिसून येत असून दुपारच्या वेळेत ☞(पान २ वर)

# पैशांच्या वादातून पेट्रोल पंपावर कर्मचाऱ्याला मारहाण

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असोरिया पेट्रोल पंपावर किरकोळ पैशांच्या वादातून एका २१ वर्षीय कर्मचाऱ्यावर सहा तरुणांनी लाठ्याकाठ्यांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात प्रणय बलदेव टेकाम (वय २१, रा. लेहगाव, मोर्शी) गंभीर जखमी झाला असून पोलिसांनी सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेनुसार, मंगळवार, ३ मार्च रोजी दुपारी ३ वाजेच्या



सुमारास रेवसा-चांगापुर मार्गावरील असोरिया पेट्रोल पंपावर ही घटना घडली. प्रणय टेकाम हा पंपावर काम करतो. दुपारी तीन अनोळखी तरुण पंपावर आले आणि त्यांनी १०० रुपयांचे पेट्रोल घेतले; मात्र पैसे देताना त्यांच्याकडे काही रक्कम कमी होती. उर्वरित रकमेवरून प्रणय आणि या तरुणांमध्ये वाद निर्माण झाला. प्रणयने पेट्रोलचे पूर्ण पैसे भरण्यास सांगितल्यावर आरोपी रागावून शिवीगाळ करत धक्काबुक्की करायला लागले. पंप मालकाने तेथे मध्यस्थी करून वाद शांत केला. अर्ध्या तासानंतर त्याच तीन तरुणांनी आपल्या इतर तीन साथीदारांना घेऊन पुन्हा पंपावर येऊन प्रणयवर थेट हल्ला चढवला. आरोपींनी लाठ्याकाठ्यांनी ☞(पान २ वर)

# फोटोसह चॅटिंग पाठवून मोडले प्रेयसीचे लग्न

## परतवाड्यात मजनूचा कारनामा

**अमरावती/प्रतिनिधीः-** एका प्रियकराच्या दडपशाहीमुळे तरुणीच्या विवाहाचे स्वप्नच मोडले! परतवाडा पोलिसांच्या हद्दीत २६ वर्षीय युवतीने आपल्या पुर्वीच्या प्रियकराविरूध्द गंभीर तक्रार नोंदवली आहे. आरोपी प्रियकराने प्रेयसीसोबतच खासगी फोटो आणि चॅट्स तिच्या भावी पतीला पाठवून तिचा विवाह मोडला. इतकेच नव्हे तर तिच्याकडे ५ लाख रुपयांची मागणी करून धमकावले. याप्रकरणात पिडित युवतीच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी नागेश प्रभाकर बावस्कार (वय ३१, रा. शेगाव) याच्याविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

माहितीनुसार, परतवाडा शहरातील एका तरुणीचे नागेश याच्यासोबत चार-पाच वर्षांपूर्वी प्रेमसंबंध होते. मात्र काही कारणास्तव तरुणीने प्रेमसंबंध संपविले होते. परंतू त्यानंतरही आरोपी ☞(पान २ वर)

# अमरावती ग्रामीण पोलीस शिपाई भरतीची यादी जाहीर

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण जिल्हा पोलीस प्रशासनाने पोलीस शिपाई पदासाठी घेतलेल्या भरती प्रक्रियेत एक महत्वाचा टप्पा पार केला आहे. २१४ रिक्त पोलीस शिपाई पदांसाठी झालेल्या मैदानी चाचणीत जे उमेदवार विहीत गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत, त्यांची सामाजिक व आरक्षणीय निकषांनुसार लेखी परीक्षा साठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची १:१० या प्रमाणात तात्पुरती यादी तयार करण्यात आली आहे.

सदर यादी अमरावती ग्रामीण



जिल्हा पोलीस कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.amravatirural.gov.in) तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संकेतस्थळावर (www.mahapolice.gov.in) प्रसिद्ध ☞(पान २ वर)

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेने मानले मुख्यमंत्र्यांचे आभार



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्याचे कर्तृत्ववान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांच्या विशेष पुढाकारातून भाऊसाहेबांच्या नावाने संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्याबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने मुख्यमंत्री यांचे तसेच गृहराज्यमंत्री भोयर यांचे विशेष आभार मानण्यात आले आहे. राज्यमंत्री डॉ. पंकज भाऊ भोयर यांनी केलेल्या विनंती नुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजच्या अर्थसंकल्पात अमरावती येथे भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख शैक्षणिक संकुल उभारण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील विज्ञान प्रदर्शनीय मध्ये प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांना बेंगळुरू येथिल ISRO व अमेरिकेतील NASA याठिकाणी भेट देण्यासाठी 'मुख्यमंत्री विज्ञान वारी' योजना जाहीर केल्याबद्दल त्यांचे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख ,कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ तसेच इतर पदाधिकारी यांनी मनःपूर्वक आभार मानले आहे.

# सेतू सेवा केंद्रांमध्ये भावफलक लावणे बंधनकारक करा - पार्थ लोडम

## नागरिकांकडून जादा शुल्क आकारण्याच्या तक्रारी

खल्लार/प्रतिनिधीः- दर्यापूर तालुक्यातील सर्व सेतू सेवा केंद्र धारकांनी आपल्या दुकानामध्ये विविध शासकीय सेवांचे अधिकृत दर दर्शविणारा भावफलक लावणे बंधनकारक करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.)पक्षाच्या वतीने नायब तहसिलदारांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली. दर्यापूर तालुक्यातील अनेक सेतू सेवा केंद्रांवर विविध दाखले, प्रमाणपत्रे तसेच इतर शासकीय



सेवांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत कोणतीही स्पष्ट माहिती नागरिकांना दिली जात नाही. त्यामुळे काही ठिकाणी नागरिकांकडून नियमित दरापेक्षा जास्त शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. याच पार्श्वभूमीवर प्रत्येक सेतू सेवा केंद्रात सर्व सेवांचे अधिकृत दर ☞(पान २ वर)

# दगडफेकीसह मारहाण करणारे जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** फॉरेस्ट कॉलनीत किरकोळ वादातून सुरु झालेल्या दगडफेक व मारहाण प्रकरणात फ्रेजरपुरा पोलीसांनी पाच आरोपींना २४ तासांच्या आत ताब्यात घेतले. पकडण्यात आलेल्या आरोपींमध्ये अकिल संतोश इंगले (वय १९), यश उर्फ चारू मेश्राम (वय २१), निमिश उर्फ प्रिन्स राऊत (वय २१), आर्यन उर्फ किश राऊत (वय १९) आणि शैलेश रामचंद्र राऊत ( वय ४५) यांचा समावेश आहे.

माहितीनुसार, फॉरेस्ट कॉलनीत राहणाऱ्या पंकज नाना पाटील यांचा भाचा यश हा



काशीराम पार्कमध्ये फेरफटका मारत असताना काही तरुणांनी त्याच्याशी वाद निर्माण केला. दरम्यान यशच्या आईने परिस्थिती पाहिली, तेव्हा प्रिन्स राऊत, किश राऊत आणि त्यांच्या तीन मित्रांनी यशवर हल्ला केला. नंतर मनोज व समीर चव्हाण आले, तेव्हा आरोपींनी त्यांच्यावरही दगडफेक सुरु केला. त्यानंतर आरोपींनी लाठ्या आणि ☞(पान २ वर)




# अरुण वाघ यांचे निधन

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदुर रेल्वे शहरातील प्रतिष्ठित नागरिक नाग मंदिर देवस्थानचे अध्यक्ष, प्रा. प्रभाकरराव वाघ



माजी नगराध्यक्ष यांचे भाऊ हर्षल अशोकराव वाघ, नगरसेवक यांचे काका अरुण तुकारामजी वाघ यांचे ६८ व्या वर्षी अल्पशा आजाराने आज दि ६ मार्च २०२६ ला दुपारी २ वाजता निधन झाले. अंतिम यात्रा ७ मार्च २०२६ रोजी सकाळी दहा वाजता त्यांचे राहते घरून निघणार आहे.

त्यांच्या मागे एक मुलगा यासह बरेच मोठा परिवार असून यांच्या अचानक निधनाने शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# नियमभंग करणाऱ्यांवर दंड

## अमरावती ग्रामीण वाहतूक शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी सण-उत्सवांच्या काळात अपघात टाळण्यासाठी आणि वाहनचालकांना सावध करण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेने ५ मार्च रोजी व्यापक मोहीम राबवली. या मोहिमेत अवैध प्रवासी वाहतूक करणारे, वाहन नियमांचा भंग करणारे आणि धोकादायक वाहन चालविणारे चालक यांच्यावर लक्ष केंद्रित केले गेले. जिल्हा वाहतूक शाखेच्या पथकाने पो.स्टे. दर्यापूरच्या सहाय्याने



अवैध प्रवासी वाहतूक करणारे वाहन चालक, बिना हेल्मेट दुचाकी चालविणारे, ट्रिपल सीट वाहन चालविणारे, सीट बेल्ट न लावणारे, नो पार्किंग क्षेत्रात वाहन उभे करणारे तसेच मालवाहू वाहनात धोकादायक पद्धतीने मजूर वाहणारे वाहन चालक यांच्याविरुद्ध ☞(पान २ वर)

# नागरिकांच्या तक्रारीसाठी थेट निवारण सुविधा

### - अमरावती पोलीस आयुक्तालयात आयोजन

अमरावती : आता आपल्या समस्यांचे निवारण थेट पोलीस आयुक्तांच्या उपस्थितीत होणे शक्य आहे. अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने नागरिकांसाठी नवीन उपक्रम सुरु केला आहे, ज्यामध्ये ७ मार्चपासून प्रत्येक नागरिक त्यांच्या तक्रारी पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्यासमोर प्रत्यक्ष मांडू शकतील.

पहिल्या बैठकीसाठी ७ मार्च रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत पोलीस आयुक्त कार्यालयाच्या तळमजल्यावर सर्वसामान्य नागरिक उपस्थित राहू शकतात. पोलीस आयुक्तांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, या संधीचा फायदा घेऊन त्यांच्या समस्यांचे त्वरीत निवारण करावे. या उपक्रमामुळे नागरिकांना न्याय्य आणि सुरक्षित अनुभव मिळेल, अशी अपेक्षा आहे.